


# जनमाध्यम


e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार ७ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





## राज्यात थंडीची चाहूल



### अवकाळीपासून सुटका; गारठा वाढणार


**मुंबई :** महाराष्ट्रात तापमानात चढ उतार होत असल्याने पावसाचा जोर हळूहळू कमी होत आहे. कमाल तापमानाचा पारा ३० अंशांच्या वर असून, किमान तापमानाचा पारा २० अंशांच्या खाली येउ लागला आहे. आज कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात काही ठिकाणी विजांसह हलक्या पावसाची शक्यता आहे. शिवाय समुद्रातील चक्रीवादळाचं संकट हळूहळू ओसरत आहे.पुढील चार ते पाच दिवसात थंडीची चाहूल लागण्यास सुरुवात होईल.हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरातील चक्रीवादळाची तीव्रता कमी झाल्याने आज कमी अधिक प्रमाणात पावसाला पोषक वातावरण निर्माण होणार आहे. पुढील काही दिवसात पाउस राज्याची रजा घेणार आहे. ईशान्य बंगालच्या उपसागरात बांगलादेशच्या किना-यालगत कमी दाब क्षेत्र (पान २ वर)

### नागपुरात चौघांचा पाण्यात बुडून मृत्यू

**नागपूर /प्रतिनिधी-** नागपूरमध्ये दुर्दैवी घटना घडली आहे. चार जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. दोन वेगवेगळ्या घटनांत चौघांनी जीव गमावला आहे. जपालेश्वर मंदिर परिसरात तलावात बुडून मामा-भाचीचा मृत्यू झाला. तर भागीमहारी तलावात बुडून दोन तरुणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर नागपूरमध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.नागपूर जिल्ह्यातील रामटक तालुक्यातील जपालेश्वर मंदिर परिसरात तलावात बुडून मामा-भाचीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. १३ वर्षांची हर्षाली विनोद माकडे (भोजापूर-मानापूर) आणि ३३ वर्षांचे अजय वामन लोहबरे (खात) अशी मृतांची नावे आहेत. हर्षाली रबरी ट्यूबच्या मदतीने पोहण्याचा सराव करत होती. ट्यूब निसटल्याने ती पाण्यात बुडू लागली. तिला वाचविण्यासाठी मामाने उडी घेतली, पण खोल पाण्यामुळे दोघेही बुडाले.या घटनेदरम्यान हर्षालीचे वडील तलावाच्या काठावरच उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनी बचावकार्य सुरू करून दोघांचे मृतदेह बाहेर काढले. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. परिसरात कोणतीही सुरक्षा व्यवस्था किंवा सूचना फलक नसल्याने तातडीने सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी केली.नागपूर जिल्ह्याच्या पारशिवनी तालुक्यातील भागीमहारी तलावात दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाला. अविनाश आनंद (२२, नागपूर) आणि संकल्प मालवे (१९, चंद्रपूर) अशी मृतांची नावे आहेत. सहा मित्रांसह फिरायला गेले असताना पोहण्यासाठी पाण्यात उतरले होते.

### दिल्लीत महत्त्वाची सहकार परिषद

**वर्धा /प्रतिनिधी :** देश पातळीवरील सभा, परिषदा, संमेलने यांचे महत्व सांगायला नको. देश हिताचा विचार किंवा धोरण याचा



त्यात उहापोह होत असतो. त्यामुळे संबंधित विषयाशी निगडित असे सर्वच त्यात सहभागी होत असतात. हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे होत आहे. विविध राज्यात त्यादृष्टीने उपक्रम आयोजित केल्या जात आहे. याच अनुषंगाने नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन कॉपरेटिव्ह बँक अँड क्रेडिट सोसायटी ( नॅफकब ) या सहकारी बँकेच्या शिखर संस्थेने एक उपक्रम आयोजित केला आहे. अश्या सहकारी बँकांची एक आंतरराष्ट्रीय परिषद दिल्लीतील विज्ञान भवन या प्रतिष्ठित सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. १० व ११ नोव्हेंबर अशी दोन दिवस ही परिषद चालणार आहे. त्यास केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा हे प्रामुख्याने संबोधित करणार आहे. नॅफकबच्या विविध उत्सवाचा एक भाग म्हणून ही परिषद आहे.उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होत आहे. शहरी सहकारी पतसंस्था प्रतिनिधी यात सहभागी होत आहे. सर्व राज्यांचे सहकार मंत्री, सहकार मंत्रालयाचे अधिकारी, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर व अन्य वरिष्ठ (पान २ वर)

### बांगलादेशमध्ये निवडणूक प्रचाराच्या सुरुवातीलाच हिंसाचार

**ढाका** - बांगलादेशमध्ये फेब्रुवारी २०२६ मध्ये होणा-या सार्वत्रिक निवडणुकांच्या प्रचार मोहिमेला सुरुवात होताच देशाच्या विविध भागांत हिंसाचार भडकला आहे. या दरम्यान चिटगावमध्ये विरोधी पक्ष बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) चे उमेदवार एरशाद उल्लाह यांना गोळी लागून ते जखमी झाले आहेत, तर कुमिल्ला जिल्ह्यात दंगेखोरांनी एका दुस-या उमेदवाराच्या घराला आग लावली.अंतरिम सरकारने या घटनांची तीव्र निंदा केली असून म्हटले आहे की, लोकशाही प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारचा हिंसाचार सहन केला जाणार नाही. सरकारने सांगितले की प्राथमिक चौकशीत असे दिसून आले आहे की बीएनपी उमेदवार एरशाद उल्लाह हे हल्ल्याचे मुख्य लक्ष्य नव्हते, तर ते चुकून लागलेल्या गोळीमुळे जखमी झाले.सरकारने निवेदनात म्हटले आहे, या गुन्हेगारी घटनेबद्दल आम्ही तीव्र चिंता व्यक्त करतो आणि सर्व उमेदवार व नागरिकांच्या सुरक्षेची हमी देण्यास आम्ही वचनबद्ध आहोत. चिटगाव महानगर पोलिसांना (सीएमपी) कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत,

### पुन्हा भारत-पाक यांच्यातील संघर्ष थांबवल्याचा दावा

**वॉशिंग्टन-** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा दावा केला आहे की भारत आणि पाकिस्तान यांच्यात मे महिन्यात जी



शांती प्रस्थापित झाली, ती त्यांच्या कठोर इशा-यानंतरच शक्य झाली. ट्रम्प यांनी सांगितले की, त्यांनी दोन्ही देशांना धमकी दिली होती की जर त्यांनी आपापसातील लढाई सुरूच ठेवली, तर अमेरिका त्यांच्या कोणत्याही व्यापार कराराला मान्यता देणार नाही.मियामी येथे झालेल्या अमेरिका बिझनेस फोरमला संबोधित करताना ट्रम्प म्हणाले, मी दोन्ही देशांसोबत व्यापार कराराच्या प्रक्रियेत होतो. तेव्हाच मी वृत्तपत्रात वाचले की भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध सुरू झाले आहे सात विमाने पाडली गेली आहेत, आणि आठवेही गंभीररीत्या नुकसानग्रस्त झाले आहे. म्हणजे एकूण आठ विमाने नष्ट झाली होती. मग मी म्हणालो, जर तुम्ही युद्ध करत असाल, तर मी तुमच्याशी कोणताही व्यापार करणार नाही.ट्रम्प पुढे म्हणाले, मी दोन्ही देशांना सांगितले, तुम्ही दोघेही अण्वस्त्रधारी देश आहात. जर तुम्ही युद्ध सुरूच ठेवले, तर अमेरिका कोणताही व्यवहार करणार नाही. आणि दुस-याच दिवशी मला फोन आला की दोन्ही देशांनी शांतता प्रस्थापित केली आहे. मग मी म्हणालो, छान! आता व्यापार करा.या दरम्यान ट्रम्प यांनी म्हटले, हे सगळं टॅरिफ समुळे झालं. (पान २ वर)

# 1800 कोटींचा पार्थ पवारांवर जमीन घोटाळ्याचा आरोप

**पुणे/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार हे शेतक-यांना नेहमीच फुकट लागतं असे म्हणतात. पण त्यांच्या मुलाला देताना १८०० कोटींची जमीन फक्त ३०० कोटी रुपयांत कशी दिली जाते. या ३०० कोटी रुपयांवरील स्टँप ड्युटी ४८ तासांत माफ होते. तुम्हाला का सर्व फुकट लागते, असा सवाल करत शिवसेना (ठाकरे) नेते तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अजित पवारांवर गंभीर आरोप केले आहेत.




पुण्यातील एका जमिनीच्या व्यवहारामुळे राज्यात सध्या खळबळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांच्या अमेडिया होल्डिंग एलएलपी कंपनीला तब्बल १८०४ कोटी रुपयांचा बाजारभाव असलेली जमीन फक्त ५०० रुपयांच्या बाँड पेपरवर अवघ्या ३०० कोटी रुपयांमध्ये विकत घेतल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. पुण्यातल्या कोरेगाव पार्क परिसरातील सरकारी मालकीच्या ४० एकर जमिनीच्या खरेदी व्यवहारामध्ये गैरप्रकार झाल्याचा आरोप माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. या जमिनीचा भाव कागदावर ३०० कोटी रुपये इतका आहे. ही सरकारी किंमत असून खरी किंमत त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक असल्याचे दानवे म्हणाले. ही जमीन अमेडिया कंपनीने खरेदी केली आहे. अमेडिया कंपनीचे मालक उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मोठा मुलगा पार्थ पवार आणि त्यांचे मामेभाउ दिग्विजय अमरसिंह पाटील आहेत. या प्रकरणामुळे अजित पवार आणि पार्थ अडचणीत आले आहेत. अंबादास दानवे म्हणाले की, पुण्यात नेमकं काय सुरू आहे. राज्यात देवाभाउचे (पान २ वर)

## आत्या मी काही चूक केलेली नाही-पार्थ



**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्यावर पुण्यातील एका जमीन घोटाळ्यासंदर्भात विरोधकांनी गंभीर आरोप केले आहेत. त्यामुळे आज राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. त्यानंतर या प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील दखल घेत चौकशीचे आदेश दिले. एवढंच नाही तर या जमीन खरेदी प्रकरणात एका तहसीलदारांचंही निलंबन करण्यात आलं आहे. या प्रकरणावर खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी संवाद साधत प्रतिक्रिया दिली आहे. तसेच जमीन खरेदी प्रकरणाच्या आरोपांबाबत पार्थ पवारांशी काही बोलणं झालं आहे का? यावर सुप्रिया सुळे यांनी खुलासा केला आहे. आत्या मी काही चूक केली नाही, असं पार्थ पवार हे सुप्रिया सुळे यांच्याशी फोनवर बोलताना म्हटले असल्याची माहिती सुप्रिया सुळे यांनीच माध्यमांशी बोलताना दिली आहे.

**मुख्यमंत्री अडचणीत आणत आहेत का?**

पुण्यातील जमीनीचं प्रकरण नेमकं काय आहे? हे राज्याच्या सरकारने स्पष्ट केलं पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत स्पष्ट करायला पाहिजे. कारण सर्व संभ्रम आहे, या प्रकरणात माझे तीन प्रश्न आहेत. माझा पहिला प्रश्न आहे की ही जमीन (पान २ वर)

## योग्य ते चौकशीचे आदेश दिलेले आहेत-मुख्यमंत्री



पुण्यातील जमीन व्यवहाराबाबत पार्थ पवार यांच्यावर आरोप होताच माध्यमांनी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया विचारली. यावर नागपूर येथे बोलत असताना ते म्हणाले, सदर प्रकरणासंदर्भात मी सर्व माहिती मागवली आहे. महसूल विभाग, आयजीआर, लँड रेकॉर्ड्स याची सर्व माहिती मागितली आहे. योग्य ते चौकशीचे आदेशही मी दिलेले आहेत. सर्व माहिती आणि प्राथमिक चौकशीच्या आधारावर मी जे सांगायचे ते सांगेन. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, अद्याप माझ्याकडे पूर्ण माहिती आलेली नाही. प्राथमिकदृष्ट्या जे मुद्दे समोर येत आहेत. ते गंभीर आहेत. त्यामुळे त्याबाबत योग्य माहिती घेउनच बोलले पाहिजे. त्यादृष्टीने आज माहिती मिळाल्यानंतर शासनाची पुढची कारवाई काय आहे, त्याबाबत दिशा स्पष्ट करू. उपमुख्यमंत्रीही (अजित पवार) अशा कुठल्याही प्रकाराला पाठिशी घालतील असे माझे मत नाही. यासंदर्भात आमच्या सरकारचे एकमत आहे. कुठेही अनियमितता झाली असेल तर त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे. या मताचे आम्ही आहोत. अनियमितता झाली आहे का? हे पडताळून पाहिले पाहिजे. अनियमितता झाली असेल तर त्याच्यावर निश्चितच कारवाई केली जाईल, अशी भूमिका मुख्यमंत्री फडणवीस (पान २ वर)

## दिल्लीनंतर आता बिहार! भाजपा नेत्याने 10 महिन्यात दोन राज्यात केले मतदान

**पाटना/वृत्तसंस्था :** मतदार यादीत अनेक दुबार मतदार असून निवडणूक आयोगाकडून जाणुनबुजून याकडे दुर्लक्ष केले जाते असा आरोप सातत्याने विरोधी पक्ष करत आहे. मात्र पराभवाला कारण म्हणून विरोधक हे आरोप करतायेत असा दावा भाजपाकडून करण्यात येतो. त्यातच आता राज्यसभेचे भाजपाचे माजी खासदार राकेश कुमार सिन्हा यांनी दिल्लीनंतर आता बिहार निवडणुकीत दुस-यांदा मतदान केल्याचा आरोप आहे. राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसने यावरून निवडणूक आयोगावर निशाणा साधला आहे.



राकेश सिन्हा बिहारच्या बेगूसराय जिल्ह्यात राहणारे आहेत. विरोधक दुबार मतदारावरून देशभरात रान उठवत असताना भाजपा नेत्याने १० महिन्यात २ राज्यात मतदान केल्याने खळबळ माजली आहे. त्यावर माझे वडिलोपार्जित घर बेगुसराय येथे आहे. मी जमिनीशी नाळ तोडलेला माणूस नाही असं सिन्हा यांनी म्हटलं आहे. बिहारच्या राजकारणात सक्रियतेमुळे मी माझे नाव मनसेरपूर येथे नोंदवले होते असं त्यांनी स्पष्टीकरण दिले. माजी राज्यसभा खा.राकेश कुमार सिन्हा यांनी आज ६ (पान २ वर)

## बिहारमधील 121 जागांवर मतदान संपले

**सायं. 5 वाजेपर्यंत 60.13% मतदान**

**बेगुसरायमध्ये सर्वाधिक 67.32 टक्क्यांची नोंद**



**पाटना/वृत्तसंस्था :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान संपले आहे. सकाळी ७ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान झाले. बेगुसरायमध्ये सर्वाधिक ६७.३२% मतदान झाले, तर शेखपुरा येथे सर्वात कमी ५२.३६% मतदान झाले. राजधानी पाटणा येथे ५५.०२% मतदान झाले. ५६ अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान सुरू राहिले. बिहारमधील शहरी मतदारांमध्ये उत्साहाचा अभाव होता. १२१ जागांपैकी तीन जागांवर सर्वात कमी मतदान झाले. राजधानी पाटणामधील शहरी भागात कुम्हरार येथे ३९.५२%, दिघा येथे ३९.१०% आणि बांकीपूर (पान २ वर)

## विश्वविजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघाने घेतली पंतप्रधानांची भेट



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पहिल्यांदा महिला एकदिवसीय विाचषक जिंकणा-या भारतीय महिला संघाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधानांनी संघाचे विजयाबद्दल अभिनंदन केले आणि सलग तीन पराभव आणि सोशल मीडियावर ट्रोलिंग असूनही त्यांच्या जोरदार पुनरागमनाचे कौतुक केले.भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने २०१७ मध्ये पंतप्रधान मोदींसोबत झालेल्या तिच्या भेटीची आठवण करून दिली, जेव्हा ती ट्रॉफीशिवाय भेटली होती. यावेळी, ती ट्रॉफी घेउन त्यांच्याशी भेटली. ती म्हणाली, 'आम्हाला ट्रॉफी घेउन पुन्हा पुन्हा भेटायचे आहे.' उपकर्णधार स्मृती मानधना म्हणाली, 'पंतप्रधानांनी सर्वांना प्रेरणा दिली. ते आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्त्रोत आहेत.' भारतीय संघासोबत बीसीसीआयचे अध्यक्ष मिथुन मन्हास आणि प्रशिक्षक अमोल मजुमदार देखील उपस्थित होते. बांगलादेशविरुद्ध जखमी झालेली प्रतीका रावल व्हीलचेअरवर दिसली. २ नोव्हेंबर रोजी डीवाय पाटील स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव करून भारतीय संघाने महिला विश्वचषक जिंकला होता. संघातील क्रिकेटपटूंनी पंतप्रधान मोदींना एक खास जर्सी भेट दिली, ज्यावर सर्व क्रिकेटपटूंनी स्वाक्षरी केली होती. त्यावर NAMO-1 लिहिलेले आहे.

## लोकल रेल्वेने चार प्रवाशांना उडवले, दोघे ठार

**मुंबई/प्रतिनिधी :** रेल्वे कर्मचा-यांच्या आंदोलनामुळे मुंबईतील लोकल रेल्वे सेवा विस्कळीत झाली. त्यामुळे लोकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. लोकल बंद असल्याने लोक रेल्वे रुळावरूनच चालत जात होते. याचवेळी पाठीमागून आलेल्या लोकलने चार प्रवाशांना उडवले. यात दोन जणांचा मृत्यू झाला. यातील दोघांवर उपचार सुरू आहेत. मध्य रेल्वेच्या मस्जिद बंदर-सँडहर्स्ट रोड रेल्वे स्थानकादरम्यान ही घटना घडली. मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या अपघात प्रकरणी रेल्वे पोलिसांनी दोन अभियंत्यावर गुन्हा दाखल केला. या घटनेच्या निषेधार्थ रेल्वेच्या कर्मचा-यांनी गुरुवारी (६ नोंव्हेबर) सायंकाळी साडेपाच वाजता आंदोलन केले. त्यामुळे लोकल रेल्वे सेवा विस्कळीत झाली. लोकल ठप्प झाल्याने प्रवाशी स्थानकावरच अडकले होते. काही लोकल रुळावरच थांबल्या होत्या. याच काळात काही प्रवाशी रेल्वे रुळावरून चालत निघाले होते. दरम्यान, रेल्वे सेवा पूर्ववत सुरू झाली आणि छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकातून रवाना झालेल्या पहिल्या लोकलने रुळावरून चालत निघालेल्या चौघांना उडवले.




## पार्थ प्रकरणावरून अण्णा हजारे कडाडले

### मंत्र्यांचा मुलगा चुकीचे वागत असेल तर तो मंत्र्यांचा दोष; संस्कार महत्वाचे

**राळेगण सिद्धी/प्रतिनिधी :** पुण्यातील कोरेगावमधील ४० एकर जमिनीच्या खरेदीवरुन उपमुख्यमंत्री अजित पवारांचे चिरंजिव पार्थ पवार अडचणीत सापडले आहे. तब्बल १८०४ कोटी रुपये किंमतीची ही जमीन केवळ ३०० कोटी खरेदी झाल्याचा समोर आले आहे. याच मुद्यावर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. एखाद्या मंत्र्याचा मुलगा चुकीचे वागत असेल तर तो मंत्र्याचा दोष आहे. त्यासाठी संस्कार हे महत्त्वाचे असतात.



एखादा व्यक्ती घडण्यासाठी कुटुंबाचे संस्कार, घराण्याचे संस्कार, गावाचे संस्कार, समाजाचे संस्कार हे खूप महत्त्वाचे असतात, असा हल्लाबोल अण्णा हजारे यांनी पवार कुटुंबावर केला. त्याचवेळी राळेगण सिद्धी किती मोठे गाव आहे, पण कधीही गडबड नाही. गोंधळ नाही, असेही हजारे म्हणाले. दरम्यान, आज राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील अण्णा हजारे यांची भेट घेतली होती. त्या भेटीनंतर अण्णा हजारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अशा प्रकरणांविरोधात कारवाई करण्यासाठी सरकारने विशेष धोरणे आखून अवलंब केला पाहिजे. अण्णा हजारे यांनी आज राळेगणसिद्धीत प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरणार भाष्य केले. पार्थ पवार यांच्या प्रकरणात कारवाई झाली पाहिजे. पण असले प्र (पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
epaper www.janmadhyam.com

## स्क्रब टायफसबाबत खबरदारी बाळगा
### आरोग्य विभागाचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः**- अमरावती जिल्ह्यात 'स्क्रब टायफस' या संसर्गजन्य आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने सुरु केल्या आहेत. 'ओरिएंटा त्सुत्सुगामुशी' नावाच्या जिवाणूमुळे होणारा हा आजार 'माईट' नावाच्या विशिष्ट कीटकाच्या चाव्यातून पसरतो. तीव्र ताप, डोकेदुखी, अंगदुख या आजाराची मुख्य लक्षणे आहेत. या पार्श्वभूमीवर, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. शरद जोगी यांच्या नेतृत्वाखालील पथकांनी बाधित गावांमध्ये जलद ताप सर्वेक्षण आणि कीटक सर्वेक्षण सुरू केले आहे. झुडपांमध्ये वास्तव्य करणाऱ्या माईटच्या नियंत्रणासाठी टेमीफॉस आणि मॅलेथिऑन पावडरचा वापर करून कीटकनाशक फवारणी केली जात आहे. वाढलेले गवत आणि अनावश्यक झुडपे काढून टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी पूर्ण बाह्यांचे कपडे वापरणे, खुल्या जागी शौचास जाणे टाळणे आणि घराजवळ स्वच्छता राखून कीटकनाशक औषधांचा वापर करणे आवश्यक आहे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. कोणतीही लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी.

## २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा
### चुकीच्या बातम्या व अफवांवर विश्वास ठेवू नका

**अमरावती/ प्रतिनिधी**- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा- २०२५ (टिईटी-२०२५) परीक्षेचे आयोजन रविवार, २३ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.या परीक्षेसाठी मराठी, कन्नड, तेलगु, गुजराथी माध्यमांच्या विद्यार्थी/उमेदवारांची राज्यामध्ये एकूण संख्या कमी प्रमाणात असल्याने संबंधित सर्व विद्यार्थी/उमेदवारांना परीक्षा केंद्र उपलब्ध करण्यात आले आहेत, याची संबंधित सर्व विद्यार्थी-उमेदवारांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) २०२५ परीक्षेच्या आयोजनाची कार्यवाही सुरु असून, परीक्षेसंबंधित कार्यवाहीबाबत वेळोवेळी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अधिकृत माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. परीक्षेसंबंधी युट्युब चॅनेल्स, सोशल मिडिया प्लेटफॉर्मद्वारे व प्रसारमाध्यमांद्वारे दिल्या जाणाऱ्या चुकीच्या व दिशाभूल करणाऱ्या बातम्या किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या ".स्मेजल्हा.ग्ह व httped:// mahatet.in या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व माहितीचे अवलोकन करावे. याबाबत सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी, असेही महाराष्ट्र राज्य परिषदेद्वारे कळविण्यात आले आहे.

# तरुणांनो, ड्रोन पायलट व्हा; मोफत प्रशिक्षण मिळवा
## शासनाच्या अमृत संस्थेचा उपक्रम : मिळणार रोजगाराची दिशा

अमरावती : खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवतींना रोजगाराच्या नव्या दिशेने वाटचाल करता यावी, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या राज्य संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) मार्फत ड्रोन पायलटसाठी मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. या उपक्रमामुळे तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनवणे आणि स्वावलंबनासाठी नवी दिशा उपलब्ध करून देणे, हा प्रमुख उद्देश आहे.

अमरावती जिल्ह्यात हा कार्यक्रम राबविण्यात येणार असून, या अंतर्गत दहा दिवसांचे डीजीसीएकृत मान्यताप्राप्त प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षणाद्वारे ड्रोन उड्डाण, नियंत्रण, सर्व्हेक्षण व तांत्रिक बाबींचे प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाईल. या प्रशिक्षणामुळे तरुणांना विविध क्षेत्रांतील संधींचे दरवाजे खुले होतील.

**विविध अभ्यासक्रमांचा समावेश**- सदर प्रशिक्षणात एकाच वेळी अनेक अभ्यासक्रमांचा समावेश आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून ड्रोन उड्डाण, देखभाल, मोजणी, छायाचित्रण तसेच चित्रफित तसेच मॅपिंग, शेती व आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या विविध क्षेत्रांतील ड्रोन वापराबाबत सखोल माहिती देण्यात येईल. प्रशिक्षण अमरावती शहरासह जिल्ह्यातील इतर प्रमुख ठिकाणी आयोजित केले जाईल.

**पात्रता आणि अर्ज प्रक्रिया**- खुल्या प्रवर्गातील ज्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही, अशा समाजघटकांतील युवक-युवती या प्रशिक्षणासाठी पात्र आहेत. अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असावा, वय १८ ते ५५ वर्षे दरम्यान असावे, तसेच दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.


**या ठिकाणी करावा अर्ज**- इच्छुक उमेदवारांनी ".ैस्प्टि.दु.ग्ह या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा. अर्जासोबत छायाचित्र, ओळखपत्र, अधिवास व शैक्षणिक कागदपत्रे अपलोड करावीत. फिटनेस प्रमाणपत्र व अर्जाची प्रत अमृत संस्थेच्या स्थानिक कार्यालयात सादर करावी. पहिल्या टप्प्यातील अर्ज करण्याची अंतिम तारीख ५ नोव्हेंबर २०२५ असून, प्रशिक्षणाचा प्रारंभ १० नोव्हेंबर २०२५ पासून अमरावती येथे होणार आहे.अधिक माहितीसाठी अमृत कार्यालय, आशीर्वाद, टोपे नगर,मालटेकडी समोर, अमरावती येथे तसेच अमृत अमरावती जिल्हा व्यवस्थापक केदार गोगरकर ९११२२२७६३५ , अमरावती जिल्हा उप व्यवस्थापक ऋषिकेश कथलकर ७२४९८४११५२ तसेच अमृत सखी अश्विनी कोळेश्वर ९५२७३१७०६८ यांचेशी संपर्क करावा.

# आतापर्यंत फक्त ८० लाख लाडक्या बहिणींची के-वायसी पूर्ण

**मुंबई /प्रतिनिधी**-राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीआधी जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. मात्र, यात बोगस लाभार्थी असल्याचे कळल्यानंतर या योजनेवर निर्बंध आणण्यात आले. लाभार्थ्यांना ई-केवायसी बंधनकारक करण्यात आली आहे. मात्र दोन महिने उलटले तरी अद्याप निम्म्यादेखील लाभार्थी महिलांची ई-केवायसी पूर्ण झालेली नाही.तांत्रिक अडचणींमुळे २.४० कोटी महिलांपैकी फक्त ८० लाख महिलांचीच ई-केवायसी पूर्ण झाली आहे. त्यामुळे विभागासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. महिला बालविकास विभागाकडून चालविण्यात येणाऱ्या लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांची १८ सप्टेंबरपासून ई-केवायसी करण्यास सुरुवात झाली.मात्र कधी ओटीपी येण्यात अडचण, तर कधी आधार लिंक अडचणीमुळे ई-केवायसी करताना अडथळे येत आहेत.

**आरोग्य आणि निरोगी जीवनशैली उत्पादने**-याबाबत प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार ८० लाख महिलांची ई-केवायसी पूर्ण झाली असून १८ नोव्हेंबर आधी ई-केवायसी पूर्ण करण्याचे आव्हान आहे. पुढील आठवड्यापर्यंत जास्तीत जास्त महिलांची ई-केवायसी पूर्ण करून पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी




सर्व्हरची क्षमता वाढवून प्रति दिन पाच लाखांऐवजी प्रति दिन १० लाख करण्यात आली आहे. यामुळे १८ नोव्हेंबरपर्यंत सर्व लाभार्थ्यांची ई-केवायसी पूर्ण होणे अपेक्षित आहे. मात्र काही प्रमाणात लाभार्थ्यांची ई-केवायसी राहिल्यास तत्कालीन परिस्थिती पाहून निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली.

**विधवा महिलांबाबतच्या समस्यांवर तोडगा**-विधवा तसेच घटस्फोटित महिलांना ई-केवायसी करण्यात मोठी अडचण येत आहे. पती तसेच वडीलही हयात नसल्याने त्यांना ई-केवायसी करता येत नसल्याच्या तक्रारी आहेत.

## जिल्ह्यासाठी १२ 'आधारभूत' खरेदी केंद्रांना मंजुरी
### शेतकऱ्यांना तातडीने नोंदणीचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः**- अमरावती जिल्ह्यामध्ये खरीप पणन हंगाम २०२५-२६ अंतर्गत धान (भात) आणि भरडधान्य (ज्वारी, बाजरी, इ.) खरेदी करण्यासाठी किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत एकूण १२ खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे. खरेदी केंद्र निवड समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ही मान्यता प्रदान केली आहे.

जिल्ह्यातील मोर्शी, वरुड, अचलपूर आणि चांदूर बाजार या तालुक्यांतील प्रत्येकी एक, अशा ४ सामान्य खरेदी केंद्रांना मंजुरी मिळाली असून, ही केंद्रे तालुका खरेदी विक्री संस्थांमार्फत चालवली जातील. यात्यतिरिक्त, धारणी आणि चिखलदरा या आदिवासी बहुल तालुक्यांतील अनुसूचित जनजाती क्षेत्रासाठी विशेषतः ८ खरेदी केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. आदिवासी विकास महामंडळामार्फत ही केंद्रे चालवली जातील. यामध्ये धारणी तालुक्यात सावलीखेडा, साद्रावाडी, धारणी, चाकर्दा, हरिसाल, बैरागड तसेच चिखलदरा तालुक्यात आणि गौलखेडा बाजार येथील केंद्रांचा समावेश आहे. तसेच विदर्भ को-ऑपरेटिव मार्केटिंग फेडरेशन तर्फे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे , जिल्हा मार्केटिंग अधिकारी बिसेने, विदर्भ को-ऑपरेटिव मार्केटिंग फेडरेशनचे विघळे, आदिवासी विकास महामंडळाचे संतोष आमटे यांच्यासह संबंधित विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व खरेदी प्रतिनिधींनी शासनाच्या धोरणानुसारच शेतकऱ्यांचे धान्य खरेदी करण्याचे निर्देश दिले. शेतकऱ्यांनी आपल्या शेतमालाची आधारभूत किंमतीने विक्री करण्यासाठी लवकरात लवकर शासकीय पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले आहे.

**जिजाऊ कमर्शियल को -ऑप बँक लिमिटेड अमरावती.**
मुख्य कार्यालय : जिजाऊ, प्लॉट नं. ३३ व ३४, ...
फोन नं २५६००४७, २५३००५६, फॅक्स नं (०७२१) २५६६१५६
Website – www.jijaubank.org.in Email id – jijaubankamravati@gmail.com
जा.क्र./जाहिरात/निविदा/९३१/२०२५
**निविदा** दिनांक - ०६/११/२०२५
बँकेच्या एकूण १०२ स्थायी व अस्थाई कर्मचाऱ्यांना सरासरी वयोगट ३० ते ५८ वर्षाकरिता आरोग्य विमा व अपघाती विमा काढण्याकरिता तसेच बँकेचे कर्जदार यांचे दिनांक ३१/१०/२०२५ वरील कर्ज बाकी रकमेवर अपघाती विमा नामांकित जनरल विमा कंपनीकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सिलबंद लिफाफ्यात दि.१५/११/२०२५ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लि. अमरावती या नावे मुख्यालयात सादर कराव्यात.
मुख्य कार्यकारी अधिकारी
दिनांक :- ०६/११/२०२५ जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि. अमरावती

पान १ व १० वरून

## राज्यात थंडीची चाहूल

सक्रिय आहे. त्याला लागूनच समुद्र सपाटीपासून ५.८ किलोमीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. राज्यात ६ नोव्हेंबर रोजी कोकण, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मध्य महाराष्ट्र, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, आणि मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड या जिल्ह्यांत विजांसह पावसाची शक्यता आहे. उर्वरित राज्यात ढगाळ आकाशासह कमाल व किमान तापमानात चढ - उतार होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. जळगाव जिल्ह्यात थंडीची चाहूल लागली असून आज सकाळी वातावरणात धुकं पाहायला मिळालं.शहराने धुक्याची चादर पांघरली होती. त्यामुळे दृश्यमानता १०० मीटरपर्यंत होती. परिसरात दृश्यमानता ७० मीटरवर होती. जिल्ह्यात ६ ते ८ नोव्हेंबरपासून थंडी तर ८ तारखेनंतर गारठा जाणवेल. किमान तापमान १३ ते १७ तर कमाल तापमान २९ ते ३१ अंश राहील. ६ नोव्हेंबरच्या संध्याकाळपासून हवेत काहीसा कोरडेपणा आणि गारवा जाणवेल परिणामी आर्द्रता देखील घटेल व त्यामुळे थंडीचा जोर हळूहळू वाढेल. थंडीचे आगमन होणार असल्याचे हवामान अभ्यासक यांनी सांगितले.

## दिल्लीत महत्त्वाची सहकार

प्रामुख्याने उपस्थित राहतील. ही एक ऐतिहासिक परिषद ठरणार असल्याचे सांगण्यात येते. परिषदेचे उद्दिष्ट निश्चित झाले आहे. परस्पर सहकार्य, नवोन्मेष व धोरणात्मक प्रगतीद्वारे शहरी सहकारी पत क्षेत्रास बळकटी देण्याचा हेतू आहे. ही परिषद त्यावर प्रकाश टाकणार.

या परिषदेत शहरी सहकारी बँका तसेच पतसंस्था यांचा १०० टक्के सहभाग अपेक्षित धरण्यात आला आहे. आयोजन स्थळ विज्ञान भवन येथे १२०० व्यक्तींची आसन क्षमता आहे. त्यामुळे प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य, असा निकष ठेवण्यात आला आहे. शुल्क भरल्यानंतच सहभाग निश्चित होईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. यात सहभागी होण्यासाठी येथील सुप्रसिद्ध वर्धा अर्बन मल्टीस्टेट बँकेचे अध्यक्ष सुधाकर साटोणे यांनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. कुपकुंभ २५ हे आयोजन सहकारी पतसंस्थासाठी महत्वपूर्ण असे राहणार. शहरी पतसंस्था पुढे काळानुसार विविध आव्हाने उभी ठाकली आहे. त्यास चांगले वळण मिळणे अपेक्षित आहे. केंद्रीय सहकारमंत्रीपद भूषविणारे अमित शहा हे पुढील वाटचालीबाबत मार्गदर्शन करतील. ती धोरणात्मक बाब राहील. ही प्रामुख्याने बहुराज्यीय पतसंस्थांची म्हणजे ज्या केंद्रीय सहकार खात्याशी निगडित आहेत, अश्या पतसंस्थांच्या प्रतिनिधीची परिषद आहे.

## पुन्हा भारत-पाक यांच्यातील

जर टॅरिफस नसते, तर हे कधीच घडलं नसतं. ट्रम्प यांनी १० मे रोजी सोशल मीडियावर जाहीर केले होते की, दीर्घ चर्चेनंतर भारत आणि पाकिस्तान यांनी पूर्ण आणि तत्काळ युद्धविरामावर सहमती दर्शवली आहे. मात्र, भारताने वारंवार स्पष्ट केले आहे की, या प्रक्रियेत कोणत्याही तिसऱ्या पक्षाची भूमिका नव्हती. भारताचा ठाम दावा आहे की सर्व प्रश्न हे द्विपक्षीय आहेत आणि बाह्य मध्यस्थतेची गरज नाही.भारताने ७ मे रोजी ऑपरेशन सिंदूर सुरू केले होते, जे पाकिस्तान आणि पाक-व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी ढाच्यांवर लक्ष्य ठेवून करण्यात आले होते. ही कारवाई २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरात होती, ज्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला होता. सीमापार ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले चार दिवस चालले, आणि १० मे रोजी दोन्ही देशांनी संघर्षविरामावर सहमती दर्शवली.आपल्या भाषणादरम्यान ट्रम्प यांनी आणखी दावा केला की त्यांनी कोसोवोसर्बिया, काँगोरवांडा, इस्रायलइराण, इजिप्तइथिओपिया, आर्मेनियाअझरबैजान आणि कंबोडियाथायलंड यांच्यातील जुने युद्धही संपवले. ते म्हणाले, काही युद्धे ३२ वर्षांपासून चालू होती, काही ३८ वर्षांपासून. मी त्यापैकी अनेक वाद एक तासात सोडवले तेही संयुक्तराष्ट्रांच्या मदतीशिवाय.ट्रम्प म्हणाले, अमेरिका शक्तीच्या माध्यमातून शांती आणत आहे. आता कोणताही देश आमच्याशी पंगा घ्यायला तयार नाही. त्यांनी चीन, जपान आणि मलेशिया यांच्यासोबत झालेले अलीकडील व्यापार करारांचाही उल्लेख केला आणि म्हटले की हे सर्व देशांसाठी फायदेशीर आर्थिक करार आहेत.

## १८०० कोटींचा पार्थ पवारांवर

सरकार आहे की ते मेवाभाउ आहेत? असा सवाल त्यांनी केला. पार्थ पवार यांच्या कंपनीला जमीन देण्यासाठी दोन दिवसांत फाईल पुण्यातून मुंबईत येते आणि उद्योग विभागाकडून त्याला मंजुरी दिली जाते. १८०० कोटींची जमीन ३०० कोटींमध्ये फक्तस्टँप पेपरवर खरेदी केली जाते. एवढ्या वेगाने जर काम होत असेल तर हे सामान्य माणसासाठी का होत नाही?

**जमिनी परत कराव्या लागतील**- माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, महाराष्ट्रात फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घ्यायचे आणि महार वतनाची जमीन घशात घालायची हा अजित पवारांचा पुरोगामी महाराष्ट्र आहे का? असाही सवाल त्यांनी एक्स या सोशल मीडिया अकाउंटवरील पोस्टमधून केला.माध्यमांसोबत बोलताना अंबादास दानवे म्हणाले की, पुण्याचे जिल्हाधिकारी म्हणतात की जमीन अजून आमच्या ताब्यात आहे. जर अशा प्रकारे त्यांनी जमीन परत केली असेल तर राज्यातील सर्वच ठिकाणी अशा प्रकारे जमिनी परत कराव्या लागतील, असेही ते म्हणाले.

## योग्य ते चौकशीचे आदेश दिलेले

यांनी स्पष्ट केली. अंबादास दानवे यांनी केलेल्या आरोपांनुसार, पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने पुण्याच्या कोरेगाव पार्क येथील सुमारे १८०० कोटी बाजारमूल्य असलेल्या जमिनीची ३०० कोटींना खरेदी केली. केवळ एक लाख रुपये भांडवल असलेल्या या कंपनीने या जमिनीवर आयटी पार्क उभारण्याचे तयारी चालवली आहे. त्यामुळे या प्रकल्पाची स्टॅम्प ड्युटीही माफ करण्यात आली, असा आरोप दानवे यांनी केला.

अंबादास दानवे यांनी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले, एवढ्यावर हा प्रवास थांबला नाही तर या कंपनीने रियल इस्टेटचे भाव गगनाला असलेल्या कोरेगाव पार्क (पुणे) येथे चक्क आयटी पार्क आणि डेटा सेंटर उभारण्याची तयारीही चालवली. एक लाखाचे भांडवल असलेल्या कंपनीला हे कसे काय शक्य होते, (ते ही महार वतानाची जमीन असताना) हे आता पार्थ पवारांनी समोर येउन सांगावे, जेणेकरून इतर तरुणांनाही त्यांच्या या यशाचे गमक कळून येईल!

## आत्या मी काही चूक

सरकारी होती, तर मग ती विकता येते का? जर विकता येत असेल तर नियमाप्रमाणे व्यवहार झाला का? दुसरा महत्वाचा मुद्दा तहशीलदार म्हणतात की मी त्यावर स्वाक्षरी केली नाही, मग जर स्वाक्षरी केली नसेल तर व्यवहार कसा झाला?, असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला आहे. पार्थ पवारांशी काही बोलणं झालं का? असा प्रश्न माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारला असता सुप्रिया सुळे म्हणाल्या की, हो, सकाळीच पार्थ पवारांना फोन केला आणि विचारलं की नेमकं विषय काय आहे जरा समजून तरी सांगा. त्यावर पार्थ पवार मला म्हणाले की आत्या मी काहीही चूक केलेली नाही आणि माझ्या वकिलांशी माझं बोलणं झालं आहे. मग जर पार्थ पवारांचं वकिलांशी बोलणं झालं असेल तर वकील याबाबत स्पष्टीकरण देतील, असंही सुप्रिया सुळेंनी म्हटलं आहे.

***मुख्यमंत्री अडचणीत आणत आहेत का?***

पार्थ पवार प्रकरणात मुख्यमंत्री अडचणीत आणत आहेत का? असा प्रश्न सुप्रिया सुळेंना विचारण्यात आला होता. यावर त्या म्हणाल्या, शक्यता नाकारता येत नाही. कारण मुख्यमंत्र्यांनी यात उत्तर दिले पाहिजे. शासनाचे विभाग कुणाला उत्तरदायी असतात तर मुख्यमंत्र्यांना. तहसीलदार म्हणतात त्यांनी सही केलेलीच नाही. तर मग व्यवहार झाला कसा?

***पार्थ पवारांचा यात विषयच नाही***- पार्थ पवार यांचे जमीन व्यवहारात नाव घेतल्यानंतर सुप्रिया सुळेंनी सांगितले की, पार्थ पवारांचा या प्रकरणात काही संबंधच येत नाही. महाराष्ट्र सरकारने पहिल्यांदा सांगितलं की, या जमिनीचा व्यवहार होउ शकत नाही. जर व्यवहारच होउ शकत नसेल तर मुद्रांक शुल्क भरण्याची नोटीस कशी काय आली? मुद्रांक शुल्क किती असावे? यावरही एकमत नाही. या प्रकरणात गोलमाल दिसत आहे.

## दिल्लीनंतर आता बिहार!

नोव्हेंबर २०२५ रोजी मतदान केल्यानंतर सोशल मीडियावर एक पोस्ट पोस्ट केली. त्यांच्या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की, मी माझ्या वडिलोपार्जित गाव मनसेरपूर (बेगुसराय) येथे मतदान केले. हे गाव साहेबपूर कमाल विधानसभा मतदारसंघात येते. मात्र याच फोटोवरून वादंग निर्माण झाला. राष्ट्रीय जनता दलाने या मतदारसंघातून सतानंद संबुद्धा यांना उमेदवारी दिली आहे. एनडीएने ही जागा चिराग पासवान यांच्या पक्षाला दिली आहे. एलजेपी (आर) ने या मतदारसंघातून सुरेंद्र कुमार यांना उमेदवारी दिली आहे.

राकेश कुमार सिन्हा यांच्या या पोस्टमुळे काही युजरने त्यांच्या जुन्या पोस्टचा उल्लेख केला तेव्हा वाद निर्माण झाला. या वर्षाच्या सुरुवातीला दिल्ली विधानसभा निवडणूक काळात राकेश कुमार सिन्हा यांनीही द्वारका मतदारसंघात मतदान केले होते. राकेश सिन्हा यांची पोस्ट सोशल मीडियावर येताच विरोधकांनी हा मुद्दा उचलून धरला. काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागाच्या अध्यक्षा सुप्रिया श्रीनाते यांनी त्यांना जाब विचारला. राकेश सिन्हा यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये दिल्ली विधानसभा निवडणुकीत मतदान केले. त्यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये बिहार विधानसभा निवडणुकीतही मतदान केले. हे कोणत्या योजनेअंतर्गत घडत आहे, भाउ? असं त्यांनी खोचक प्रश्न केला.

तसेच दिल्ली आपचे प्रमुख सौरभ भारद्वाज यांनीही राकेश सिन्हा वादावर भाष्य केले. भाजपचे राज्यसभेचे माजी खासदार आणि सर्वांना मूल्ये शिकवणारे आरएसएस विचारवंत राकेश सिन्हा यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीत मतदान केले आणि आज बिहार निवडणुकीतही मतदान केले. सिन्हा दिल्ली विद्यापीठाच्या मोतीलाल नेहरू क?लेजमध्ये शिकवतात, म्हणून ते बिहारचा पत्ताही दाखवू शकत नाहीत. जर यातून भाजपा सरकारची चोरी पकडली तर ते सुधारतील? अजिबात नाही ते उघडपणे चोरी करतील असा टोला लगावला आहे.

**नियम काय सांगतो?**-लोकप्रतिनिधी कायदा १९५१ मध्ये मतदार यादींबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. त्यात कलम १७ मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, कोणताही नागरिक एकाच वेळी दोन राज्यांच्या मतदार यादीत असू शकत नाही. याचा अर्थ असा की तो एकाच वेळी दोन राज्यांमध्ये मतदान करू शकत नाही. या नोंदी काढून टाकण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे. जाणूनबुजून असे करणाऱ्यांवर कारवाईचीही तरतूद आहे. निवडणूक आयोग अशा मतदारांवर डुप्लिकेट नोंद कायद्याअंतर्गत कारवाई करू शकतो.

## बिहारमधील १२१ जागांवर

येथे ४०% मतदान झाले. मतदानाच्या पहिल्या टप्प्यातील मतदान पूर्ण झाल्यानंतर, १८ जिल्ह्यांमधील १२१ जागांवर १,३१४ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएममध्ये सील करण्यात आले. यापैकी १०४ जागा थेट लढवल्या जातात, तर १७ जागा त्रिपक्षीय लढवल्या जातात. बिहारमधील २४३ जागांसाठी दोन टप्प्यात निवडणुका होत आहेत. १४ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होतील. पहिल्या टप्प्यात दोन उपमुख्यमंत्र्यांसह १८ मंत्र्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. तेजस्वी यादव, तेज प्रताप यादव, सम्राट चौधरी, विजय कुमार सिन्हा आणि अनंत सिंग यांच्यासह १० जागा आहेत.

## पार्थ प्रकरणावरून अण्णा

ाकार केवळ कारवाई थांबणार नाही. अशा प्रकरणांविरोधात कारवाई करण्यासाठी सरकारने विशेष धोरणे आखून त्याचा अवलंब केला पाहिजे. या प्रकरणाविरोधात कठोर पावले उचलली पाहिजेत. असे वागणाऱ्या लोकांना कडक शासन केले पाहिजे, असेही अण्णा हजारे म्हणाले. पुण्यातील कोरेगाव पार्कमधील ४० एकर जमिनीच्या व्यवहारावरुन पार्थ पवार यांच्यावर आरोपांच्या फैरी झडत आहेत. त्यांच्यामुळे अजित पवारही अडचणीत आले आहेत. पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांच्या १ लाखांचे भाग भांडवल असलेल्या अमेडिया या कंपनीने तब्बल १८०४ कोटी रूपये किंमत असलेली जमीन, अवघ्या ३०० कोटींत खरेदी केली आहे. जी जमीन अमेडियाने खरेदी केली, ती महार वतनाची आहे. वतनाच्या जमिनी या अहस्तांतरीत असतात. तरीही हा व्यवहार झाल्याने बड्या व्यक्तीनेच सूत्रे हलविल्याचा संशय आहे.

## मागणी असणाऱ्या रोजगारक्षम

नियोजनमधून यावर्षी बचतगटांना एक लाख रूपये देण्यात येणार आहे. त्यामुळे किसान ड्रोनच्या प्रशिक्षणामध्ये महिलांना प्राधान्य द्यावे. प्रशिक्षणानंतर बचतगटाच्या माध्यमातून ड्रोन खरेदी केल्यास महिलांना रोजगाराचे साधन उपलब्ध होऊ शकेल. जिल्ह्यात प्रामुख्याने कृषी आधारीत उद्योगासाठी प्रशिक्षण देण्यात यावे. यासाठी कृषि विकास केंद्रांना सहभागी करून घ्यावे. यात कमी खर्चात उद्योग सुरू करता येतील, असे प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात यावे. शहरी भागात उद्योजकांना प्रशिक्षित लेखापालाची गरज आहे. त्यामुळे यात कार्यरत संस्थांच्या मदतीने प्रशिक्षण दिल्यास युवकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल, असे त्यांनी सांगितले.यावेळी जागर करीअरचा, अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम आदींचा आढावा घेण्यात आला.

## नांदगाव नगरपंचायत निवडणुकीसाठी

निवडणूक भाजप आणि काँग्रेसच्या राजकीय अस्तित्वाची ठरू पहात आहे अशी मतदारात चर्चा आहे. कोणत्याही राजकीय पक्षाचे नगराध्यक्ष व प्रभागातील उमेदवार अद्याप निश्चित झाले नसले तरी उमेदवारी मिळविण्यासाठी स्थानिक इच्छुक कार्यकर्ते पक्षाच्या वरिष्ठाकडे मनधरणी करून प्रयत्नाची पराकाष्टा करीत आहे. नगराध्यक्ष व नगरसेवकांसाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांमध्ये अनेक जण इच्छुक असून याशिवाय इतरही राजकीय पक्ष आणि इच्छुक अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उडी घेऊन आपली राजकीय ताकद अजमावण्याच्या तयारीत असल्याने येणाऱ्या निवडणूकीत चुरस वाढवून राजकीय घमासान होणार आहे. मात्र राजकीय पक्षांच्या उमेदवारी निश्चित झाल्यानंतर निवडणुकीचे खरे राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे.

## ८ व ९ नोव्हेंबरला भव्य निशुल्क

खोडके,आमदार सुलभा खोडके,प्रमुख अतिथी असतील तर जिल्ह्यातील सर्व वरीष्ठ अधिकारी मान्यवर प्रमुख पाहुणे असतील. विभागीय आयुक्त श्वेता सिंघल,पोलिस आयुक्त अरविन्द चावरिया,जिल्हाधिकारी आशिष येरेकर,मनपा आयुक्त सोम्या (शर्मा) चांडक,पोलिस अधिक्षक विशाल आनंद,अमरावती जि प सी ई ओ संजिता महापात्र विशेष अतिथी राहतील तसेच संमेलनात संत श्री शक्ति महाराज,संत श्री सचिन देव महाराज, संत श्री डाँ संतोषदेव महाराज आणि महात्मा फुले अर्बन को आँप बँक. के अध्यक्ष दिलीपराव लोखंडे विशेष अतिथी म्हणुन उपस्थित राहतील.

भव्य दिव्य निशुल्क महायोग शिबिर व महायोग संमेलना ला यशस्वी करण्यासाठी खासदार डॉ.अनिल बोंडे, मुख्य आयोजक चंद्रकुमार जाजोदिया,सह आयोजक नानकराम नेभनानी, प्रांत संरक्षक राव यशपाल आर्य, भारत स्वाभिमान राज्यप्रभारी दिनेश राठोड, पतंजलि राज्यप्रभारी अनिल अम्रुतवार, संयोजक तथा प्रान्त सदस्य अशोक मुंधडा,संरक्षक कमलकिशोर मालाणी, महिला प्रान्त प्रभारी संजीवनी माने,युवाभारत प्रान्त प्रभारी शंकरजी,प्रान्त कोषाध्यक्ष प्रदीप काटेकर,प्रान्त सह कोषाध्यक्ष प्रल्हादजी सुलताने, पतंजलि योग समिती जिल्हा प्रभारी गिरिधर देशमुख, भारत स्वाभिमान जिला प्रभारी योगेश राठी,किसान पंचायत जिल्हा प्रभारी रतिलाल सातपुते, युवाभारत जिल्हा प्रभारी अक्षय धानोरकर, युवाभारत राज्यस्तरीय सदस्य सुधीर असतकर,जनसंपर्क अधिकारी नरेन्द्र महानाग,परिश्रम घेत आहे. तसेच जिल्ह्यातील तहसील प्रभारी,अमरावती चे सर्व योगशिक्षिक, योगशिक्षिका,योगसाधक प्रचार व प्रसार करीत आहे.

## विधीसंघर्षीत बालक ताब्यात,

आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक अमोल कडू, दीपक सुंदरकर, आस्तीक देशमुख, जहीर शेख, संग्राम भोजने, अतुल संभे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, राजीक रायलीवाले, चेतन कराळ, प्रभात पोकळे यांनी केली.

## त्रिशा मिश्राचे थायलंडमध्ये

पालकांचा आधार आहे. त्रिशाच्या या कामगिरीबद्दल अचलपूरकरांनी अभिमान व्यक्त केला असून विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्रिशाने यापूर्वीही विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये पुरस्कार मिळवून आपली नृत्यकौशल्याची चमक सिद्ध केली आहे. तिच्या या आंतरराष्ट्रीय यशामुळे अचलपूर शहराचे नाव पुन्हा एकदा उज्ज्वल झाले आहे.

## कारच्या धडकेत दुचाकीस्वार

कारवाई करण्यात आली नसल्याचे तिवसा पोलिसांकडून सांगण्यात आले.मोझरी बायपास वळण मार्ग हा दिवसेंदिवस अपघात प्रवनस्थळ होत असल्याने येथे सुरक्षितता व उपाययोजनेच्या दृष्टीने पाऊले उचलणे गरजेचे आहे.

## दारू अड्ड्यांवर पोलिसांचा छापा;

मोहा सडवा आणि तयार दारू मिळून आला. १ लाख ७१ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. या दोन्ही छाप्यांमुळे परिसरातील दारू व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ही कारवाई ठाणेदार रोशन शिरसाट, पोलीस निरीक्षक (गुन्हे) नीलेश गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक राहुल महाजन, वैभव काळपांडे, अर्जुन राजरपल्लू, सहाय्यक उपनिरीक्षक योगेश श्रीवास, विकास वाकोडे, सारिका देशमुख, हरीश चौधरी, शशिकांत गवई, रोशन वऱ्हाडे, सागर चव्हाण, जावेद पटेल, भारती अस्वार आणि उमेश चुलपार यांच्या पथकाने केली.

## महसूल विभागाची वाळू तस्करांवर

क्रमांकाचा टिप्पर व एक ब्रास काळी वाळू जप्त करण्यात आली. या दोन्ही कारवाईत स्वतः तहसीलदार तथा परिविक्षाधीन उप जिल्हाधिकारी यांनी भाग घेतला. त्यांचे सोबत मंडळ अधिकारी परविन काजी(अली), कविता नांगरे, निवृत्त घुलक्षे, ग्राम महसूल अधिकारी प्रफुल्ल डवरे, विश्वजीत बंगरे मेघाली अढावू, संजय चौधरी, राहुल जोशी, चालक दिनेश राठोड , महसूल सेवक सचिन वानखडे इत्यादी या कारवाईत सहभागी झाले होते.

## त्या भीषण अपघातातील आणखी

बुधवारी बिरोबा जावीर यांचाही मृत्यू झाला. या अपघाताने संपूर्ण परिसर शोकमग्न झाला आहे. चार कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## वंदे मातरम गीतास १५० वर्षे

या गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त 'सार्थशताब्दी महोत्सवा'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण महाराष्ट्रातील ३५८ तालुक्यांमध्ये हा 'गौरव दिन' साजरा होत आहे.

देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी आयोजित केलेल्या या सोहळ्यात तिन्ही औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (संत गाडगेबाबा, भगिनी निवेदिता, दादासाहेब खापर्डे) प्रशिक्षणार्थी आणि निमंत्रित मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत, अशी माहिती अमरावती जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण अधिकारी राम मुळे यांनी दिली आहे.

## भूमि अभिलेख विभागातील गट

संकेतस्थळावर प्ठ्े://र्ेिप्ल्स्ग्.दन्.ग्ह लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पात्र उमेदवाराने विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर देण्यात आलेल्या सुचनांनुसार प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावयाचे असून प्रवेशपत्रावर नमूद परीक्षा केंद्रावर उमेदवाराने दिलेल्या वेळेत उपस्थित राहून परीक्षा द्यावयाची आहे. परीक्षा केंद्र बदलण्याबाबतच्या कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही.

परीक्षा ऑनलाईन पध्दतीने (Computer Baesd Test) होणार असल्यामुळे उमेदवाराचे परीक्षा केंद्र हे महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही जिल्हा, तालुका अथवा इतर ठिकाणी असून शकते. तसेच काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल झाल्यास त्याबाबतची माहिती विभागाच्या https:// mahabhumied.goved.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. परीक्षा पध्दतीबाबतची सविस्तर माहिती पुस्तिका विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता लिंक विभागाच्या उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, असे भूमि अभिलेख विभागाव्दारे प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## मतपत्रिका, पोस्टल मतपत्रिका व मनुष्यबळ व्यवस्थापनावर सविस्तर सादरीकरण – जिल्हाधिकारी

### जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी घेतला आढावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**नगरपालिका, आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणुकीसंबंधीच्या तयारीचा सखोल आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आज दि. ६ नोव्हेंबर रोजी बैठक पार पडली. या बैठकीत मतपत्रिका (बॅलेट पेपर), पोस्टल मतपत्रिका (पोस्टल बॅलेट) तसेच मनुष्यबळ व्यवस्थापन या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर सादरीकरण करण्यात आले.**



या बैठकीस अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, नगरपालिका प्रशासन सहआयुक्त बी.डी. बिक्कड, जिल्हा खनिकर्म अधिकारी विनय राठोड, नगरपालिका प्रशासन सहाय्यक आयुक्त परदेशी, शिक्षणाधिकारी संजय ससाणे, उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव आदी जिल्हास्तरीय नोडल अधिकारी उपस्थित होते.

सादरीकरण श्री. पुंडे व श्री. परदेशी यांनी केले. या सादरीकरणामध्ये मतपत्रिकांच्या छपाई, वितरण, सुरक्षित साठवणूक, तसेच पोस्टल मतपत्रिकांच्या वितरण व प्राप्ती प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. मतदानाच्या दिवशी सर्व मतपत्रिका वेळेत उपलब्ध व्हाव्यात, वाहतूक व सुरक्षा व्यवस्था चोख राहावी यासाठी आवश्यक नियोजन सादर करण्यात आले.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना नियोजनबद्ध कामकाज, अचूकता आणि पारदर्शकता राखण्याच्या सूचना दिल्या. पोस्टल मतपत्रिकांच्या संदर्भात वेळेत अर्ज स्वीकृती, वितरण आणि सुरक्षित साठवणुकीबाबत विशेष दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

मनुष्यबळ व्यवस्थापनासंबंधी मतदान केंद्रांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, कार्यविभाजन, जबाबदाऱ्या तसेच समन्वय यावरही चर्चा झाली. प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीने आणि संवेदनशीलतेने काम करावे, मतदारांना सुकर, सुरक्षित व पारदर्शक मतदानाचा अनुभव मिळावा, असे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी सांगितले की, रॅन्डमायजेशन प्रक्रियेमुळे मतदान केंद्रांवर नेमले जाणारे अधिकारी आणि कर्मचारी हे पूर्णपणे संगणकीय पद्धतीने ठरवले जात असल्याने निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता सुनिश्चित होते. त्यांनी या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना विशेष दक्षता घेण्याचे निर्देश दिले. सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व मुख्याधिकारी दुरदृष्यप्रणालीव्दारे उपस्थित होते.

## डीपीसीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

### नियोजन अधिकाऱ्याकडून कामांची यादी देण्यास नकार

■ समीर ठाकूर ■

***अकोला : जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) माध्यमातून नुकतीच तब्बल १९४ कोटी रुपयांच्या विकासकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. मात्र या कामांची सविस्तर यादी मागितल्यावर नियोजन अधिकारी श्री. सोनखासकर यांनी ती देण्यास नकार दिल्याने पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.***

प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर कामांची माहिती ही सार्वजनिक करण्याची प्रक्रिया अपेक्षित असताना, संबंधित अधिकाऱ्यांनी ती गुप्त ठेवण्याचा घेतलेला निर्णय अनेकांच्या भुवया उंचावणारा ठरला आहे. विशेष म्हणजे, काही मर्जीतील कंत्राटदारांकडे मात्र या यादीची आधीच माहिती पोहोचली असल्याची चर्चा सुरू आहे. पत्रकारांनी अधिकृतपणे ही यादी मागितल्यावर, 'कोणत्या विभागाची कामे हवी आहेत? त्या विभागाशी संपर्क साधा,' असा उपरोधिक सल्ला देत सोनखासकर यांनी टाळाटाळ केल्याचे समजते.

प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर कामांची यादी लपविण्याचे कारण काय, हा प्रश्न उपस्थित होत आहे. या अस्पष्ट भूमिकेमुळे डीपीसीच्या कामकाजातील पारदर्शकतेवर प्रश्न निर्माण झाला असून जिल्हा प्रशासनातील प्रामाणिकतेबाबत शंका व्यक्त केली जात आहे.





**नियोजन समिती कार्यालयात कंत्राटदारांचा वावर चर्चेचा विषय :** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन समितीच्या कार्यालयात कंत्राटदारांचा मुक्त वावर दिसून येत आहे. पत्रकारांना मात्र माहिती देण्यास नकार देणारे अधिकारी, कंत्राटदारांना मात्र कक्षात घेऊन दीर्घ बैठक घेत असल्याने नानाविध चर्चा सुरू झाल्या आहेत.

**पालकमंत्री फुंडकर यांच्याकडे अपेक्षा :** अकोल्याचे पालकमंत्री ना. आकाश फुंडकर यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन नियोजन समिती कार्यालयातील भोंगळ कारभारावर लगाम घालावा, तसेच अधिकाऱ्यांना पारदर्शकतेची जाणीव करून द्यावी, अशी सर्वत्र मागणी होत आहे.

## मंगरुळनाथ येथे कार्तिक पौर्णिमा, नाथ जन्मोत्सव सोहळा साजरा करण्याला सुरुवात



**मंगरूळपीर :** नाथसेवा फाऊंडेशन संत श्री बिरबलनाथ महाराज यांच्या जिवन चरीत्राची अधिकाधिक भक्तांना माहीती व्हावी या ऊदात्त हेतुने गेल्या आठ वर्षापासुन विजेंद्र गुप्ता यांच्या मार्गदर्शनात नाथसेवा फाऊंडेशच्या वतीने सर्व सभासद भक्त कार्य सेवा करत आहे मंगरूळनाथ, गिंभा, साखरडोह, मानोरा, जनुना (खुर्द) आणि जयपूर येथे मोठ्या उत्साहाने साजरा केला. शिवरामजी नारायण घाटे रा. धामणी.यांचे हस्तलिखित ग्रंथ श्री बिरबलनाथ ग्रंथ लीलामृत. प्रथम आवृत्ती... स.न. १९४० श्री सदाशिव दत्तराम घाटे व श्री विनायक नामदेवराव पातुरकर (धामणी खडी) द्वितीय आवृत्ती... स.न. १९८८ श्री देवमनजी नामदेव रावजी राठोड रा. गिंभा तिसरी आवृत्ती...स.न. २०२२ या संग्रहित ग्रंथा मधून संत बिरबलनाथ महाराज यांच्या जन्मतिथीचा उल्लेख मिळाला आहे. बिरबलनाथ महाराज जीवनचरित्र यामध्येही उल्लेख असल्यामुळे कार्तिक पौर्णिमा या तिथीनुसार ग्रामदैवत संत बिरबलनाथ महाराज यांचा जन्मोत्सव साजरा झाला.

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा टीईटी २०२५ २३ नोव्हेंबर रोजी परीक्षा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावतीने महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा टीईटी २०२५ चे आयोजन रविवार, दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात येणार आहे.परीक्षेच्या आयोजना संबंधीची सर्व कार्यवाही सुरू असून, परीक्षेशी निगडित अधिकृत माहिती व सूचना वेळोवेळी अधिकृत संकेतस्थळांवर प्रकाशित केल्या जातील.उमेदवारांनी परीक्षेसंबंधी युट्युब चॅनेल्स, सोशल मिडिया प्लॅटफॉर्म्स किंवा प्रसारमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या अफवा किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन परीक्षा परिषदेने केले आहे.

## मालेगांव नगरपंचायत निवडणुकीत इच्छुकांची झुंबड!; तिकीटासाठी धावपळ, गटबाजीला उधाण

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

नगरपंचायत निवडणुकीचा बिगुल वाजताच मालेगांव शहरात राजकीय हलकल्लोळ माजला आहे. नगरसेवकपदाच्या तिकीटासाठी इच्छुकांची अक्षरश झुंबड उडाली आहे. प्रत्येक प्रभागातून अनेक दावेदार पुढे सरसावत असून कोणाला तिकीट मिळणार या प्रश्नावर सर्वत्र तर्कवितर्क सुरू आहेत.

पक्षांच्या कार्यालयांत दिवसभर गर्दी शिफारशीचे फोन, मोठ्या नेत्यांकडे धावपळ असे दृश्य सर्वत्र दिसून येत आहे. काही इच्छुकांनी तर आपली ताकद दाखवण्यासाठी जनसंपर्क मोहिमा, पोस्टरबाजी, सोशल मीडियावर प्रचार सुरू केला आहे. तर काहींनी मोठ्या नेत्यांच्या घरापुढे उभे राहून पाठबळ मिळवण्याचे राजकीय प्रयोग सुरू केले आहेत. तिकीट वाटपावरून काही ठिकाणी गटबाजी आणि अंतर्गत भांडणेही उफाळून आली आहेत. आम्ही पहिल्यापासून काम केले मग नव्याने आलेल्यांना तिकीट का? असा प्रश्न अनेक जुन्या कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे.



एकूणच मालेगांव नगरपंचायत निवडणूक म्हणजे इच्छुकांची गर्दी गटबाजीचा गडगडाट आणि सत्तेच्या आसनासाठी सुरू झालेली धडपड राजकीय तापमान चरमसीमेवर असून पुढील काही दिवसांत कोणाची झोळी उमेदवारीने भरते आणि कोणाची स्वप्नं फुटतात हे पाहणं तितकंच रोमांचक ठरणार आहे.

दरम्यान, नागरिकांमध्येही चर्चांचा विषय म्हणजे 'यंदा मत कामावर मिळेल की पैशावर? काही मतदार म्हणतात यावेळेस विकासच हवे, दिखावा नाही

## मेडशी सर्कलमध्ये जबरदस्त एन्ट्री!

### मनीषा संदीप डाखोरे ZP निवडणुकीच्या रिंगणात

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मेडशी सर्कलमध्ये जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठा राजकीय भूकंप झाला आहे. समाजकार्यात नेहमी अग्रेसर राहणाऱ्या मनीषा संदीप डाखोरे यांनी यंदा एऊ प्रवर्गातून जिल्हा परिषदेसाठी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असून, त्यांच्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

आता थांबायचं नाही...! या निर्धारासह मनीषा डाखोरे यांची मैदानात दमदार एन्ट्री घेतली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील वंचित, दुर्बल घटकांसाठी त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना लोकांमध्ये प्रचंड लोकप्रियता मिळाली आहे. महिलांच्या स्वावलंबनासाठी विविध उपक्रम, शिक्षण क्षेत्रातील योगदान आणि सामाजिक प्रश्नांवर घेतलेली ठाम भूमिका यामुळे त्या 'जनतेच्या मनीषा ताई म्हणून ओळखल्या जातात.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, 'सर्वत्र सध्या फक्त मनीषा ताईंचाच बोलबाला आहे.' त्यांच्या प्रचाराची सुरुवात होताच तरुण वर्ग आणि महिला मंडळांचा प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. राजकीय निरीक्षकांच्या मते, मनीषा डाखोरे यांच्या उमेदवारीमुळे या सर्कलमधील निवडणूक रंगतदार होणार असून, त्यांचे समाजकार्य आणि लोकसंपर्क हेच त्यांच्या विजयाची गुरुकिल्ली ठरण्याची शक्यता आहे.

## नि:शुल्क पिरॅमिड ध्यान शिबीर; वाशिमकरांसाठी सुवर्णसंधी!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील नागरिकांसाठी पिरॅमिड मेडिटेशन सोसायटी, वाशिम यांच्या वतीने नि:शुल्क पिरॅमिड ध्यान शिबीर रविवार, दि. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे. हे शिबीर हॅपी फेसेस स्कूल, हिंगोली नाका, वाशिम येथे होणार असून, सकाळी १०.०० ते १.०० पहिले सत्र, दुपारी १.०० ते २.०० अन्नप्रसाद व दुपारी २.०० ते ४.०० दुसरे सत्र होईल.

प्रमुख वक्ते ध्यानरत्न पी. व्ही. रामा राजू सर, संचालक पिरॅमिड मेडिटेशन सोसायटी, इंडिया व देवयानी नवगजे, सीनियर पिरॅमिड मास्टर, रिदमिक पिरॅमिड ध्यान केंद्र, नांदुरा हे असणार आहे.ध्यानामुळे शरीरातील



रोगप्रतिकारक शक्ती वाढते, मानसिक आजारांवरील त्रास कमी होतो, अनेक व्याधींवर नियंत्रण मिळते. विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, स्मरणशक्ती व आत्मविश्वास वाढतो. मनःशांती, सकारात्मकता, कार्यक्षमता आणि आर्थिक समृद्धी साध्य होते, तसेच ध्यान आपल्याला जीवनाचा खरा अर्थ समजून घेण्यास मदत करते.या शिबिरास माहेश्वरी ज्येष्ठ नागरिक मंडळ, राजस्थानी महिला मंडळ, पतंजली योग समिती, वाशिम जिल्हा व्यापारी महासंघ, जेसीआय वाशिम सिटी, श्री श्री रविशंकर संस्था, ब्राह्मण महासभा तसेच अनेक सामाजिक व आध्यात्मिक संस्थांचे सहकार्य लाभले आहे.सर्वांनी किमान १५ मिनिटे आधी उपस्थित राहावे, अशी आयोजकांनी सूचना दिली आहे. तसेच पिण्याचे पाण्याची बाटली सोबत आणावी, असे सुचविले आहे.

प्रमुख कार्यकर्ते: रुपेश लड्डा, सुमित खनी, संजय व्यास, रवींद्र बेतूले, डॉ. नारायण डाळे, एकनाथ सुरुशे, रामदेव भाटी, महेश गुप्ता, आशिष केला, पंकज गडिया, अनिल सोमाणी, दत्ताभाऊ खोडके असे अनेकांचे सहकार्य लाभत आहे. असे या निशुल्क ध्यान शिबिरांचे वाशिम करांनी लाभ घ्यावा.

## नेत्रहीन दिव्यांगानी घेतली महावितरण अधीक्षक अभियंताची भेट





**वाशिम :** स्थानिक एकबुर्जी धरणालगत असलेल्या चेतन सेवांकुर येथील नेत्रहीन मुलांनी विद्युत महावितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता अजय शिंदे यांची शुक्रवारी भेट घेतली.

शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या एकबुर्जी धरण परिसरात मागील पंधरा दिवसांपासून विद्युत पुरवठा खंडित झाल्याने या परिसरासह जन्मतः अंध असलेल्या नेत्रहीन मुलांचे निवासस्थान चेतन सेवांकुर याठिकाणी सर्वत्र अंधकार पसरला होता.जीवनात नियतीने अंधकार घातलेला असताना परिसरात विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे या मुलांनी विद्युत महावितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता अजय शिंदे यांची भेट घेऊन त्यांना खंडित विद्युत पुरवठा बाबतच्या अडचणी मांडल्या. दिवाळी सारखा सण अंधारात गेल्यामुळे अधीक्षक अभियंता शिंदे यांनी लवकरात लवकर ही समस्या दूर करण्यासाठी अधिकारी राजेश चव्हाण यांना निर्देश दिले.यावेळी चेतन सेवांकुरचे संचालक पांडुरंग उचितकर यांच्या सह विलास कोल्हे, पांडुरंग सरनाईक, चेतन उचितकर, दशरथ जोगदंड, अमोल गोडघासे, विजय खडसे, गजानन दाभाडे, अश्विनी पवार आदी उपस्थित होते.

## जे.डी.चवरे विद्यामंदिरच्या माजी विद्यार्थिनींचे प्रेरणादायी मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

स्थानिक जे.डी.चवरे विद्यामंदिर मध्ये दि.४नोव्हें रोजी शाळेच्या माजी विद्यार्थिनींच्या मार्गदर्शनाचा कार्यक्रम पार पडला.

दिवाळीनिमित्त आपल्या गावी परतलेल्या कु.श्रेया आणि कु.साक्षी सोळंके या बहिणींनी याप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आपल्या शैक्षणिक प्रवासाचा लेखाजोखा उलगडून सांगितला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.


पाहुण्यांच्या स्वागतानंतर श्री गजानन चौधरी यांनी या भगिनीद्वयांचा परिचय करून दिला. कु.श्रेयाने विचार व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी कसदार पुस्तकांचे वाचन करावे व आपलं ध्येय



गाठण्यासाठी अभ्यासाचा ध्यास धरवा अशी भावना व्यक्त केली.तसेच विदेशी विद्यापीठातील शिक्षणासाठीच्या तयारी संबंधी विस्तृत माहिती सांगितली. कु.साक्षीने आपल्याला आवडणाऱ्या विषयाचा आईवडिलांकडे पाठपुरावा करीत अभ्यासाची सर्व कौशल्ये पणाला लावावी असे सूचविले. श्री प्रमोदभाऊ चवरे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनातून प्रस्तुत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक श्री श्रीनिवास जोशी यांनी अशा गुणी विद्यार्थ्यांचे शाळेत सदैव स्वागतच राहील असे सांगून त्यांनी संपादीत केलेल्या नेत्रदीपक यशाचे कौतुक केले. याप्रसंगी श्रेयाचे आईवडील आणि स्नेहीजन आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कैलास सोनुले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिजित देशपांडे, महेंद्र धनस्कर तथा शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## कानडे बाल रुग्णालयाजवळून दुचाकी चोरी; चोरटा सीसीटीव्हीमध्ये कैद



■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील कानडे बाल रुग्णालयाजवळ दुचाकी चोरीची घटना घडली असून, चोरटा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याने पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आडोळी येथील लक्ष्मणराव इढोळे यांची स्प्लेंडर प्रो (क्र. श्प १५ र्पै २७४२) ही दुचाकी दि. ५ नोव्हेंबर रोजी दुपारी सुमारास दोन वाजता रुग्णालयाजवळून चोरीला गेली. घटनेनंतर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, चोरटा सदर वाहन घेऊन जात असल्याचे स्पष्ट दिसून आले आहे.

चोरीची तक्रार वाशिम शहर पोलिस ठाण्यात नोंदविण्यात आली असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## मातंग समाज राजकीय अस्मिता शहर समितीची कार्यकारणी गठीत

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक लोकनेते क्रांतीसम्राट बाबासाहेब गोपले भवन क्रांतिवीर लहुजी नगर वाशिम येथे दि. ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता मातंग समाजाच्या विविध संघटनेच्या वतीने तातडीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीला अध्यक्ष स्थानी बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भाई जगदीशकुमार इंगळे तर प्रमुख उपस्थिती अखिल भारतीय मातंग संघ राज्य कार्याध्यक्ष संजय वैरागडे, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे जिल्हास्तरीय जयंती उत्सव समिती अध्यक्ष राम बाजड, मनसे वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष गजानन वैरागडे, राष्ट्रीय लहू शक्ती संघटना जिल्हा अध्यक्ष रवीकुमार कांबळे, लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष मोहनराज दुतोंडे, लहुजी शक्ती सेनेचे पदाधिकारी संतोष



खंदारे, समाजसेवक अजय रणखांब, शिवसेनेचे शहराध्यक्ष आकाश कांबळे, आदींची उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांनी शहरातील मातंग समाजाच्या राजकीय सामाजिक आर्थिक व सर्वांगीण विकासाकरिता शहर समिती गठीत करणे आवश्यक असल्याचे मनोगत व्यक्त केले. यावेळी सभेचे अध्यक्ष बिगर सातबारा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भाई जगदीशकुमार इंगळे म्हणाले की, समाजाला कुणाच्यातरी नेतृत्वात संघटित होऊन एकत्र आल्याशिवाय समाजाचा विकास होणे शक्य नाही, आणि त्याशिवाय समाजावरील अन्याय, अत्याचार थांबणार नाही असे महत्वपूर्ण मनोगत व्यक्त केले. यावेळी सर्वांनी साधक-बाधक चर्चा केली. बैठकीमध्ये सर्वानुमते अखिल भारतीय मातंग संघ राज्य कार्याध्यक्ष संजय वैरागड यांची मातंग समाज राजकीय अस्मिता शहर समितीचे अध्यक्षपदी निवड करण्यात आली. समितीच्या उपाध्यक्षपदी रवीकुमार कांबळे जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय लहू शक्ती संघटना , तर कार्याध्यक्षपदी मोहनराज दुतोंडे जिल्हाध्यक्ष लहुजी शक्ती सेना , सचिव पदी राम बाजड समाजसेवक, कोषाध्यक्ष गजानन वैरागडे जिल्हाध्यक्ष मनसे वाहतूक सेना यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी मुख्य मार्गदर्शक तथा संघटक पदी भाई जगदीशकुमार इंगळे संस्थापक अध्यक्ष बिगर सातबारा शेतकरी संघटना यांची निवड करण्यात आली. कार्यकारी सदस्य पदी संतोष खंदारे, आकाश कांबळे व अजय रणखांब यांची निवड करण्यात आली. मातंग समाज राजकीय अस्मिता शहर समितीचे नवनियुक्त अध्यक्ष संजय वैरागडे म्हणाले की, या महत्वपूर्ण बैठकीचे आयोजक राम बाजड यांचे सह उपस्थित पदाधिकारी यांनी माझ्यावर विश्वास ठेवून जी जबाबदारी दिली ती जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणार समाजाच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही समितीचे ध्येय धोरणाचे काटेकोरपणे पालन करून समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्न करत राहू. वाशिम शहराची एवढी मोठी लोकसंख्या असताना मातंग समाजाला आतापर्यंत केवळ दोन सदस्य नगरपालिकेत पाठवता आले ही राजकीय नैराश्यता कमी करून मातंग समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन संघर्ष करू राजकीय पक्षाने समितीच्या मागणीप्रमाणे उमेदवारी न दिल्यास समितीच्या वतीने स्वतंत्र निवडणूक लढविण्यात येईल असा इशारा दिला. यावेळी सूत्रसंचालन रविकुमार कांबळे यांनी केले तर आभार मोहनराज दुतोंडे यांनी मांडले.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३३८ ■ शुक्रवार ७ नोव्हेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# जिल्ह्यातील सहा नगर परिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

## निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती

**वर्धा जनमाध्यम ;** राज्य निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील वर्धा, हिंगणघाट, आर्वी, पुलगाव, देवळी व सिंदी (रेल्वे) या नगर परिषदेच्या सदस्य व अध्यक्ष पदासाठी सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला आहे. यासाठी जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी नगर परिषदनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या कार्यक्रमाच्या दिनांकापासून नगर परिषद क्षेत्रात आदर्श आचार संहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूकीकरीता नागरिकांना १० ते १७ नोव्हेंबर दुपारी २ वाजेपर्यंत निवडणूक विभागाने निश्चित केलेल्या संकेतस्थळावर नामनिर्देशनपत्र भरता येईव व त्याची प्रत त्या त्या नगरपरिषदेच्या ठिकाणी दुपारी ३ वाजतापर्यंत सुटीचे दिवस वगळता नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येईल. दि.१८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजतापासून नामनिर्देशनपत्राची छाननी व लगेच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईल. अपील नसेल तेथे दि.२१ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. अपील असल्यास अपीलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पुर्वी मात्र दि.२५ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. दि.२६ नोव्हेंबर रोजी निवडणूक चिन्ह वाटप व अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची यादी प्रसिध्द करण्यात येईल. दि. २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान घेण्यात येईल. दि.३



डिसेंबर रोजी सकाळी १० वाजतापासून मतमोजणी घेण्यात येईल.

वर्धा नगर परिषद निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी गणेश खताळे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मुख्याधिकारी विजय देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणी जिल्हा क्रीडा संकुल येथे होईल.

हिंगणघाट नगर परिषद निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी आकाश अवतारे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मुख्याधिकारी प्रशांत उरकुडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणी तहसिल कार्यालय हिंगणघाट येथे होणार आहे.

आर्वी नगर परिषद निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी अनिल गावीत व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मुख्याधिकारी किरण सुकलवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणी नगर परिषद उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आर्वी येथे होणार आहे.

पुलगाव नगर परिषद निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसिलदार अनिकेत सोनवने व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मुख्याधिकारी विजयकुमार आश्रमा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणी नगर परिषद कार्यालय पुलगाव येथे होणार आहे.

देवळी नगर परिषद निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसिलदार स्नेहा क्षिरसागर व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मुख्याधिकारी नेहा अकोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणी नगर परिषद कार्यालय देवळी येथे होणार आहे.

सिंदी (रेल्वे) नगर परिषद निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तहसिलदार बबिता आळंदे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मुख्याधिकारी पोर्णिमा गावित यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतमोजणी नगर परिषद कार्यालय सिंदी रेल्वे येथे होणार आहे, असे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

# १९ महिन्यांनंतर खा, काळेंना आठवले जिल्हा कार्यालय

## देशमुख परिवार गायब राष्ट्रवादीत चुरस, स्वराज्य रणांगण तापले, वर्ध्यात आढावा बैठकीची चर्चा रंगली

### महाविकास आघाडीकडून भाजपला 'रोखण्याची' तयारी



**वर्धा जनमाध्यम ;** लोकसभा निवडणुकीत खासदार निवडून आल्यानंतर तब्बल १९ महिन्यांच्या राजकीय विश्रांतीनंतर खासदार अमर काळे यांना अखेर जिल्हा कार्यालय आठवले आणि कार्यालयाच्या गेटमधून आत दाखल झाले, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आढावा बैठकीत त्यांच्या उपस्थितीने चर्चांना जोर आला. मात्र, प्रा.सुरेश देशमुख परिवारातील एकाही सदस्याने या बैठकीला उपस्थित राहिले नाही, यामुळे कार्यकर्त्यांमध्ये कुजबुज सुरू झाली आहे. जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस जेष्ठ नेते सुनिल राऊत, जिल्हा उपाध्यक्ष प्रा. खलील खतीब, दशरथ ठाकरे, प्रणय कदम, मुन्ना झाडे यांसारखे पक्षनिष्ठ नेते उपस्थित होते. निवडणुकीच्या रणधुमाळीवर चर्चा करताना बैठकीत महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढण्याची प्राथमिक तयारी दर्शवण्यात आली असली, तरी तीनही पक्ष आपली भूमिका उद्या जाहीर करणार आहेत. त्यानंतरच रणांगणाचे रूप ठरणार आहे. भाजपविरोधात एकत्र येण्यासाठी वरिष्ठ नेत्यांनी हिरवा कंदील दाखवला असल्याचेही सूत्रांनी सांगितले. शेतकरी, कामगार, महिला आणि युवक यांच्या मुद्यांवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून संघर्ष उभारण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष वांदिले यांनी कार्यकर्त्यांना केले. त्यांनी पुढे सांगितले की, शरदचंद्र पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली पक्षाची ध्येयधोरणे घराघरात पोहोचवण्याचे काम प्रत्येकाने करावे. या बैठकीने राष्ट्रवादीच्या गोटात पुन्हा एकदा हालचाल सुरू झाल्याचे स्पष्ट झाले; मात्र १९ महिन्यानंतर खासदार कार्यालयात आले तरी काही जुने चेहरे गायब राहिल्याने पक्षातील समीकरणे नव्याने मांडली जात आहेत, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# गौराई ग्रुपमध्ये उत्साहात पार पडला सामूहिक तुळशी विवाह सोहळा



वर्धा जनमाध्यम : जुनी म्हाडा कॉलनी येथील गौराई ग्रुपद्वारे आयोजित सामूहिक तुळशी विवाह सोहळा अत्यंत उत्साहाने व खेळकरपणे पार पडला. या सोहळ्यात निशा आसटकर, प्रज्ञा धनवलकर, भाग्यश्री चांभारे, अश्विनी धनवलकर, प्रणिता राऊत, अपेक्षा गोडखांदे, सुवर्णा शेळके, अनिता धनवलकर या महिला मंडळांच्या पुढाकाराने विविध धार्मिक विधी आणि संस्कृतीने भरलेली कार्यक्रम राबवण्यात आले.तुळशी विवाह हा कार्तिक शुक्ल द्वादशीच्या मुहूर्तावर साजरा करण्यात येणारा धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आहे. या दिवशी तुळशी माता आणि भगवान विष्णूंच्या शाळिग्रामाचा विवाह विधीपूर्वक पार पडतो, ज्यामुळे घरामध्ये सुख-शांती आणि समृद्धी येते, असे मानले जाते. या वर्षीही गावातील महिलांनी, तरुणांनी व कुटुंबीयांनी एकत्र येऊन या परंपरेचा सन्मान राखला.महिला मंडळाच्या समन्वयाने विविध पूजा विधी, आरती आणि पारंपरिक अन्नाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमातील एकात्मता आणि उत्साह पाहून स्थानिकांनीही आनंद व्यक्त केला. या सामाजिक उपक्रमामुळे गावातील संस्कृती जतन होण्यास मदत होत असून, सामाजिक बंध मजबूत होत आहेत.या सामूहिक विवाहामुळे पारंपरिक संस्कृती जपण्याबरोबरच विवाह खर्च कमी होण्याचा फायदाही मिळतो. गौराई ग्रुपचे कार्यकर्ते आणि मंडळाच्या सर्व सदस्यांचे या यशस्वी सोहळ्यासाठी मनापासून आभार मानले

# नायलॉन माज्याने शेतकऱ्याचा घेतला बळी

## भिडी परिसरातील दुर्दैवी घटना; गावात शोककळा

**देवळी जनमाध्यम-** भिडी जवळ गुरुवारी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास झालेल्या अपघातात ५० वर्षीय शेतकरी सुभाष शेलूटे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शेलूटे हे शेतातील फवारणी करून आपल्या दुचाकीवरून घरी परतत असताना नागपूर–यवतमाळ राष्ट्रीय महामार्गालगत भिडी येथील पुलाजवळ नायलॉन माज्याचा धागा गळ्याभोवती आवळल्याने अपघात झाला. हा धागा गळ्यात गुंतल्याने त्यांची दुचाकी नियंत्रणातून सुटली आणि ते खाली पडून गंभीर जखमी झाले. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच ग्रामीण नागरिकांनी धाव घेतली; मात्र तोपर्यंत शेलूटे यांचा मृत्यू झाला होता. या प्रकारानंतर परिसरात एकच हळहळ व्यक्त होत असून, पुन्हा एकदा नायलॉन माज्याच्या जीवघेण्या धोक्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.स्थानिकांनी पोलिसांच्या



विलंबित हालचालीवर नाराजी व्यक्त केली असून, अशा माज्यांची विक्री बंद करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलावीत अशी मागणी केली आहे. गावात या घटनेने शोककळा पसरली आहे. पुढील तपास देवळी पोलिस करीत आहेत.

# सिंदी रेल्वेत सार्वजनिक ठिकाणी तिघांचा वाद

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम-** येथील साई मंदिर वॉर्ड क्रमांक ५ परिसरात तीन व्यक्तींमध्ये झालेल्या वादामुळे सार्वजनिक शांततेला बाधा पोहोचली. ही घटना मंगळवारी (४ नोव्हेंबर) रात्री घडली. पोलिसांनी त्वरित घटनास्थळी पोहोचून भांडण करणाऱ्या तिघांनाही ताब्यात घेतले असून, त्यांच्या विरोधात बीएनएस कलम १९४(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रात्री साडेआठच्या सुमारास कृषी उत्पन्न बाजार समितीमागील सार्वजनिक रस्त्यावर रामा श्रीरामजी खानखुरे (४५), सुनिल गजानन वरघने (५५) आणि मंगेश सुनिल वरघने (२७, सर्व राहणार साई मंदिरमागे, सिंदी रेल्वे) या तिघांनी आपापसात वाद करत एकमेकांशी झगडा केला. स्थानिकांमुळे व पोलिसांच्या मधस्थतीमुळे वादावर नियंत्रण मिळवता आले.या प्रकरणी पोलीस हवालदार भाऊसाहेब बोचरे यांच्या तक्रारीवरून संबंधित आरोपींविरुद्ध सार्वजनिक शांतता भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# सेवानिवृत्त अधिकाऱ्याची सात लाखांची फसवणूक

**वर्धा जनमाध्यम :** सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्याची घरविक्रीच्या कराराच्या बहाण्याने सात लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी आर्वीतील तिघांविरुद्ध वर्धा शहर पोलिस ठाण्यात कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) बी.एस. फसवणूक या अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी बंडु भोपीदास राठोड (वय ५५, रा. एल.आय.सी. कॉलनी, चित्पुर रोड, आर्वी) हे पंचायत समिती आर्वी येथे सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत होते व सध्या सेवानिवृत्त आहेत. आरोपी वसंत नामदेवराव आखरे, अश्विनी सुहास नागमोते आणि रवि वसंतराव आखरे (रा. बिरसा मुंडा चौक, आर्वी) या तिघांवर फिर्याद दाखल करण्यात आली आहे.फिर्यादी आणि आरोपी यांच्यात कौटुंबिक संबंध असून आरोपींनी आर्वी येथील मालमत्ता विक्रीच्या नावाखाली २५ ऑक्टोबर २०२४ रोजी फिर्यादीकडून सात लाख रुपये नगदी घेतले. विक्रीकरार झाल्याचे दाखविण्यात आले; मात्र ठरलेली मालमत्ता हस्तांतरित न करता आरोपींनी विक्री नाकारली. वारंवार मागणी करूनही पैसे परत न दिल्याने आणि नोटीस दिल्यानंतरही करार न पूर्ण केल्याने फिर्यादींनी कायदेशीर पाऊल उचलले.या तक्रारीनुसार आरोपींनी फिर्यादीचा विश्वासघात करून आर्थिक शोषण केल्याचा निष्कर्ष प्राथमिक तपासात समोर आला आहे.

# २३ नोव्हेंबरला महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (ऊऊि) येत्या २३ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील १० केंद्रांवर पार पडणार आहे. या परीक्षेत पेपर १ साठी १ हजार ५११ तर पेपर २ साठी २ हजार २८६ विद्यार्थी परीक्षेला बसणार असून, एकूण ३ हजार ७९७ परीक्षार्थी सहभागी होणार आहेत. या सर्व केंद्रांवर १० केंद्रसंचालक आणि १० सहाय्यक परिरक्षकांची नेमणूक करण्यात आली असून २ झोनल अधिकारी व १ जिल्हा परिरक्षक नेमण्यात आले आहेत.

जिल्हा संनियंत्रण समितीकडून तयारीचा आढावा घेण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन संजीव जाधवर यांच्या अध्यक्षतेखाली तयारीची बैठक पार पडली. यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. जयश्री घारफळकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ.महेंद्र गजभिये, जिल्हा परिरक्षक व उपशिक्षणाधिकारी ज्ञानेश्वर पानसरे व समन्वयक शिक्षण विस्तार अधिकारी देवानंद एकापुरे आदींची उपस्थिती होती. बैठकीत परीक्षेत गैरप्रकार होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले आहे.शिक्षण विभागातील विविध पदांवर पदोन्नती मिळवण्यासाठी आता टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य केले आहे. यामुळे येत्या २३ नोव्हेंबरला होणाऱ्या परीक्षेसाठी अनेक शिक्षकही परीक्षार्थी असणार आहेत. एकूण ३ हजार ७९७ उमेदवार टीईटीची परीक्षा देणार आहेत. प्रत्येक उमेदवाराची ओळख चेहरा स्कॅन करून केली जाणार आहे. तसेच बायोमेट्रिकच्या माध्यमातून पडताळणी केली जाणार आहे. पोलिस विभागाच्यावतीने सर्व केंद्रांवर पोलिस बंदोबस्त राहणार आहे. प्रत्येक केंद्रावर ण्णऊन्न कॅमेऱ्याची सुविधा करण्यात आली असून ३ व्हिडीओ कॅमेराद्वारे सर्व केंद्रांवर सतत निगराणी ठेवली जाणार आहे. दहा केंद्रांवर बैठे पथक कार्यरत राहणार असून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या फिरत्या पथकांद्वारे परीक्षा व्यवस्थेवर लक्ष ठेवले आणार आहे. दिव्यांगांच्या प्रमाणपत्राची पडताळणी :दिव्यांग उमेदवारांना आपल्या प्रमाणपत्राची पडताळणी करावी लागणार आहे. तसेच त्यांना लेखनिक उपलब्ध करण्यासाठी अगोदरच प्रक्रिया करावी लागणार आहे. या सर्व प्रक्रिया करण्यासाठी शिक्षण विभागात एक विशेष कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून कार्यालयीन वेळेत १४ नोव्हेंबरपर्यंत सर्व पडताळण्या पूर्ण करणे आवश्यक असल्याचे शिक्षण विभागाच्यावतीने सांगण्यात आले. प्रत्येक ठिकाणी बायोमेट्रिक हजेरी प्रामुख्याने प्रत्येक उमेदवाराचा चेहरा नोंदवण्यात येणार आहे. बायोमेट्रिक स्कॅन करुनच केंद्रामध्ये प्रवेश दिला जाईल. पडताळणी व चेह-याचे स्कॅनिंग केले जाणार आहे. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांची यादी अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे, अशी माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) महेंद्र गजभिये यांनी दिली आहे. अधिक माहितीसाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सामाजिक कार्यकर्ते पत्रकार प्रदीप नागपूरकर यांचे निधन

**हिंगणघाट** - स्वदेशी, गोरक्षा व पर्यावरण या विषयांवर अखिल भारतीय स्तरावर कार्यरत असलेले कार्यकर्ते पत्रकार प्रदीप नागपूरकर (वय ४५) यांचे गुरुवारी पहाटे आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक क्षेत्रासह कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली आहे. प्रदीप यांनी आपल्या कार्याची सुरुवात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या हिंगणघाट शाखेतून केली होती. तेथून पुढे त्यांनी अखिल भारतीय स्तरावर पूर्णकालीन विस्तारक म्हणून कार्य केले.



स्वदेशी अभियान, निसर्गोपचार, गोरक्षा आणि पर्यावरण विषयांवर त्यांनी देशभर भ्रमंती करत चळवळीचे कार्य मजबुतीने उभारले.हिंगणघाट शहरात त्यांनी लहान मुलांसाठी संस्कार केंद्र तसेच स्व. नानासाहेब लाभे यांच्या अक्षर सुधार प्रकल्पाचे यशस्वी आयोजन केले होते. सुंदर हस्ताक्षर, शुद्धलेखन आणि संस्कार यांचा संगम साधणाऱ्या या उपक्रमांमुळे त्यांनी अनेक कुटुंबांच्या जीवनात बदल घडवला.प्रदीप हे गोविंदाचार्यांच्या स्वाभिमान भारत चळवळीचे खंदे कार्यकर्ते होते. सामाजिक जाण, राष्ट्रभक्ती आणि कार्यनिष्ठा या त्यांच्या त्रिसूत्रीवर त्यांनी आयुष्य उभं केलं. त्यांच्या जाण्याने कार्यकर्त्यांचा एक प्रेरणादायी आधारस्तंभ हरपला असल्याची भावना व्यक्त होत आहे.त्यांच्या मागे परिवार, सहकारी कार्यकर्ते आणि असंख्य अनुयायी असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेस परिसरातील सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचा मोठा सहभाग होता.

### भाजपच्या वर्धा जिल्हा निवडणूक प्रमुखपदी

# रामदास तडस, निवडणूक प्रभारीपदी राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांची नियुक्ती

वर्धा जनमाध्यम : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने वर्धा जिल्ह्यात निवडणूक प्रमुख म्हणून माजी खासदार रामदास तडस यांची आणि निवडणूक प्रभारी म्हणून वर्धा जिल्ह्याचे राज्यमंत्री व पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची नियुक्ती केली आहे. या नियुक्तीमुळे भाजपच्या निवडणूक तयारीत नवे वारे वाहणार आहेत.देशाचे लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देश व राज्य वेगाने प्रगती करत असून, ग्रामिण आणि शहरी भागांमध्ये विकासाचा गतीशिखर गाठण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. महाविकास आघाडीच्या काळात मागे पडलेल्या राज्य विकासाला आता नवी दिशा मिळाली आहे.डॉ.



भोयर यांनी वर्धा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून अनेक प्रलंबित समस्या तातडीने सोलवल्या आहेत. आमदार दादाराव केचे, समीर कुणावार, राजेश बकाने आणि सुमीत वानखेडे यांनीही आपल्या क्षेत्रातील विकासासाठी भरगोस प्रयत्न केले आहेत.जिल्हा निवडणूक प्रमुख रामदास तडस यांनी यावेळचा वापर करुन भाजपच्या निवडणुकीतील यशाची हमी दिली असून, जनता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपसोबत राहील असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. निवडणुकांमध्ये नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये भाजपचे जास्तीत जास्त उमेदवार विजयी होतील यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

# सुवर्णवीर मुरलीकांत पेटकर ९ ला वर्ध्यात

## प्रेरणादायी सन्मान सोहळा इको पार्कमध्ये

**वर्धा जनमाध्यम :** भारताचे पहिले पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेते आणि चंदू चॅम्पियन चित्रपटातून घराघरात पोहोचलेले प्रेरणादायी व्यक्तिमत्व मुरलीकांत पेटकर हे येत्या ९ नोव्हेंबर रोजी वर्ध्यात आगमन करणार आहेत. त्यांच्या सन्मानार्थ इको पार्क, पिपरी मेघे येथे दुपारी चार ते सहा या वेळेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, पीपल फॉर ?निमल्स' संस्थेचे सचिव आशिष गोस्वामी यांनी या सोहळ्याची सूत्रधाराची जबाबदारी स्वीकारली आहे.



१९७२ च्या पॅरालिम्पिक स्पर्धेत ५० मीटर प्राि स्टाइल जालतारणा प्राणाराता ३७.३३ सोकंदांचा विश्वाविक्रम नोंदवत पेटकर यांनी सुवर्णपदक जिंकले. १९६५ च्या भारत-पाक युद्धात गंभीर जखमी होऊन १८ महिने कोमात राहिल्यानंतरही त्यांनी नव्या जोमाने जगण्याची लढाई लढली आणि जागतिक पातळीवर भारताचा झेंडा उंच फडकावला.देशासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले असून, २०२४ मध्ये जीवनगौरव श्रेणीतील अर्जुन पुरस्कार मिळाला. त्यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित चंदू चॅम्पियन या चित्रपटाने देशभरातील प्रेक्षकांच्या डोळ्यांत अभिमान आणि आदर जागवला. वर्ध्यातील हा सोहळा पेटकर यांच्या संघर्ष, जिद्द आणि अपराजित आत्मविश्वासाला सलाम करणारा ठरणार असून, कॅप्टन मोहन गुजरकर यांचा मोठा सहभाग असणार आहे, हा कार्यक्रम क्रीडाप्रेमींसह तरुणाईसाठी प्रेरणेचा दीप ठरेल, अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.

**नावात बदल**

माझे पूर्वी EKBAL KASMANI असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील IQBAL HAROON KASMANI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- गजानन नगर, मानस मंदिर वर्धा, ४४२००१**

**नावात बदल**

माझे पूर्वी PARVEEN EKBAL KASMANI असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील PARVEEN IQBAL KASMANI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- गजानन नगर, मानस मंदिर वर्धा ४४२००१**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## थोडक्यात

### वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चिमूर तालुक्यातील शंकरपूर वन विभाग परिक्षेत्रातील आंबोली-आसोला गावालगत ईश्वर भरडे या शेतक-यावर वाघाने हल्ला करून ठार केले. ही घटना बुधवारी घडली. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण आहे. नागरिक वन विभागावर चांगलेच संतापले आहेत. त्यामुळे गावात तणाव निर्माण झाला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ईश्वर भरडे बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास शंकरपूर आंबोली मार्गावरील ठाणा रीट परिसरातील शेतात कापसाचे पीक पाहणी करण्यासाठी गेले होते. सायंकाळी सहा वाजेपर्यंत घरी परतले नाहीत. नातेवाईक आणि गावक-यांनी शेतावर जाउन पाहणी केली असता त्यांची सायकल शेतात उभी आढळली. त्यानंतर रात्री उशिरा त्यांचा मृतदेह आढळला. काही दिवसापूर्वीच शेतात काम करणा-या महिलेवर वाघाने हल्ला केला होता. परंतु तिने आरडाओरड केल्यामुळे तिच्या जवळ असलेल्या तिच्या दीराने तत्परता दाखवत वाघाला हाकलून लावले. नशीब बलवत्तर म्हणून महिला बचावली. ही घटना ताजी असतानाच बुधवारी पुन्हा वाघाने एकाचा बळी घेतला. या घटनेची माहिती मिळताच गावक-यांनी वन विभागावर रोष व्यक्त केला. चिमून परिक्षेत्रातील हा तिसरा वाघाचा बळी असून काही दिवसापूर्वी लावारी येथील एका महिलेचा वाघाने बळी घेतला होता. त्यानंतर शिवरा येथील माजी सरपंच असलेल्या व्यक्तीवर वाघाने हल्ला करून ठार केले. या परिसरात सध्या वाघाची दहशत निर्माण झाली असून परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात चालू वर्षात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यातील हा ३८ वा, तर वाघाच्या हल्ल्यातील ३६ वा बळी आहे. शंकरपूर परिसरात वाघाने दीड महिन्यात तिसरा बळी घेतला आहे. तिन्ही घटनांचे अंतर सुमारे २ किलोमीटर आहे. यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात वाघ-मानव संघर्षात, तसेच मानव वन्यप्राणी संघर्षात आणखी किती बळी जाणार? असा प्रश्न ग्रामस्थांमधून विचारला जात आहे.

### मंत्री शेलारविरोधात नितीन राउत यांची पोलिसात तक्रार

**नागपूर/प्रतिनिधी :** भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते व मंत्री आशिष शेलार यांच्या सांप्रदायिक वक्तव्यावरून काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, आमदार डॉ. नितीन राउत



यांनी नागपूर येथील जरीपटका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. शेलार यांनी रविवार रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत उत्तर नागपूरमधील मुस्लीम मतदारांविषयी केलेल्या विधानावरून राउत आज जास्तच आक्रमक दिसून आलेत. राउत यांनी सादर केलेल्या तक्रारीत शेलार यांनी पत्रकार परिषदेत मुस्लिम मतदारांना धमकावण्याचा आणि मुस्लिम, हिंदूंमध्ये द्वेष आणि शत्रुत्व निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. जे लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम १२५ अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे. यावेळी राउत यांनी मंत्री शेलार यांच्या पत्रकार परिषदेचा संपूर्ण व्हीडीओ असलेला पेनड्राइव्ह देखील पोलिसांना पळताळणी करिता दिला आहे. ज्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतांचे ध्रुवीकरण करण्यासाठी जातीय आधारावर द्वेष आणि फूट पाडण्यासाठी मुद्दाम मुस्लिम समुदायाला लक्ष्य केल्याचा आरोप राउत यांनी केला.संपूर्ण पत्रकार परिषदेत मतांचे ध्रुवीकरण करण्याच्या, स्वार्थासाठी मुस्लिम आणि इतर समुदायांमध्ये असंतोष, द्वेष आणि तिरस्काराची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपकरित राउत यांनी शेलार यांच्याविरोधात लवकरात लवकर कठोर कारवाईची मागणी केली. लोकप्रतिनिधी अधिनियम, १९५१ च्या कलम १२३(३) नुसार धर्म, जात, समुदाय किंवा भाषा यांच्या आधारावर मत मागणे वा मतदारांमध्ये धार्मिक विद्वेष पसरवणे हे निवडणूक गुन्हा मानला जातो. त्यामुळे शेलार यांचे वक्तव्य हे निवडणूक आचारसंहितेचे आणि कायद्याचे थेट उल्लंघन असल्याचे भाजप नेते आशीष शेलार यांच्या सांप्रदायिक वक्तव्यावरून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. नितीन राउत यांनी मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे

### आम्ही लिपस्टीक लावून पद मागत नाही; रूपाली ठोंबरेंचे आंदोलन

**पुणे :**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षातील रुपाली चाकणकर आणि रुपाली ठोंबरे-पाटील या एकमेकींच्या विरोधात उभ्या असल्याचे दिसून येत आहे.



त्या दोघींमध्ये वाद नेमका काय आहे, रोष काय आहे, कुठून सुरुवात झाली, याबद्दल रुपाली ठोंबरे पाटील यांनी आम्ही लाली लिपस्टिक लावून पद मागत नाही, मागे फिरून पद मागत नाही. असे सविस्तर भाष्य केले आहे. दरम्यान फलटणमधील डॉक्टर तरुणीच्या आत्महत्या प्रकरणावरून राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. या प्रकरणामध्ये राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी पीडित महिलेचे चरित्रहनन केले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसच्या रुपाली ठोंबरे-पाटील यांनी देखील आपल्याच पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष आणि महिला आयोगाच्या अध्यक्षा असलेला रूपाली चाकणकरांवर गंभीर आरोप करत आंदोलन केले होते. त्यामध्ये त्यांनी हातात घेतलेले पोस्टर राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरले होते, त्यावरतीही रुपाली ठोंबरे यांनी भाष्य केले आहे. रुपाली ठोंबरे-पाटील म्हणाल्या, चाकणकरांच्या विरोधात ते आंदोलन नव्हते. ते आंदोलन महिला आयोगाच्या पदावर बसलेल्या व्यक्तीसाठी होते आणि चाकणकर सातत्याने म्हणतात, मी सुंदर दिसते म्हणून माझ्यावर टीका होते. त्यांच्याकडे दोन पद आहेत, एक राज्य महिला आयोग आणि दुसरे प्रदेशाध्यक्ष, माझे एक मत होते, की एक पद त्यांच्याकडे ठेवा आणि प्रदेशाध्यक्ष पदावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये अनेक ज्येष्ठ महिला आहेत ज्या फार पूर्वीपासून काम करत आहेत त्यांना तुम्ही संधी द्या. तेव्हा चाकणकर म्हणायला लागल्या, नाही. नाही.रुपाली पाटील यांना प्रदेशाध्यक्ष व्हायचे आहे, राजकारणात आम्ही घरदार सांभाळून आमच्या घरच्यांचा विश्वास कमवून आम्ही कशासाठी काम करतो, पक्षात पदावर जाण्यासाठीच काम करतो, आम्ही लाली लिपस्टिक लावून पद मागत नाही, मागे फिरून पद मागत नाही. आम्ही पक्षात काम केलं असेल आमच्या क?लिटीवर, आमच्या कामावर, कार्यशैलीवर ते पद मागतो आहे, असे रुपाली ठोंबरे-पाटील यांनी म्हटले आहे.

### चीन, पाकिस्तानसह अफगाणिस्तान भूकंपाच्या धक्क्यांनी हादरले

**नवी दिल्ली-** पाकिस्तान, चीन आणि अफगाणिस्तानमध्ये गुरुवारी (दि.६) भूकंपाचे



तीव्र धक्के जाणवले आहेत. गुरुवारी इस्लामाबादमध्ये ४.३ तीव्रतेचा, काबूलमध्ये ४.४ तीव्रतेचा आणि शिनजियांग मध्ये ४.७ तीव्रतेचा भूकंप झाला. भूकंप जाणवताच लोकांमध्ये भीती पसरली आणि अनेक जण घराबाहेर पडले.राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राने (एनसीएस) गुरुवारी सकाळी शिनजियांगमध्ये झालेल्या भूकंपाची माहिती दिली. या भूकंपाची तीव्रता ४.७ नोंदवली गेली. हा भूकंप चीनमध्ये रविवारी आलेल्या ४.९ तीव्रतेच्या भूकंपानंतर काहीच दिवसांनी झाला. एनसीएस च्या माहितीनुसार, २६ ऑक्टोबरचा तो भूकंप १३० किलोमीटर खोलवर झाला होता. यापूर्वी ७ सप्टेंबर रोजी चीनमध्ये १० किलोमीटर उथळ खोलीवर ४.१ तीव्रतेचा आणखी एक भूकंप झाला होता.एनसीएसच्या माहितीनुसार, अफगाणिस्तानची राजधानी काबूल येथे ४.४ तीव्रतेचा भूकंप झाला. हा भूकंप केवळ १० किलोमीटर उथळ खोलीवर झाला असल्याने, त्या प्रदेशात आफटरश?क्स येण्याची शक्यता जास्त आहे. एका वृत्तसंस्थेने सांगितले की, सोमवारी रात्री उत्तर अफगाणिस्तानात आलेल्या शक्तिशाली भूकंपात बुधवारीपर्यंत मृतांचा आकडा २७ वर पोहोचला असून जवळपास १,००० जण जखमी झाले आहेत.

### गोव्यात बीचवरील दुकानांच्या फलकांवर पाकिस्तान झिंदाबादचे नारे

### ■ दुकानमालकांना अटक ■

**पणजी/वृत्तसंस्था :**उत्तर गोव्यातील बीच बेल्टवरील दोन दुकानांच्या एलईडी फलकांवर पाकिस्तान झिंदाबाद असे नारे झळकल्या प्रकरणी दोन दुकानांच्या मालकांना पोलिसांनी दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये अटक केली आहे. याचबरोबर पोलिसांनी बागा येथील रिव्हायव्ह हेअर कटिंग सलून आणि अर्पोरा येथील व्हिस्की पीडिया येथील एलईडी फलक देखील डिस्कनेक्ट केले आहेत. अटक करण्यात आलेल्यांवर भारताची एकता, अखंडता, सुरक्षा आणि सार्वभौमत्वाला धोका निर्माण केल्याचा आरोप आहे.

# एम्स मधील नॅट केंद्राचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ





**नागपूर/प्रतिनिधी :**अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) नागपूर येथील न्युक्लिक ॲसिड टेस्टिंग (एनएटी) सेंटरचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. अशा प्रकारची सुविधा असणारी एम्स ही मध्य भारतातील पहिलीच सरकारी आरोग्य संस्था आहे. याचवेळी गॅमा ब्लड इरॅडिएटर या उपकरणाचेही उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. एम्सच्या रक्तसंक्रमण विभागातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एनएटी ही रक्त, लाळ किंवा इतर नमुन्यातून रोगजंतू त्वरेने शोधणारी चाचणी आहे. या चाचणी द्वारे एचआयव्ही, हेपेटायटिस बी, हेपेटायटिस सी या सारख्या गंभीर आजारांचे निदान प्राथमिक अवस्थेतच होउन संबंधित रुग्णावर तातडीने उपचार सुरू होउ शकतात. अचूक निदान हे या चाचणीचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. हे उपकरण रक्तपेढ्यांमध्ये लावल्यास गरजू रुग्णांना दूषित रक्त देण्याचा धोका जवळपास संपतो. गॅमा ब्लड इरॅडिएटरद्वारे अतिशय शुद्ध रक्तगरजू रुग्णांना मिळू शकते. रक्तसंक्रमणातून होणारे आजार या उपकरणामुळे रोखले जातात. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या दोन्ही उपकरणांची प्रशंसा करतानाच समाजातील गरजूंना त्याचा अधिकाधिक लाभ मिळावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली. प्रारंभी एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांनी मुख्यमंत्र्यांचे यावेळी स्वागत केले. अधिष्ठाता डॉ. मृणाल पाठक, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे प्रशासक डॉ. विंकी रुघवाणी, एम्स मधील रक्तसंक्रमण विभाग प्रमुख डॉ. सौम्या दास, डॉ. पराग फुलझेले, डॉ. रौनक दुबे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## 'वंदे मातरम्' गीताला 150 वर्ष पूर्ण; मंत्रालयात निनादणार समूहगान

**मुंबई/प्रतिनिधी :** स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी व शहिदांना वंदन आणि देशप्रेमाचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम्' गीताला १५० वर्ष पूर्ण होत आहेत. यानिमित्त राष्ट्रभक्तीच्या भावनेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.४५ वाजता 'वंदे मातरम् ' चे समूहगान होणार आहे. पुढील वर्षभर याअंतर्गत सार्ध शताब्दी महोत्सवाच्या माध्यमाने राज्यभरात कौशल्य विकास विभागाच्या वतीने विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

थोर कवी आणि तत्वज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली लिहिलेल्या 'वंदे मातरम' या गीताला ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्ष पूर्ण होत असल्याने मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यासंदर्भात मंत्री लोढा म्हणाले की, वंदे मातरम गीताला ऐतिहासिक पार्श्वभूमी असून देशप्रेम निर्माण करण्याचे सामर्थ्य या गीतात आहे. स्वातंत्र्य लढ्यातील शहिदांना अभिवादन आणि मातृभूमीला वंदन करणारे संस्कार या गीताच्या समूह गायनातून होणार




असल्याने शासकीय स्तरावरून शैक्षणिक संस्था आणि शासकीय आस्थापनांमध्ये 'वंदे मातरम' गीताचे समूहगान आयोजित करण्याबाबत परिपत्रक आणि अध्यादेश जारी करण्यात आले असल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही यासंदर्भात देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात कौशल्य विभागानेही राज्यस्तरीय तसेच तालुका स्तरावर समित्या स्थापन केल्या आहेत. राज्यभरात निबंध लेखन, परिसंवाद, प्रदर्शने आणि वक्तृत्व स्पर्धा आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्यावतीने राज्यभरात सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. विविध सामाजिक संघटना, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये तसेच समाजमाध्यमांवर या ऐतिहासिक सोहळ्याला व्यापक रूप देण्याचा कौशल्य आणि सांस्कृतिक विभागाचा प्रयत्न आहे. देशभक्ती जागृत करणा-या सार्ध शताब्दी महोत्सवात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा,असे आवाहन मंत्री लोढा यांनी केले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऐकली जनतेची गा-हाणी

**नागपूर/प्रतिनिधी :** रामगिरी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना भेटून त्यांचे निवेदन स्वीकारून त्यांची गा-हाणी ऐकली तसेच त्यांच्या अडचणी सोडविण्यासंदर्भात निमशासकीय कार्यालयांकडे असलेले प्रलंबित प्रश्न, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष, अनुकंपा नोकरी आदी प्रश्नाबाबत निवेदन सादर केली. प्रत्येक नागरिकाला त्यांच्या



आश्वस्त केले. रामगिरी येथे मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते. यामध्ये महिला, दिव्यांग, जेष्ठ नागरिक यांचा समावेश होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक नागरिकांला भेटून त्यांची निवेदन स्वीकारली. यावेळी नागरिकांनी त्यांच्या वैयत्त्क्कि अडचणी तसेच आरोग्यासंदर्भात येणा-या अडचणी, विविध शासकीय व तक्रारीसंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांनी समाधान केले. राज्यात निर्माण झालेल्या अतिवृष्टी व पूरामुळे बाधित शेतक-यांना सहाय्य व्हावे यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीसाठी मुख्यमंत्र्यांना नागरिकांनी यावेळी धनादेश दिला. निवेदन सादर करणा-यांमध्ये विविध संस्था व लोकप्रतिनिधींचा समावेश होता.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त अनुयायांसाठी उत्तम दर्जाच्या सुविधा पुरवाव्यात-मंत्री आठवले





**मुंबई/प्रतिनिधी ::** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे देशभरातून लाखो अनुयायी अभिवादन करण्यासाठी येतात. या अनुयायांना कोणतीही गैरसोय होउ नये आणि त्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरवाव्यात, असे निर्देश केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी अधिका-यांना सांगितले.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वतयारीबाबत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस माजी राज्यमंत्री अविनाश महातेकर, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, पोलीस महानिरीक्षक मनोज शर्मा, मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त प्रशांत सपकाळे, बार्टीचे महासंचालक सुनिल वारे, सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव सो. ना. बागुल, तसेच भन्ते डॉ.राहुल बोधी, महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री आठवले म्हणाले, चैत्यभूमी येथे अनुयायांची कोणतीही गैरसोय होउ नये, यासाठी मुंबई महापालिका, गृह विभाग व सामाजिक न्याय विभाग तसेच सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. प्रत्येक विभागाने आपल्याला दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडावी. गर्दी टाळण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने खबरदारी घ्यावी. गर्दी नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा व्यवस्था, पिण्याचे पाणी, शौचालय, आरोग्य सुविधा, प्रकाश व्यवस्था आणि परिसर स्वच्छता या सर्व बाबींकडे विशेष लक्ष द्यावे. तसेच पोलीस प्रशासनाने अनुचित प्रकार टाळण्यासाठी सतर्क राहावे, असे राज्यमंत्री आठवले यांनी सांगितले.या बैठकीत चैत्यभूमी परिसर आणि शिवाजी पार्क परिसरातील रस्त्यांची सुधारणा, वाहतुकीचे नियंत्रण, सीसीटीव्ही व्यवस्था, भोजन व आरोग्य सुविधा, शासकीय जाहिरात प्रसिध्दी आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. महानगरपालिकेच्या अधिका-यांनी यासंबंधीची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक कामकाज तसेच दादर येथील अशोकस्तंभ ते चैत्यभूमीपासून इंदू मिलपर्यंतचा रस्ता याबाबतही बैठकीत आढावा घेण्यात आला.

## घर की मुर्गी, सावजी चिकन आणि गडकरी!

**नागपूर/प्रतिनिधी :** केंद्रीय मंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी स्पष्ट व परखड बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. ज्येष्ठतेमुळे त्यांच्या अशा बोलण्याचा प्रतिवाद पक्षातून कुणी करत नाही. अलीकडे त्यांनी जुन्या कार्यकर्त्यांच्या उपेक्षेवर कठोर भाष्य केले. गेल्या अनेक वर्षांपासून नागपूर ग्रामीणमध्ये पक्षाची धुरा सांभाळणारे डॉ. राजीव पोतदार यांच्यावरचा अन्याय केव्हा दूर होणार असा त्यांचा जाहीर प्रश्न होता.गडकरी स्वतः शाकाहारी पण या अन्यायाची तुलना त्यांनी केली ती चमचमीत मांसाहाराशी. घर की मुर्गी दाल बराबर व बाहेरून येणा-यांना सावजी चिकन हे धोरण पक्षात किती काळ चालणार असा सवाल करून त्यांनी भविष्यात हेच सुरू राहिले तर जेवढ्या वेगाने पक्षाला यश मिळाले तेवढ्याच वेगाने अपयशाला सुद्धा सामोरे जावे लागेल असा इशारा दिला.

आता प्रश्न असा आहे की गडकरींची ही भावना पक्षात गांभीर्याने घेणार तरी कोण? २०१४ मध्ये देशाच्या राजकारण नरेंद्र मोदींचा उदय झाला आणि भाजपच्या विजयाचा घोडा चौखूर उधळू लागला. जवळपास प्रत्येक निवडणुकीतील विजयाने या पक्षातील समीकरणे पूर्णपणे बदलली. त्यासाठी या पक्षाने जे आयारामचे धोरण अवलंबले त्याने जुने कार्यकर्ते बाजूला फेकले गेले व पक्षात नव्याने येणा-यांना संधी मिळत गेली. याचे एकमेव कारण म्हणजे प्रत्येकवेळी पक्षाने बाळगलेली विजयाची आस. गडकरींचे विधान नेमके त्यावर बोट ठेवणारे आहे. भाजपवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष नियंत्रण आहे ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे. पक्षाच्या संघटनात्मक रचनेत सुद्धा संघाचा माणूस हमखास असतोच. त्यामुळे पूर्णपणे कॅडरबेसअसे स्वरूप पक्षाला आलेले. प्रत्येकवेळी विजय मिळायलाच हवा या अट्टाहासामुळे अलीकडे हे स्वरूप पूर्णपणे विस्कळीत झालेले.



जे जुने कार्यकर्ते, पदाधिकारी होते ते आहे तिथेच राहिले व जिंकण्याची क्षमता असलेले लोक पक्षात सामील होउन नेते झाले. यामुळे जुन्यांमध्ये सुरू झालेली खदखद इतकी वाढली की ती या पक्षात अजूनही स्थान टिकवून असलेल्या जुन्या नेत्यांना सहन होईना! गडकरींचे वक्तव्य आले ते यातून. सध्या सर्वत्र विजय व सत्ता मिळण्याचे दिवस असल्याने सध्याच्या नेतृत्वाला या खदखदीकडे लक्ष देण्यास वेळ नाही. पक्षासाठी आधीपासून कष्ट उपसणा-यांनाही उघड नाराजी व्यक्त करून मिठाचा खडा कशाला टाकायचा असे वाटते.नेमका या मौनाचा फायदा घेत गडकरींनी या मुद्याला तोंड फोडले आहे.

पक्षाला सत्ता मिळाल्यावर आधीच्या कालावधीत केवळ हरण्यासाठी लढणा-या अनेकांचे पुनर्वसन झाले. मात्र काहीजण तसेच दुर्लक्षित राहिले. त्यांच्याकडे पक्ष कधी लक्ष देणार हा गडकरींचा सवाल आहे व तो रास्त आहे. पक्ष सलग सत्तेत असला की आयारामांची गर्दी वाढते. मग तो कुठलाही पक्ष असो. अशावेळी कुणाला जवळ करायचे व कुणाला नाही याचा विवेक पक्षनेतृत्वाला ठेवावा लागतो.भाजप नेमके हेच विसरला. पक्षाला पहिल्यांदा निर्विवाद यश मिळाल्यानंतर आहे ती सत्ता टिकावी तसेच संघटनात्मक शक्ती वाढावी यासाठी दुस-या पक्षातील प्रभावशाली नेत्यांना संधी देणे एकदाचे समजून घेता येईल. पण, वारंवार सत्ता मिळूनसुद्धा पक्षाचे धोरण तेच राहिले. त्यामुळे पक्षात बाहेरून आलेल्या व नेते झालेल्यांची संख्या बेसुमार वाढली. गडकरींनी नेमके याकडे लक्ष वेधले आहे. हे जे बाहेरचे आहेत त्यांना सावजी मटणाची थाळी का वाढता, पक्षातल्या जुन्याजाणत्यांना घर की मुर्गी का समजता असा प्रश्न उपस्थित करून ते मोकळे झाले. यामुळे त्यांच्या विधानाला टाळ्या पडल्या इथवर ठीक पण गडकरींनी कान टोचूनही पक्षाच्या सध्याच्या धोरणात बदल होईल का? सत्ताकारणात संधी देताना जुन्यांचा विचार होईल का? याची उत्तरे आजही कुणी ठामपणे देउ शकत नाही. गडकरी केंद्रीय मंत्री असले तरी ते पक्षाच्या संघटनात्मक कार्यापासून तसे दूर आहेत. नागपूर वगळता इतर ठिकाणी त्यांचे मत प्रत्येकवेळी विचारात घेतले जाईल अशी स्थिती सध्या नाही. त्यामुळे त्यांनी हे वक्तव्य करताना उपस्थित असलेले पक्षाचे नेते व मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे नाव घेतले.

## टोयोटा, होंडा, सुझुकी यांनी भारतात ११ अब्ज डालर्सची गुंतवणूक केली जाहीर

**नवी दिल्ली -** जपानच्या तीन मोठ्या वाहन कंपन्या टोयोटा, होंडा आणि सुजुकी आता चीनवरील आपले अवलंबन कमी करून भारतात मोठी गुंतवणूक करण्याच्या तयारीत आहेत. या कंपन्या मिळून भारतात सुमारे ११ अब्ज डॉलर्स (सुमारे ९०,००० कोटी रुपये) इतका मोठा गुंतवणुकीचा आराखडा आखत आहेत. यातून स्पष्ट होते की, जपानी



वाहन उत्पादक आता भारताला जागतिक उत्पादन केंद्र (ग्लोबल मॅन्युफॅक्चरिंग हब) म्हणून पाहत आहेत.जगातील सर्वात मोठी कार निर्माता टोयोटा आणि भारतात सुमारे ४० टक्के बाजारहिस्सा असलेली सुजुकी या दोन्ही कंपन्यांनी आपापल्या गुंतवणुकीची घोषणा केली आहे. तसेच होंडानेही सांगितले आहे की, ती भारताला आपल्या इलेक्ट्रिक वाहनांच्या उत्पादन आणि निर्यात केंद्र म्हणून विकसित करणार आहे.जपानी वाहन कंपन्या आता फक्त बाजारपेठ म्हणूनच नव्हे, तर उत्पादन केंद्र म्हणूनही चीनबाबत सावध झाल्या आहेत. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की चीनमधील इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) क्षेत्रातील किंमतयुद्धामुळे जपानी कंपन्यांसाठी तिथे नफा मिळवणे कठीण झाले आहे. याशिवाय, चीनी वाहन कंपन्या आता आग्नेय आशियामध्ये आपली पकड वाढवत आहेत, ज्यामुळे जपानला थेट स्पर्धेला सामोरे जावे लागत आहे. लंडनस्थित पेलहॅम स्मिथर्स असोसिएट्स या संस्थेच्या ऑटो विश्लेषक जूली बूते यांनी म्हटले आहे, भारत हा चीनच्या तुलनेत अधिक चांगला पर्याय आहे. येथे जपानी कंपन्यांना बीवायडी सारख्या चीनी स्पर्धकांशी लढावे लागत नाही. २०२१ ते २०२४ या काळात जपानकडून भारताच्या वाहतूक क्षेत्रात (ज्यात ऑटोमोबाईल्सही येतात) झालेली गुंतवणूक सातपट वाढून २९४ अब्ज येन (सुमारे १६,००० कोटी रुपये) झाली. त्याच कालावधीत चीनमधील गुंतवणूक ८३ टक्क्यांनी घटून फक्त ४६ अब्ज येन इतकी राहिली.टोयोटा आता भारतीय विक्रेत्यांसोबत मिळून हायब्रिड कारच्या भागांचे स्थानिक उत्पादन वाढवत आहे, जेणेकरून उत्पादन खर्च कमी करता येईल. कंपनीचे उद्दिष्ट आहे की २०३० पर्यंत भारतात १५ नवीन आणि अपडेटेड मॉडेल्स लॉन्च केली जातील.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## निवडणुकीचे रणशिंग

महाराष्ट्र राज्यात ज्याची राजकीय घटकांना कमालीची प्रतीक्षा होती, त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे 'बिगुल' वाजले आहे. निवडणूक आयोगाकडून राज्यातील २४६ नगर परिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका जाहीर केल्याने राज्यभरात आता आचारसंहिता सुरू झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर व्हाव्यात, यासाठी स्थानिक पातळीवर अनेक राजकीय घटकांनी आपल्या घरातील देवही कदाचित पाण्यात ठेवले असावेत. २०२० साली देशात कोरोनाचे आगमन झाल्यानंतर राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. कधी न्यायालयीन प्रक्रियेमुळे तर कधी ओबीसी आरक्षणामुळे स्थानिक निवडणुकांना सातत्याने विलंब होत गेला. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पर्यंत महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊन त्यांचे निकालही सादर करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले. मतदारयाद्यांचा मुद्दा अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे निवडणुका लांबणीवर पडण्याची टांगती तलवार राजकीय घटकांवर व त्यांच्या पक्षांवर होती. आता निवडणूक आयोगाकडून नगर परिषदा व नगर पंचायतींचा निवडणूक कार्यक्रमच जाहीर केल्याने राजकीय कुरुक्षेत्रावर हालचालींना गती प्राप्त झाली आहे. या निवडणुका होताच महानगरपालिकांच्याही निवडणुकांचाही कार्यक्रम जाहीर होणार असल्याचे बोलले जात आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या राजकारणात महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. विधानसभा निवडणुकांच्या माध्यमातून राज्य व लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून देशावर सत्ता मिळविण्यासाठी स्थानिक पातळीवरील नगर परिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, महानगरपालिका ताब्यात असणे आवश्यक असते. लोकशाहीतील सत्तेचा पाया म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नेहमीच पाहिले जाते. महाविकास आघाडी व महायुती महाराष्ट्राच्या राजकारणात कार्यरत असली तरी स्थानिक निवडणुकांना ते एकत्रितपणे सामोरे जाण्याची शक्यता कमीच आहे. त्या त्या भागातील स्थानिक राजकीय समीकरणे, पक्षाची ताकद, नेतेमंडळींचा प्रभाव, पदाधिकाऱ्यांचा जनसंपर्क यावरही बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. पक्ष संघटना चालविण्यासाठी, नावारूपाला आणण्यासाठी, पक्षाकडे जनाधार वळविण्यासाठी स्थानिक भागातील कार्यकर्ते व पदाधिकारी खऱ्या अर्थाने परिश्रम करत असतात. आमदार, खासदारांचा तळागाळातील जनतेशी प्रत्यक्ष संबंध येत नाही. त्यांनाही स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांवर व पदाधिकाऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. आता निवडणुकांच्या तारखाच जाहीर झाल्याने वेळेचे गणित सांभाळत प्रत्येक पक्षाला व त्यांच्या नेतेमंडळींना तसेच पदाधिकाऱ्यांना राजकीय सारीपाटावर 'मिले सूर मेरा तुम्हारा' हे गाणे युती, महायुती, आघाडीमध्ये आळवावे लागणार आहे. स्थानिक निवडणुकांमध्ये पक्षाची राजकीय ताकद स्पष्ट होत असल्याने या निवडणुकांमध्ये सर्वांचीच प्रतिष्ठा पणाला लागलेली असते. काही राजकीय पक्षांचा, नेतेमंडळींचा शहरी भागात, तर काहींचा ग्रामीण भागामध्ये प्रभाव अधिक असतो. काहींची पक्षबांधणी, नेतेमंडळींचा प्रभावही त्या त्या भागानुसार बदली होत असतो. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपंचायती व नगर परिषदांमध्ये प्रभावी ठरणाऱ्या पक्ष संघटनांना शहरी भागातील महापालिका निवडणुकांमध्ये फारसा प्रभाव पाडता येत नाही, त्यांना मर्यादा पडतात. नाण्याची दुसरी बाजू पडताळल्यास महापालिका निवडणुकांवर सत्ता मिळणाऱ्या पक्षांना ग्रामीण भागातील जनता फारशी स्वीकारत नसल्याचे अनेक निवडणुकांमध्ये पाहावयास मिळाले आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मागील निवडणुका व आताच्या निवडणुकांमध्ये कमालीचा फरक पाहावयास मिळणार आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीची व ठाकरेंच्या शिवसेनेची विभागणी झाली आहे. अजित पवारांच्या माध्यमातून राष्ट्रवादीत, तर एकनाथ शिंदेंच्या माध्यमातून शिवसेनेत फूट पडली आहे. शरद पवार आणि उबाठा हे काँग्रेससोबत महाविकास आघाडीमध्ये विरोधकांच्या भूमिकेत, तर अजित पवार व एकनाथ शिंदे हे भाजपसोबत महायुतीमध्ये सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेत आहेत. एकेकाळचे हाडवैर विसरून ठाकरे बंधू काही महिन्यांपासून राजकीय सारीपाटावर गळ्यात गळे घालून एकमेकांचे गोडवे गावू लागल्याने काही प्रमाणात राजकीय समीकरणात उलथापालथ होण्याची शक्यता आहे. अर्थात शिवसेना उबाठा गट व मनसे एकत्र आली आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने जरी त्यास संमती दिली तरी मनसेशी जवळीक करायला काँग्रेस राजी होण्याची शक्यता कमीच आहे. परप्रांतीय मते भाजपने आपल्याकडे वळविली असली तरी काही टक्का आजही काँग्रेसकडे आहे. तो टक्का गमवावा लागू नये यासाठी काँग्रेस मनसेशी मिलाफ करून स्वतःच्या पायावर दगड मारून घेणार नाही. स्थानिक निवडणुकांमध्ये खऱ्या अर्थाने पक्षाची, कार्यकर्त्यांची व पदाधिकाऱ्यांची राजकीय ताकद समजत असल्याने जागावाटपामध्ये राजकीय वादावादी होतात.पक्षासाठी राबणाऱ्या, पक्षाचा जनाधार वाढविण्यासाठी घरादाराकडे दुर्लक्ष करून सतत जनसामान्यांमध्ये कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये स्थानिक निवडणुका लढविण्याची महत्त्वाकांक्षा पाहता युती, महायुती, आघाडीच्या नावाखाली संबंधित घटक तलवारी म्यानात घालण्यास सहजासहजी तयार होत नाहीत. पक्षासाठी राबून पक्ष आपल्या कार्याचा, परिश्रमाचा विचार करणार नसेल तर पक्षाला नमस्कार करून नवीन पक्षामध्ये जाण्यासही अनेकजण मागे-पुढे पाहत नाहीत. आपल्यासाठी कष्ट करणाऱ्या कार्यकर्त्यांना, पदाधिकाऱ्यांना गमविणे पुढील वाटचालीत हानिकारक ठरणार असल्याने वरिष्ठांनाही या सर्व कंगोऱ्यांचा गांभीर्याने राजकीय अभ्यास करावा लागतो. स्थानिक भागातील कार्यकर्ते व पदाधिकारी हे पक्ष संघटनेसाठी व नेतेमंडळींसाठी अवघड जागेचे दुखणे असल्याने अनेकदा राज्यात व केंद्रात युती, महायुती, महाआघाडी असली तरी स्थानिक भागातील निर्णय अनेकदा स्थानिकांवर सोपविण्याची अगतिकता राज्य व केंद्र पातळीवरील नेतेमंडळींना स्वीकारावी लागत असते. नगर परिषदा व पंचायत समित्यांपाठोपाठ महापालिका निवडणुकांचेही बिगुल लवकरच वाजेल. मुंबई महापालिकेसाठी महाविकास आघाडी व महायुतीने गेल्या काही महिन्यांपासून मोर्चेबांधणी केलेली आहे. स्थानिक निवडणुका प्रत्येकासाठीच प्रतिष्ठेच्या असल्याने पक्षातील वरिष्ठ नेतेमंडळींनाही या निवडणुकांमध्ये व्यस्त राहण्याची भूमिका पार पाडावी लागणार आहे.

# डॉलरवरील अवलंबित्व घटविण्याची गरज



**गेल्या पाच दशकांत पहिल्यांदा डॉलर इंडेक्स ११ टक्क्यांनी कमी झाल्याचे दिसून आले आहे. सोन्याच्या किमतीतील उसळीने इतिहासात पहिल्यांदाच जागतिक सुवर्ण साठ्याचे मूल्य अमेरिकेच्या डॉलररूपी मालमत्तेपेक्षा अधिक झाले आहे. केंद्रीय बँकांकडे सध्याच्या सोन्याच्या बाजाराचे मूल्य अमेरिकी बाँडस्च्या तुलनेत अधिक आहे. अमेरिका डॉलरच्या बळावर जगावर राज्य करण्याचा प्रयत्न करत आहे. याचा परिणाम विकसनशील देशांना अमेरिकेच्या धोरणाचा फटका अधिक बसत आहे. भारताचा विचार केल्यास रुपयातील विक्रमी घसरण चिंताजनक आहे. अशा वेळी भारताने डॉलरवरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी व्यापक धोरण हाती घेतले पाहिजे.**

अमेरिका जगातील सर्वाधिक कर्जबाजारी देश आहे. त्याची वार्षिक आर्थिक तूट सुमारे दोन ट्रिलियन डॉलर आहे. शिवाय आणखी काही जुने कर्ज असून ते या वर्षी फेडावे लागणार आहे. एकुणातच जुने आणि नवीन कर्ज एकत्र केले तर अमेरिकेला या वर्षी दहा ट्रिलियन डॉलरची गरज भासणार आहे. या पैशांची जुळवाजुळव अमेरिकी अणि परकीय गुंतवणूकदारांमार्फत करण्यात येते. जगभरातील देशांचा परकी चलन साठा अमेरिकेपर्यंत पोचतो. त्यामुळे जागतिक पातळीवर डॉलरच्या उपलब्धतेवर आणि त्याच्या बचतीवर आपोआपच दबाव वाढतो. गुंतवणूकदारांना आकर्षित करताना बाँडवर त्याचा परिणाम होऊ नये यासाठी प्रसंगी जादा व्याजदर आकारले जाते आणि या वेळी ते सुमारे पाच टक्के आहे. अन्य देशांवर एवढे कर्ज असते तर त्याचे आंतरराष्ट्रीय पतमानांकन म्हणजे क्रेडिट रेटिंग लगेच कोसळले असते, परंतु अमेरिकेचा डॉलर जगातील बेताज बादशहा आहे. अर्थात डॉलरची लकाकी हळूहळू कमी होत आहे. गेल्या दोन दशकांत जगातील एकूण परकी साठ्यात डॉलरचा वाटा ७२ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांवर आला आहे. एका अर्थाने डॉलरचा दबदबा कमी होत आहे.


या कारणामुळे आज जगभरातील देश डी-डॉलरायझेशन म्हणजेच डॉलरवरचे अवलंबित्व कमी करण्याचा मुद्दा मांडत आहेत. त्याचा परिणामदेखील कमी जास्त प्रमाणात पाहावयास मिळत आहे. गेल्या पाच दशकांत पहिल्यांदा २०२५ च्या पहिल्या सहामाहीत डॉलरच्या सामर्थ्याचे आकलन करणारा डॉलर इंडेक्स ११ टक्क्यांनी कमी झाल्याचे दिसून आले आहे. दुसरी बातमी म्हणजे सोन्याच्या किमतीतील उसळीने इतिहासात पहिल्यांदाच जागतिक सुवर्ण साठ्याचे मूल्य अमेरिकेच्या डॉलररूपी मालमत्तेपेक्षा अधिक झाले आहे. केंद्रीय बँकांकडे सध्याच्या सोन्याच्या बाजाराचे मूल्य अमेरिकी बाँडस्च्या तुलनेत अधिक आहे. डॉलरचे वर्चस्व कायम आ, परंतु त्यात बदल दिसत आहे. रशिया-युक्रेन युद्धानंतर अनेक देशांना डॉलररूपी ठेवलेल्या साठ्यावर पुन्हा विचार करण्यास प्रवृत्त केले आहे. युरोपच्या केंद्रीय बँकेत असलेल्या रशियाच्या डॉलरच्या साठ्यावर अप्रत्यक्षपणे युरोपियन देशांनी मिळवलेला ताबा पाहता डॉलरमधील साठा हा भविष्यात भू-राजनीतीमुळे अडचणीत येऊ शकतो, असा संदेश जगभरात गेला आहे.

डॉलरची शक्ती तीन मोठ्या आधारावर अवलंबून आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार, सीमेपलीकडील देवाणघेवाण आणि परकीय चलन साठ्यातील डॉलरचा वाटा, पण आता त्यास आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. या वर्षी ब्रिक्स देशांनी डॉलरऐवजी स्वतःच्या चलनात बाजार करण्याचा मुद्दा मांडला असता ट्रम्प यांनी मोठे आयात शुल्क लावण्याची धमकी दिली. डॉलरची पत वाचविण्यासाठी त्यांनी व्यापार धोरणाला एखाद्या शस्त्राप्रमाणे वापरले आहे. भारताने डी-डॉलरायझेशनच्या दिशेने काम सुरू केले आहे. रुपयात व्यापार हळूहळू वाढेल, परंतु यातील आव्हान म्हणजे भारताची सर्वाधिक निर्यात अमेरिकेला होते. त्यामुळे भारतीय कंपन्या आजही डॉलरला प्राधान्य देताना दिसतात. डॉलर आज कमकुवत झाला असला तरी रुपया त्याच्यासमोर घसरत तो ८८.९ रुपयांवर पोहोचला आहे. यातून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे डॉलर कमकुवत असतानाही रुपया कमकुवत होऊ शकतो आणि दुसरे म्हणजे जागतिक परिणामांसह भारताची अंतर्गत स्थिती जसे आयात शुल्क, परकी भांडवल कमी होणे किंवा तेलाच्या किमती या गोष्टीदेखील रुपयावर प्रभाव टाकतात. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे भारतावर रशियाचे तेल आयात कमी करण्यासाठी दबाव आणत आहेत. भारतीय सामानावर ५० टक्के आयात शुल्क हा त्याचाच परिणाम आहे. परिणामी रुपया आणखी कोसळत गेला. कारण निर्यातीतून कमाई कमी होईल आणि आयातदारांना सतत डॉलरची गरज भासेल, असे बाजाराला वाटते.

भारताचे डॉलरवरचे अवलंबित्व संपविण्याच्या रणनीतीचा अर्थ डॉलरविरुद्ध लढाई करणे असा निघत नाही. यामागचा खरा उद्देश आपली अर्थव्यवस्था अधिक सक्षम करत वाजवी दरात व्यवहार करण्याचा आहे. व्यावहारिक रूपाने त्याचा अर्थ पाहिला तर पहिले म्हणजे शक्य तेवढ्या प्रमाणात रुपयात व्यवहार करणे, दुसरे म्हणजे परदेशात रुपया सुरक्षित करणे आणि त्याचा वापर करण्यासाठी अन्य मार्ग तयार करणे. तिसरे म्हणजे परकी चलन साठ्यात सोने आणि अन्य विश्वसनीय मालमत्तेत वैविध्यपणा आणणे आणि चौथे म्हणजे डिजिटल रुपया अणि पेमेंट प्रणालीचा वापर. यांसारख्या उपायांतून भू-राजनीती संकटातही डॉलरचा अडथळा येणार नाही. अर्थात एवढे उपाय करूनही डॉलरचा दबदबा कमी होणार नाही. मात्र भारत एकाच ठिकाणावर अवलंबून राहणार नाही आणि त्याचे डॉलरवरचे अवलंबित्व हळूहळू कमी होईल, हेदेखील तितकेच खरे. शेवटी एक विरोधाभास जाणून घेणेदेखील महत्त्वाचे आहे. कमकुवत डॉलर अमेरिकेला सक्षम करतो, परंतु वॉशिंग्टनकडून त्याचे सामर्थ्य वाचविण्यासाठी खुलेपणाने दबाव तंत्र किंवा धमक्या यासारख्या अस्त्रांचा वापर होतो. भारतासारख्या देशासाठी सर्वात व्यावहारिक मार्ग म्हणजे पर्याय खुले ठेवणे. देशांतर्गत भांडवली बाजार वाढविणे आणि परकीयांसाठी रुपया आणखी आकर्षित करणे. खऱ्या अर्थाने डी-डॉलरायझेशनचा अर्थ संपूर्ण त्याग नाही, तर पर्यायाचा शोध होय.

**डॉ. अजित रानडे**

# शेतकऱ्यांची क्रूर थट्टा





या वर्षीच्या खरीप हंगामातील महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व पिके अतिवृष्टी, ढगफुटी आणि महापुराच्या नैसर्गिक आपत्तीच्या तडाख्यात संपूर्णपणे नामशेष झाली. लाखो हेक्टर क्षेत्रातली पिके अतिवृष्टीने कुजून गेली. पिकांचा चिखल झाल्याने पूर्णपणे निराधार झालेल्या असहाय्य कर्जबाजारी शेतकऱ्यांच्य पाठीशी राज्य सरकार उभे आहे आणि दिवाळीपूर्वी या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा दिला जाईल, अशी हमी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. त्या पाठोपाठ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईसाठी ३२ हजार कोटी रुपयांच्या निधीची घोषणाही केली. दिवाळीपूर्वी हे अर्थसहाय्य राज्यातल्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचेल अशी ग्वाही त्यांनी दिली होती, पण अद्यापही लाखो शेतकऱ्यांपर्यंत आर्थिक मदत पोहचली नसल्याच्या असंख्य तक्रारी आहेत. या पार्श्वभूमीवर आता नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी अंमलात आलेल्या सुधारित पंतप्रधान पीक विमा योजना राबविणाऱ्या विमा कंपन्यांनी ! मात्र निसर्गाने पूर्णपणे नागवलेल्या शेतकऱ्यांची क्रूर थट्टा, विटंबना केल्याच्या संतापजनक घटना अकोला जिल्ह्यात चव्हाट्यावर आल्यात आहेत. या जिल्ह्यातल्या विनोडा, कावसा, कुटासा या गावांच्या शेकडो शेतकऱ्यांना पूर्णपणे जमीनदोस्त झालेल्या, माती झालेल्या पिकांच्या नुकसान भरपाई म्हणून दोन, तीन, पाच, एकवीस रुपयांची चिल्लर नुकसान भरपाई म्हणून या शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर भरून त्यांच्या जखमांवर मीठ चोळायचा अघोरी निंदनीय आणि त्यांच्या लुटमारीचा प्रकार केल्याने या संतप्त शेतकऱ्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलनेही केली आणि अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आपला संताप व्यक्त करीत या भंपक, नगण्य क्रूर थटा करणाऱ्या नुकसान भरपाईचे पैसे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सरकारला परत केले आहेत. राज्य सरकार सर्वसामान्य जनता आणि अन्नदात्या शेतकऱ्याचा असा राजरोस अपमान करणाऱ्या शेतकऱ्यांना लुटायला सोकावलेल्या पीक विमा कंपन्यांना धडा शिकवायचा निर्धार संतप्त शेतकऱ्यांनी केला असला तरी सरकार या विमा कंपन्यांना कसा धडा शिकवते हे आता दिसेलच.

पीक विमा योजना अंमलात आली तेव्हापासून पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक आणि लुबाडणूक झाल्याच्या हजारो तक्रारी झाल्या. शेतकरी केंद्र आणि राज्य सरकारकडून लाखो कोटी रुपयांच्या विमा हप्त्याची रक्कम वसूल करणाऱ्या पीक विमा कंपन्यांनी भरलेल्या हप्त्याच्या निम्या रकमेचीही नुकसान भरपाई दिली नसल्याची हजारो प्रकरणे उजेडात आली. या फसव्या पीक विमा योजनेतल्या लुटालुटीने, लुबाडणुकीला वैतागलेल्या राज्यातल्या ७० लाख शेतकऱ्यांनी या योजनेत विम्याचे पैसे भरले नाहीत आणि आता एक कोटीच्यावर शेतकऱ्यांनी विम्याचे हप्ते भरले. त्यांच्याशी घोर थट्टा विमा कंपन्यांनी निर्लज्ज आणि बेशरमपणे सुरू केली आणि शेतकऱ्यांच्या फसवणुकीसाठी ही योजना असल्याचे पुन्हा एकदा प्रचिती दिली.या वर्षीच्या खरीप हंगामातील संपूर्ण राज्यभरातील सोयाबीन, कापूस, मूग, बाजरी, ही सारी पिके पूर्णपणे मातीमोल झाली. हजारो शेतकऱ्यांची उभी पिके महापुरात वाहून गेली. हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी नदीच्या पुराच्या प्रवाहात पूर्णपणे वाहून गेल्या. अशा गंभीर स्थितीत शेतकऱ्यांना लुटायला सोकावलेल्या पीक विमा कंपन्यांनी या वर्षीच्या पीक विमा योजनेतल्या पिकांची मळणी झाल्यावर म्हणजे धान्य शेतकऱ्याच्या हाती आल्यावर पाच वर्षांच्या सारासरीने झालेले नुकसान भरून देण्याच्या अटीचा सोयिस्करपणे आधार घेतला असावा कारण या वर्षी बहुतांश पिकांच्या कापण्या, मळण्या झालेल्याच नाहीत. तेव्हा नुकसान भरपाई कशासाठी द्यायची, असे शेतकऱ्यांना लुटायचे धोरण या लबाड विमा कंपन्यांनी अंमलात आणले आहे. अत्यंत संवेदनशून्य आणि सुलतानी अशा या पीक विमा कंपन्यांच्या बेलगाम, अनियंत्रित फसवणुकीच्या कारभाराने शेतकऱ्यांना दिलासा तर सोडाच पण त्यांनी नियमानुसार प्रति हेक्टरी भरलेल्या हप्त्याची रक्कम द्यायची नाही, असा हा कुटील डाव आहे. सरकारने तो खंबीरपणे मोडून काढत राज्यातल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नियमानुसार संपूर्ण नुकसान भरपाई देणे भाग पाडले पाहिजे.

**श्रीहरी**

# मदतीची आश्वासने आणि शेतकऱ्यांशी गद्दारी

भारतीय राजकारणाचा एक अविभाज्य भाग म्हणजे निवडणूकपूर्व आश्वासने. विशेषतः कृषी क्षेत्राला लक्ष्य करून, प्रत्येक पक्ष मदतीच्या, समृद्धीच्या आणि उज्ज्वल भविष्याच्या मोठ्या घोषणा करतो.सत्ता मिळाल्यानंतर बहुतांश वेळा हे ''मदतीचे आश्वासन' केवळ एक 'चुनावी जुमला' ठरते, आणि शेतकऱ्यांच्या नशिबी येते ती क्रूर गद्दारी! आश्वासनांची गर्दी आणि अंमलबजावणीचा दुष्काळ राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांसाठी आकर्षक बाबी असतात.संपूर्ण कर्जमाफीचे स्वप्न दाखवले जाते.हमीभावाकरीता स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार MSP देण्याची घोषणा होते. रखडलेले प्रकल्प त्वरित मार्गी लावण्याची हमी दिली जाते.नुकसान भरपाई त्वरित आणि पूर्णपणे मिळेल, अशी ग्वाही दिली जाते. या आश्वासनांच्या बळावर शेतकरी मतदान करतात. मात्र, निवडणुका संपताच 'फाइल' आणि 'नियमां'च्या गर्दीत हे आश्वासन अडकून पडते. कर्जमाफीचे निकष इतके क्लिष्ट केले जातात की बहुतांश गरजू शेतकरी त्यातून वगळले जातात. पीक विम्याचे पंचनामे वेळेवर होत नाहीत किंवा मिळणारी मदत इतकी तुटपुंजी असते की ती नुसत्या खर्चाची भरपाई करू शकत नाही.



जेव्हा मदतीची आवश्यकता असते, तेव्हा पाठ फिरवली जाते. हमीभाव जाहीर होतो, पण सरकारी खरेदी केंद्रे पुरेसे धान्य खरेदी करत नाहीत. परिणामी, शेतकऱ्याला आपला माल खुल्या बाजारात MSP पेक्षा कमी दराने व्यापाऱ्याला विकावा लागतो. ही थेट फसवणूक आहे.अतिवृष्टी किंवा अवकाळी पावसामुळे जेव्हा पीक पूर्णपणे वाया जाते, तेव्हा तातडीने मिळणारी मदत (अनुदान) इतकी कमी असते की त्याला 'मदत' म्हणणेही चुकीचे ठरते. मदतीच्या घोषणेतील रक्कम आणि हातात पडणारी रक्कम यात मोठे अंतर असते.

सरकारी कार्यालयांतील कागदपत्रांची पूर्तता आणि लाल फितीचा कारभार सामान्य शेतकऱ्याला थकवून टाकतो. मदतीचा चेक येईपर्यंत अनेकदा शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला असतो.सातत्याने होणाऱ्या गद्दारीचा सर्वात भयानक परिणाम म्हणजे शेतकरी आत्महत्या. जेव्हा नैसर्गिक संकटे येतात आणि त्याला राजकीय फसवणुकीची जोड मिळते, तेव्हा शेतकऱ्याचा धीर खचतो. कर्जातून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग दिसत नाही, तेव्हा तो आत्महत्येचा अत्यंत टोकाचा निर्णय घेतो. 'देशाचा पोशिंदा' केवळ आश्वासनांच्या बळी ठरतो, ही लोकशाहीसाठी अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे.

शेतकऱ्यांनी आता केवळ भावनिक साद घालणाऱ्या घोषणांवर विश्वास न ठेवता, ठोस कृतीचा आग्रह धरला पाहिजे. आपल्या हक्कांसाठी संघटित राहून सरकारवर दबाव टाकणे, तसेच निवडणुकीत केवळ आश्वासनांवर नाही, तर मागील कामाच्या आधारावर मतदान करणे गरजेचे आहे. जेव्हा शेतकऱ्याची एकजूट मतांमध्ये दिसेल, तेव्हाच राजकीय पक्षांना 'आश्वासन आणि गद्दारी'चा हा खेळ थांबवावा लागेल.

**विरेंद्र सोनवणे, जळगाव**
**मो.८८८८२४४८८३**

# लग्न समारंभातील अनावश्यक खर्च टाळा

सीआयएच्या अंदाजानुसार यंदा १ नोव्हेंबर ते १४ डिसेंबर दरम्यान देशभरात अंदाजे ४६ लाख लग्ने होण्याचा अंदाज आहे.त्यात सुमारे ६.५०लाख कोटी रुपयांचा व्यवसाय होईल.मागील वर्षापेक्षा लग्ने कमी असतील पण व्यवसाय मात्र मोठ्या प्रमाणात होईल.कॅटचे राष्ट्रीय सरचिटणीस प्रवीण खंडेलवाल यांच्या मतानुसार लग्न संख्या गेल्या वर्षीपेक्षा कमी राहील तरी प्रत्येक लग्नाचा खर्च लक्षणीयरित्या वाढला आहे.यंदा कपड्यावर १० टक्के,इव्हेन्ट मॅनेजमेंट वर ५टक्के तर केटरिंग वर १०टक्के खर्च अधिक होण्याची शक्यता आहे.या बरोबर देशात सुमारे एक कोटीहून अधिक लोकांना रोजगार मिळेल यामुळे त्याचा फायदा डेकोरेटर्स, कलाकार,वाहतूकदा यासारख्या लोकांना होणार आहे. गेली कित्येक वर्षे लग्न व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. २०२२ साली तो सुमारे ३. ७५ लाख कोटी एवढा होता तर आज २०२५ साली तो तब्बल ६. ५० लाख कोटी रुपयावर पोहचला आहे . एकूणच लग्नातील खर्च दिवसेंदिवस वाढतच आहे तो कमी करण्याची आवश्यकता आहे.

**शांताराम वाघ**

# राहुल गांधींचे राजकारण

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यापूर्वी राहुल गांधींनी हरियाणातील मतदानावर प्रश्नचिन्ह उभे करून आपली हार मान्य केली होती का, हा प्रश्न उपस्थित होतो. मात्र, त्यांच्या आरोपांची सत्यता तपासल्यास ते अपुऱ्या माहितीवर किंवा चुकीच्या निष्कर्षांवर आधारित असल्याचे अनेकदा सिद्ध झाले आहे. यामुळे, जमिनीवरचे ठोस राजकारण सोडून त्यांनी केवळ आरोपांचे राजकारण सुरू केले आहे का, असा विचार पडतो. सततच्या आणि वारंवार सिद्ध न होणाऱ्या आरोपांमुळे लोकांवर त्यांच्या आरोपांचा परिणाम कमी होत चालला आहे.कर्नाटक, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा या काँग्रेस शासित आर्थिक परिस्थिती बिकट असल्याच्या बातम्या येत आहेत, विशेषतः हिमाचल प्रदेशात वेतन देण्यासाठीही निधीची चणचण जाणवते. अशा परिस्थितीत, राहुल गांधीं कडून सरकारसोबत उद्योग, आर्थिक आणि कामगार क्षेत्रातील तज्ज्ञांची बैठक घेऊन उपाययोजना करणे अपेक्षित आहे, पण त्याऐवजी ते इतर मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करताना दिसतात. इंटरनेटच्या युगात जनता लगेच आरोपांची सत्यता तपासते आणि त्यामुळे केवळ आरोपांनी लोकांना भ्रमित करणे शक्य राहिलेले नाही.

**अविनाश देशपांडे, पुणे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

# अवैध भूमिपूजन प्रकरणी आमदारांविरोधात कारवाईची मागणी

## नेताजी नगरातील दलीत वस्तीतील नागरिकांकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - नेताजी नगर परिसरात आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी शासकीय परवानगी शिवाय अवैध आणि अनधिकृत भूमिपूजन केल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते विक्की सुभाष नाडे व उपोषणकर्ते अशोक भिमराव डेरे यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, नेताजी नगर येथील सुभाषचंद्र बोस फोटो ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा या रस्त्याचे गिट्टीकरण व डांबरीकरणाचे काम साहित्यरत्न लोकशाहीर अन्नाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत मंजूर झाले आहे. मात्र या कामासाठी कोणतीही अधिकृत परवानगी अथवा कार्यालयीन आदेश नसताना, आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता अवैध भूमिपूजन समारंभ आयोजित केला. या समारंभावेळी सुभाषचंद्र बोस फोटोजवळ फलक लावून अनावरण करण्यात आले आणि सुमारे ४० ते ५० नागरिक उपस्थित होते, असे निवेदनात म्हटले आहे. संबंधित कृती ही शासकीय नियमांचे उल्लंघन असून, निवडणुकीच्या काळात दलित वस्तीतील मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित घटनेची तातडीने चौकशी करून आमदारांविरुद्ध योग्य ती कायदेशीर आणि प्रशासकीय कारवाई करावी, तसेच या कामाची अधिकृत प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला विनंती केली आहे की, याबाबत झालेल्या कारवाईची माहिती नगर परिषद यवतमाळ समोरील उपोषण मंडपावर त्वरीत देण्यात यावी.

# इंस्टाग्रामसाठी रिल बनविणाऱ्या युवकाकडून धारदार तलवार जप्त



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - सोशल मीडियावर 'स्टाईल' दाखवण्यासाठी तलवारीने वाढदिवसाचा केक कापणाऱ्या युवकाचा 'रिल' आता त्यालाच महागात पडला आहे. स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी तत्पर कारवाई करत सदर युवकाकडून धारदार तलवार जप्त केली असून आर्म ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी जिल्ह्यात विशेष मोहीम (Special Drive) राबविण्याचे आदेश दिले होते. या मोहिमेअंतर्गत ५ व ६ नोव्हेंबर दरम्यान आर्म ॲक्ट अंतर्गत सर्वाधिक कारवाया करण्याचे तसेच मागील पाच वर्षांतील आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर ५ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ऑल आउट ऑपरेशन साठी राळेगाव परिसरात गस्त घालत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, राळेगाव येथील वैभव मारोती टेकाम (वय २४, रा. शांतीनगर) याने आपल्या वाढदिवसाच्या दिवशी लोखंडी तलवारीने केक कापत व्हिडीओ शूट करून इंस्टाग्रामवर पोस्ट केला आहे. माहितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ कारवाई केली. टेकामच्या घरी छापा टाकून तलवार जप्त करण्यात आली. तपासानंतर त्याच्याविरुद्ध राळेगाव पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ४ व २५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि धनराज हाके, पोहवा सुनिल खंडागळे, सुधीर पिदुरकर, पोकॉंस्टेबल रजनीकांत मडावी व चापोंस्टेबल सतीश फुके यांनी यशस्वीपणे पार पाडली.

# पुसद एसटी बसस्थानकामध्ये ऑटोरिक्षाचे अतिक्रमण



बसस्थानकाचे आतमध्ये ऑटो रिक्षा चा प्रवेश होऊ नये याकरिता शहर पोलीस स्टेशन वाहतूक शाखा पुसद यांचे कडे पत्र देऊन कार्यवाही करण्याकरिता मागणी केलेली आहे.

**– विजय गडधने, प्रभारी आगार व्यवस्थापक, पुसद आगार**

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - पुसद बस स्थानकाचे आत ऑटो रिक्षा चालकांचा धुमाकूळ सुरु असून अतिक्रमण केलेले असते पुसद बसस्थानकामध्ये येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना अशा ऑटोरिक्षा मुळे विविध समस्यांचा सामना करावा लागतो आहे. पुसद बस स्थानकाचे स्थानक प्रमुख या बाबीकडे हेतू पुरस्सर डोळे झाक करीत असल्यामुळे ऑटो रिक्षा चालक बस स्थानकाचे आत मध्ये प्रवेश करून प्रवाशांना जबरदस्ती ऑटो रिक्षामध्ये बसून प्रवासाकरिता घेऊन जात असल्याचे चित्र दिसून येते. ऑटो रिक्षा चालक बिनधास्तपणे बस स्थानकात प्रवेश करीत असून बस स्थानक प्रमुख या बाबीपासून अनभिज्ञ कसे? असा प्रश्न सुज्ञ प्रवाशांकडून व्यक्त केल्या जात आहे.

बस स्थानक प्रमुख ऑटो रिक्षा चालकांशी अर्थपूर्ण हित संबंध तर जोपासत नसावे ना? म्हणूनच ऑटो रिक्षा चालक बिनधास्तपणे आपली ऑटो,वाहने बस स्थानकामध्ये बस समोर आडवी उभी करून प्रवाशांना बसमधून उतरवून प्रवाशांची ने-आन करीत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. बस स्थानक प्रमुख यांचे नाकर्तेपणामुळे बसस्थानकामध्ये प्रवाशा करता येणारे प्रवासी, शाळकरी मुली,महिला यांना ऑटो रिक्षा चालकांचा नाहक त्रास सहन करावा लागतो आहे. या बाबीकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन बस स्थानक प्रमुखाला बसस्थानकाचे आत मध्ये ऑटो रिक्षा आणणाऱ्या ऑटो रिक्षा चालकांवर कारवाई करण्याबाबत आदेशित करून प्रवाशांचा प्रवास सुखकर होण्याच्या दृष्टीने सहकार्य करावे अशी सुज्ञ प्रवासी, शाळकरी मुली, महिलांकडून मागणी केल्या जात आहे. वरिष्ठ अधिकारी स्थानक प्रमुखाला समज देतील का याकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

# फलटण येथील महिला डॉक्टरवरील अत्याचाराचा निषेध 'युवा टायगर फोर्स'कडून मुख्यमंत्र्यांकडे निवेदन



**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा : फलटण (जि. सातारा) येथील महिला डॉक्टर संपदा मुंडे यांच्यावर झालेल्या क्रूर अत्याचाराच्या घटनेचा निषेध करण्यासाठी पांढरकवडा शहरातील नागरिक आणि 'युवा टायगर फोर्स'च्या वतीने उपविभागीय अधिकारी, केळापूर कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले.


या घटनेत सहभागी दोषींवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, तसेच पीडितेला न्याय मिळावा, यासाठी हे निवेदन हुडंनिशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. निवेदनात डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी खास आराखडा तयार करण्याचा मुद्दा अधोरेखित करण्यात आला. युवा टायगर फोर्सचे संयोजक अंकित नैताम यावेळी म्हणाले, "डॉक्टरांवर हल्ले होणे ही अत्यंत चिंतेची बाब आहे. सरकारने यावर तातडीने लक्ष न दिल्यास संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात आंदोलन उभारले जाईल."

या निवेदनावेळी युवा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष मदन जिड्डेवार, माजी नगराध्यक्ष शंकर बडे, भाऊराव मरापे, प्रेमराव वखरे, रितेश परचाके,अंकित नैताम, उल्हास घोडाम,शंकर दिघाडे अयुब शेख, मुरलीधर भिडकर, रामचंद्र आडते, सलीम शेख, केतन कटकोजवार, संजय मिटपेल्लीवार, वहीद अली सय्यद, नितीन काबळे, पिंटू चिंचोळकर ,शरद वाघमारे यांच्यासह पांढरकवडा शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

उपविभागीय अधिकारी अमित रंजन यांनी निवेदन स्वीकारले असून ते मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती दिली.

# उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरात आढळला जंगली कोल्हा, परिसरात भीतीचे वातावरण

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरातील मोती नगर येथे जंगली कोल्हा आढळला होता. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.वनविभागाला नागरिकांनी माहिती देताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन कोल्ह्याला रेस्क्यू केले आहे. ही घटना दि.४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या सकाळी ८ वाजताच्या दरम्यान उघडकीस आली होती.

याबाबत वन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार शहरातील प्रभाग क्रमांक ११ मधील उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसरामध्ये रात्रभर कोल्हा गस्त करीत होता.तो कोल्हा आहे हे स्थानिकांना माहित देखील नव्हते. त्याला कुत्रा समजून नागरिक मनसोक्तपणे त्याच्याजवळून ये-जा करित होते.अशातच काही जागरूक नागरिकांना तो कोल्हा असल्याचे माहित झाल्याने ती माहिती वाऱ्यासारखी पसरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.तो कोल्हा पकडताना पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी देखील केली होती. त्यानंतर वनविभागाला माहिती देण्यात आली होती.त्यानंतर पुसद वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी आनंद सुरत्ने,एम. जी.जामकर, वनरक्षक बी.आर.गोदमले, वन्य जीव रक्षक किरण सातपुते, चालक अजय राऊत यांनी घटनास्थळी धाव घेतली.त्यानंतर त्याला मोठ्या कौशल्याने पकडून त्याच्यावर औषध उपचार करण्यात आले. त्यानंतर त्याला बेलगाव्हाणच्या जंगलामध्ये सुरक्षितरीत्या सोडून देण्यात आले होते.

## वेचक



### राष्ट्रीय नंदगवळी संघटने कडून अंकिता डोळेच्या पालकांचा सत्कार

गवळी समाजातील पहिली चार्टर्ड अकाउंटंट! कुमारी अंकिता सुधाकरराव डोळे हिने अत्यंत कठीण आणि प्रस्थितीत चार्टर्ड अकाउंटंट (C.A.) परीक्षेत उत्तीर्ण होऊन समाजाचा मान अभिमानाने उंचावला आहे. विशेष म्हणजे, ती गवळी समाजातील पहिली चार्टर्ड अकाउंटंट (C.A.) ठरली असून, या अभूतपूर्व यशामुळे समाजभर आनंद आणि अभिमानाची लाट पसरली आहे. यातच तिचा राष्ट्रीय नंदगवळी समाज संघटनेच्या वतीने अंकिता सुधाकर डोळे हे सुवर्णयश साकार झाले आहे. कुमारी अंकिताचे हे यश तिच्या कुटुंबासाठी, गावासाठी आणि संपूर्ण गवळी समाजासाठी मानाचा तुरा ठरले आहे. याच अनुषंगाने ना.तसीलदार बिजवे, बाळासाहेब डोळे,पंडितराव बोपटे,रमेश झामरे,किसनराव बोपटे,सुभाष कालोकार सुभाष काकडे, चंद्रपाल कालोकार,राजुभाऊ घाटोळ, अमोल झांबरे,अक्षय साठे, सुधाकरजी डोळे पाटील,राजुभाऊ भा.घाटोळ सुरेंद्र वासनिक,पवन झामरे, ज्ञानेश्वर अवथळे,राजू भोंगाडे, ओंकार चेके इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

### स्वाधार योजनेसाठी अर्ज भरण्याची ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

यवतमाळ : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना अर्ज ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत वर्ग ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या अव्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात सन २०२५-२६ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरून लाभ घेता येणार आहे. सदर अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी http://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. अर्ज भरण्याची अंतिम तारीख दि. ३० नोव्हेंबर अशी निश्चित करण्यात आली आहे.ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्ज भरलेले नाहीत, त्यांनी नवीन तसेच नुतनीकरण अशा दोन्ही प्रकारचे अर्ज ऑनलाईन भरून सर्व आवश्यक कागदपत्रांसह दि. ३० नोव्हेंबर पर्यंत संबंधित कार्यालयात सादर करावेत. विहित कालावधीत अर्ज सादर न केल्यास व सदर योजनेपासून विद्यार्थी वंचित राहिल्यास संबंधित लाभार्थ्यांची जबाबदारी राहील, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन मंगला मुन, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, यवतमाळ यांनी केले आहे.

### दर्डा नगर परिसरात पुढील ३ ते ४ दिवस पाणीपुरवठा खंडित राहणार

यवतमाळ : पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरुस्ती अंतर्गत कार्यालय परिसरातून दर्डा नगर एम.बी.आर. ला पुरवठा करणाऱ्या ६०० मि.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहिनीवर गळती झाल्याने सदर गळती दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असून, गळती दुरुस्त होईपर्यंत अंदाजे ३ ते ४ दिवस दर्डा नगर एम.बी.आर. सात टाक्यांमार्फत होणारा पाणीपुरवठा खंडित राहणार आहे. या अंतर्गत प्रभावित होणाऱ्या टाक्यांमध्ये दर्डा नगर, बेले ले आऊट, वनवासी मारोती, सुयोग नगर १ व २ तसेच शिवाजी नगर १ व २ या परिसरांचा समावेश आहे. सर्व नळधारकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जलपुरवठा विभागाने केले आहे. सदर दुरुस्ती पूर्ण होताच पाणीपुरवठा त्वरीत सुरळीत करण्यात येईल, अशी माहिती कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, यवतमाळ यांनी कळविले आहे.

### गोवारी समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यम निवासी शाळांत शिक्षणाची संधी अर्ज करण्याचे आवाहन

यवतमाळ : महाराष्ट्र राज्य इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत विशेष मागास प्रवर्गातील "गोवारी समाजाच्या विद्यार्थ्यांना" नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी इंग्रजी माध्यम निवासी शाळांची निवड करण्यात आलेली आहे. शाळा निवडीचे निकष, पात्रता, अटी व शर्ती या विभागाच्या दि. १४ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सविस्तर नमूद करण्यात आले असून संबंधित माहिती www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# प्रेरणा गॅस एजन्सीत ई-केवायसी अनिवार्य

## ग्राहकांनी तातडीने पूर्ण करावी प्रक्रिया

**जनमाध्यम प्रतिनिधी**




पांढरकवडा - प्रेरणा गॅस एजन्सीच्या सर्व एलपीजी ग्राहकांसाठी आता ई-केवायसी (Electronic Know Your Customer) प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली आहे. केंद्र सरकार आणि तेल कंपन्यांच्या सूचनेनुसार, प्रत्येक ग्राहकाची ओळख व माहिती अद्ययावत ठेवणे आवश्यक असल्याने ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

एजन्सीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्या ग्राहकांनी अद्याप ई-केवायसी केली नाही, त्यांनी तातडीने प्रेरणा गॅस एजन्सी कार्यालयात प्रत्यक्ष येऊन प्रक्रिया पूर्ण करावी.अन्यथा,पुढील काळात गॅस सिलेंडर बुकिंग किंवा वितरणावर अडथळे येऊ शकतात, असा इशारा एजन्सीकडून देण्यात आला आहे. ई-केवायसीसाठी ग्राहकांनी आधार कार्ड, मोबाईल क्रमांक आणि गॅस ग्राहक क्रमांक (Consumer Number) सोबत आणणे आवश्यक आहे. प्रक्रिया मोफत असून काही मिनिटांत पूर्ण होते.

ग्राहकांची सोय पाहता एजन्सीने कार्यालयीन वेळ वाढवून सकाळी ९ ते संध्याकाळी ६ पर्यंत सेवा सुरू ठेवली आहे. एजन्सीच्या प्रतिनिधींनी सांगितले की, "ग्राहकांनी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत करावी शेवटच्या क्षणापर्यंत थांबू नये. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून आपली सेवा निर्बाध सुरू ठेवावी." अधिक माहितीसाठी संपर्क साधावा सतीश तुकाराम होले मो.८२७५२९७०३७/०७२३५३१३२१५

# जिल्ह्यातील नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : जिल्ह्यातील ९ नगरपरिषद, २ नगरपंचायत अध्यक्ष आणि सदस्य पदाच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम - २०२५ जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिद्ध केला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भानुसार हा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील नगरपरिषद यवतमाळ, पुसद, वणी, उमरखेड, दिग्रस, पांढरकवडा, दारव्हा, घाटंजी, नेर-नबाबपूर, आर्णी व नगरपंचायत ढाणकी या ठिकाणांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम २०२५ जाहीर करण्यात आला आहे. या कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याची मुदत दि. १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर दुपारी २ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली असून छाननी दि. १८ नोव्हेंबर रोजी होईल. नामनिर्देशन मागे घेण्याची अंतिम तारीख दि. २१ नोव्हेंबर असून प्रत्यक्ष मतदान दि. २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत पार पडेल. मतमोजणी दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून करण्यात येईल. याशिवाय या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. यवतमाळसाठी गोपाळ देशपांडे, उपविभागीय अधिकारी,शुभम क्यातमवार, मुख्याधिकारी, योगेश देशमुख, तहसीलदार यवतमाळ. पुसदसाठी आशिष बिजवल, उपविभागीय अधिकारी,पुसद महादेव जोरबर तहसीलदार पुसद. वणीसाठी नितीनकुमार हिंगोले, उपविभागीय अधिकारी,वणी सचिन गाडे, मुख्याधिकारी नगरपरिषद वणी उमरखेडसाठी सखाराम मुळे, उपविभागीय अधिकारी,उमरखेडअजय कुरवाडे, मुख्याधिकारी नगरपरिषद,उमरखेड दिग्रससाठी विजय सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी,दारव्हा मयुर राऊत, तहसीलदार दिग्रस पांढरकवडासाठी अमित रंजन, सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,केळापूर शशिकांत बाबर, मुख्याधिकारी,नगरपरिषद पांढरकवडा राजेंद्र इंगळे, तहसीलदार केळापूर दारव्हासाठी रवि काळे, तहसीलदार दारव्हा विठ्ठल केदारे, मुख्याधिकारी, नगरपरिषद दारव्हा. घाटंजीसाठी सुधीर पाटिल, उपविभागीय अधिकारी, राळेगाव राजु घोडके, मुख्याधिकारी, नगरपरिषद घाटंजी विजय साळवे, तहसीलदार घाटंजी. नेर-नबाबपूरसाठी पुरुषोत्तम भुसारी, तहसीलदार नेर श्रीमती पल्लवी सोटे, मुख्याधिकारी,नगरपंचायत बाभूळगाव आर्णीसाठी वैशाख वाहूरबाघ, तहसीलदार आर्णी रविंद्र राऊत, मुख्याधिकारी नगरपरिषद आर्णी ढाणकीसाठी राजू सुरडकर, तहसीलदार उमरखेड अरुण मोकळ, मुख्याधिकारी,नगरपंचायत ढाणकी. या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

# पुसद तालुक्यात अजगर आढळला

## जाळीत अडकलेल्या सापाला सर्पमित्रांकडून जीवनदान

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - तालुक्यात एका शेतातील जाळीत अडकलेल्या मोठ्या अकराच्या भारतीय अजगराला (इंडियन रॉक पायथन) एम एच २९ हेल्पिंग हँड टीमच्या सर्पमित्रांनी धाडसी बचावकार्य करत सुखरूप जीवनदान दिले. विशेष म्हणजे, पुसद तालुक्यात 'अनुसूची एक' मध्ये येणारा हा दुर्मिळ अजगर आढळल्याची ही पहिलीच अधिकृत नोंद ठरली आहे.

घटनेची माहिती अशी की, येथील शेतकरी सुरज चव्हाण यांच्या शेतात काही महिला मजूर कापसाची वेचणी करत होत्या. यावेळी त्यांना शेताला लावलेल्या जाळीत एक मोठा साप अडकलेला दिसला. घाबरलेल्या महिलांनी तात्काळ शेताबाहेर धाव घेतली. शेतकरी सुरज चव्हाण यांनी हा 'घोणस' जातीचा साप असावा असा अंदाज बांधून, एम एच २९ हेल्पिंग हँड टीमच्या सर्पमित्रांना तातडीने कॉल करून माहिती दिली. माहिती मिळताच, एमएच २९ हेल्पिंग हँड्सचे तालुका अध्यक्ष व वन्यजीव रक्षक दिनेश पिंपरे यांनी आपल्या टीमसह त्वरित घटनास्थळ गाठले. तिथे पाहणी केली असता, तो घोणस नसून एक मोठ्या आकाराचा 'इंडियन रॉक पायथन' (वैज्ञानिक नाव: Python molurus molurus) म्हणजेच भारतीय अजगर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अंदाजे दोन दिवसांपूर्वी आपल्या शिकारीचा पाठलाग करत असताना हा अजगर त्या जाळीत अडकला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. दिनेश पिंपरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत काळजीपूर्वक जाळी कापून त्या अजगराला सुखरूपरीत्या बाहेर काढले.

अजगर-घोणस यातील फरक केला स्पष्ट यावेळी सर्पमित्र दिनेश पिंपरे यांनी उपस्थित शेतकरी व मजुरांना सापाविषयी महत्त्वाची माहिती देऊन त्यांच्या मनातील भीती दूर केली. ते म्हणाले "भारतीय अजगर हा पूर्णपणे बिनविषारी साप असून तो अनुसूची एकमध्ये येतो. हा अतिशय दुर्मिळ असून पुसद तालुक्यात याआधी तो आढळल्याची एकही नोंद नाही. अजगर आणि घोणस यांची शरीररचना जरी दिसायला सारखी असली, तरी अजगर भक्ष्याला वेटोळे घालून ठार करतो, तर घोणस हा अतिविषारी असून तो विषाचा वापर करतो." वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली अधिवासात मुक्त या बचावकार्याची माहिती तात्काळ वनविभागाला देण्यात आली. मा. उपवनसंरक्षक (पुसद वनविभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, आर.एफ.ओ. पुसद (प्रादेशिक), वनरक्षक गोदमले साहेब वनरक्षक बदर साहेब आणि वाहन चालक अजय राऊत यांच्या समक्ष या सापाची वन विभागात रीतसर नोंद करण्यात आली. त्यानंतर या अजगराला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. ही कामगिरी यशस्वी करण्यासाठी सर्पमित्र वन्यजीव रक्षक दिनेश पिंपरे यांच्यासह आनंद खडसे, गौतम खडसे, आधी फुलाते, निखिल गायकवाड, गुड्डू राऊत आणि अभिषेक हरसुलकर यांनी मोलाचे सहकार्य केले.

# जि.प. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - फुलसावंगी येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये इ.स. १९७६-७७ मध्ये मॅट्रिक झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा सुवर्ण स्नेहमेळावा २ नोव्हेंबर रोजी शाळेच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक व मुख्याध्यापक मुरलीधर चक्करवार तर प्रमुख अतिथी विद्यमान मुख्याध्यापक हातमोडे सर उपस्थित होते.

मेळाव्यास ३० माजी विद्यार्थ्यांनी उत्साहाने हजेरी लावली. सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रा. रमेश वाघमारे यांनी स्वर्गवासी मुख्याध्यापक बोन्ते सर, राजुरकर, बोक्षे, शेख सर तसेच स्वर्गवासी माजी विद्यार्थ्यांना श्रद्धांजली वाहिली. उपस्थित विद्यार्थ्यांनी आपल्या ५० वर्षांच्या जीवन प्रवासाच्या आठवणींना उजाळा दिला. मुख्याध्यापक हातमोडे सरांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

अध्यक्षीय भाषणात मुरलीधर चक्करवार सरांनी शिक्षणाने जीवनाचा कसा कायापालट होतो, हे प्रेरणादायी शब्दांत सांगितले. त्यांचा शाल श्रीफळाने सत्कार झाला. कार्यक्रमाचे संयोजक संजय मुत्तेमवार यांनी सर्व आर्थिक भार उचलत उत्कृष्ट आयोजन केले, तर उत्तम पाचंगे यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले. शेवटी स्नेहभोजनाने मेळाव्याची सांगता आनंदमय वातावरणात झाली.

# शहरातील कचरा माफियांवर कारवाई होणार

## महापालिकेने उच्च न्यायालयाकडे ४ आठवड्यांचा मागितला वेळ

**अमरावती/का.प्र.**


महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छता कंत्राटावरील सुरू असलेल्या वादावर नागपूर खंडपीठाने मंगळवार, ४ नोव्हेंबर रोजी सुनावणी केली. जुन्या झोननिहाय कंत्राटदारांवर कारवाई करण्यासाठी महानगरपालिकेने चार आठवड्यांचा वेळ मागितला. तसेच नवीन एकल कंत्राट प्रक्रियेची स्थिती स्पष्ट करण्याचे आश्वासन दिले. न्यायमूर्ती अनिल एस. किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश बैस यांच्या अध्यक्षतेखाली ही सुनावणी झाली.

विभागीय खंडपीठाने महानगरपालिकेचे अपील स्वीकारले.तत्कालीन आयुक्त प्रवीण आष्टीकर यांच्या कार्यकाळात, विभाग-आधारित कंत्राट प्रणाली रद्द करण्यात आली आणि झोन-आधारित कंत्राट प्रणाली लागू करण्यात आली. त्यावेळी, कंत्राटदारांना फायदा व्हावा यासाठी महानगरपालिकेने नियमांमध्ये अनेक त्रुटी सोडल्या होत्या. मुख्य म्हणजे करारात कंत्राटदाराला प्रत्येक विभागात किती स्वच्छता कामगार नियुक्त करावे लागतील हे स्पष्टपणे नमूद केलेले नव्हते. या त्रुटीमुळे,निविदा प्रक्रियेत गुप्तता पाळली.न्यायालयाच्या आदेशानंतर, महानगरपालिकेने एकाच स्वच्छता करारासाठी निविदा जारी केली, ज्यासाठी चार कंत्राटदारांनी अर्ज केले होते. त्यांच्या कागदपत्रांची तपासणी आणि आर्थिक निविदा सोमवारपर्यंत जारी करायच्या होत्या, परंतु महानगरपालिकेने या प्रक्रियेबाबत असामान्य गुप्तता पाळली. परिणामी, मंगळवारी न्यायालयात ठोस माहिती सादर करता आली नाही.

झोननिहाय कंत्राट पद्धतीविरुद्ध दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना, उच्च न्यायालयाने ही पद्धत रद्द केली आणि महापालिकेला नवीन निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे आणि जुन्या कंत्राटदारांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाने ४ नोव्हेंबर रोजी सुनावणीची तारीख निश्चित केली. त्यावेळी, महापालिकेने एकल निविदा प्रक्रियेत आर्थिक निविदा उघडल्या नव्हत्या, तसेच जुन्या कंत्राटदारांवर कोणतीही कारवाई केली नव्हती.सुनावणीदरम्यान, महापालिकेच्या वकिलांनी न्यायालयाला माहिती दिली की, दोषी कंत्राटदारांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यासाठी चार आठवडे आवश्यक आहेत. शिवाय, या कालावधीत नवीन एकल कंत्राट प्रक्रियेची स्थिती स्पष्ट केली जाईल. न्यायालयाने महापालिकेला ही मुदत दिली आणि पुढील सुनावणीपर्यंत दोन्ही मुद्द्यांवर ठोस प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

# रोलर हॉकी राज्यस्तरीय स्पर्धेत एडिफाय स्कुलचा सहभाग

**अमरावती/का.प्र.**




नाशिक येथे ७ ते ९ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ३५ व्या राज्यस्तरीय रोलर हॉकी चॅम्पियनशिप स्पर्धेत एडिफाय स्कूल, अमरावती या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून शाळेचा गौरव वाढविला आहे.या स्पर्धेत अथर्वसिंग गजराजसिंग नरडे (इ. ८ वी) आणि निहार वैभव ठाकरे (इ. ८ वी) हे दोन विद्यार्थी आपल्या शाळेचे प्रतिनिधित्व करणार आहेत. दोघा खेळाडूंनी कठोर परिश्रम आणि उत्कृष्ट प्रशिक्षणाच्या जोरावर या स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

शाळेचे डायरेक्टर व प्राचार्य डॉ. जेकब दास यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत त्यांच्यावर आपला विश्वास व्यक्त केला आहे. त्यांनी सांगितले की, 'एडिफाय स्कूलचे विद्यार्थी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर क्रीडा क्षेत्रातही उज्ज्वल कामगिरी करून शाळेचे नाव राज्यभर उजळवत आहेत.'या विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी क्रीडा प्रमुख आनंद उईके तसेच अनुराग सिरसाट आणि प्राची कन्नाके यांनी विशेष मार्गदर्शन केले. या प्रसंगी देवी एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री. पूरणलाल हबलानी, संचालक सिवारामा कृष्णा, पल्लवी चकिलाला,रवी इंगडे तसेच एडिफाय परिवारातील सर्वांनी क्रीडा विभागाला हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त

### दोन दिवसीय जीवन प्रमाणपत्र शिबीर

**अमरावती-** सेवानिवृत्त नागरिकांना नोव्हेंबर महिन्यात सादर करावयाच्या जीवन प्रमाणपत्रांसाठी ॲड. अमोल ठाकरे असोसिएट्स व राजेद्र महल्ले मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत जीवन प्रमाणपत्र शिबीर आयोजित करण्यात आले आहे.हे शिबिर शनिवार, रविवार८ व ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते सायं. ५ या वेळेत ठाकरे असोसिएट्स ऑफिस, धन्वंतरी नगर आयुर्वेदिक महाविद्यालय समोर दस्तूरनगर येथे आयोजित करण्यात आले आहे. माजी नगरसेवक राजेंद्र महल्ले त्यांनी यापूर्वीदेखील विविध सामाजिक उपक्रम राबविले आहे, याचाच एक भाग म्हणून या शिबिराचे आयोजन केले आले. केंद्र व राज्य सरकारी सेवानिवृत्त कर्मचारी, अशासकीय निवृत्ती वेतन कर्मचारी, ईपीएफ पेंशन धारक शिबिरामध्ये ईपीएफ पेंशनधारक, राष्ट्रीय पेन्शन योजना एन. पी. एस. सदस्य तसेच सर्व शासकीय सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी होऊ शकतात.शिबिरासाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये आधारकार्ड, पेन्शन खात्याचे बँक पासबुक, पी.पी.ओ. नंबर मोबाईल सोबत आणणे आवश्यक आहेकिंवा मागील वर्षाचे जुने जीवन प्रमाणपत्र असल्यास सोबत आणावे. उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन माजी नगरसेवक राजेद्र महल्ले यांनी केले आहे.

### श्रीराम प्राथमिक शाळेत दीपोत्सव



**टाकरखेडा संभू-** श्रीराम शिक्षण संस्था अंतर्गत श्रीराम प्राथमिक शाळा, टाकरखेडा शंभू येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दीपोत्सवाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे नेतृत्व मुख्याध्यापक प्रवीण पाटील यांनी केले.अध्यक्षस्थानी डॉ. नीलंबरी देशमुख होत्या. यावेळी सदस्य प्रदीप देशमुख,अशोक मेश्राम,श्याम देशमुख तसेच गावातील मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांसाठी विविध खेळस्पर्धांनी करण्यात आली. संगीत खुर्ची, मटका फोड, लिंबू चमचा, बास्केटबॉल व धावण्याच्या स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.विद्यार्थ्यांमध्ये बचतीची सवय रुजविण्यासाठी 'श्रीराम बचत बँकेची' स्थापना करण्यात आली असून, या बँकेचे उद्घाटन अध्यक्ष मा. नीलंबरी देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक अतुल खांदे, प्रमोद विघे, प्रशांत देशमुख, रेखा खटाळे, अश्विनी दिंडिलकर, गौरी जुनघरे यांनी परिश्रम घेतले.पद्मा सवाई व माजी विद्यार्थ्यांचेही सहकार्य लाभले.विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारात दीपमाळ प्रज्वलित करून 'अंधारातून प्रकाशाकडे' या संदेशाचा अर्थ प्रत्यक्ष अनुभवला.

### आदर्श विद्यालयाची खो-खो चमू राज्यस्तरावर




**टाकरखेडा संभू-** श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्था, तळवेल संचलित आदर्श विद्यालय जवळा शहापूर येथील १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या खो-खो चमूने पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध करत सलग दुसऱ्यांदा राज्यस्तरावर प्रवेश मिळविला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.टोम्पे कॉलेज, चांदूरबाजार येथे झालेल्या अत्यंत चुरशीच्या सामन्यात जवळा शहापूर (अमरावती ग्रामीण) संघाने अमरावती महानगरपालिकेच्या संघावर विजय मिळवत राज्यस्तरीय पात्रता संपादन केली.या यशामागे प्रशिक्षक माजी विद्यार्थी ऋषिकेश ठाकरे यांचे मार्गदर्शन तसेच गावातील माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. सामन्यावेळी गावातील नागरिक व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन दिले.यशाबद्दल संस्थाध्यक्ष राजाभाऊ दादा देशमुख, सचिव नरेंद्र देशमुख, सर्व पदाधिकारी, शाळा समिती सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग आणि गावकऱ्यांनी विजयी संघ, प्रशिक्षक व प्रभारी शिक्षकांचे अभिनंदन केले.

### सलग ९६ तासाच्या गीतांच्या सादरीकरणातून अमरावतीत रचला विक्रम

**अमरावती-** शहरात प्रथमच ९६ तासाचा नॉन स्टॉप वर्ल्ड रेकॉर्ड करून एक नवा विक्रम प्रस्थापित करण्यात आला. प्रभूदासजी फंदे व पवन फंदे तसेच मनीष पाटील फाउंडेशन नागपूर यांच्या संकल्पनेतून कठोरा नाका येथील रंगोली लॉन येथे हा अनोखा विश्व उपक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे उदघाटक लेडी गव्हर्नर कमलाताई गवई, प्रमुख पाहुणे मा.खासदार अनिलजी बोंडे, सामाजिक कार्यकर्ता डॉ. गोविंद कासट, डॉ. गणेश खारकर,माजी प्राचार्य दिलीप सिंहजी खांबरे, माजी प्राचार्य दिलीप काळे, प्रादेशिक अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक मंडळ पुरुषोत्तम गावंडे, अरुण वानखडे, लहानुजी बॅग सेंटरचे संचालक मोहन कडू, शुभम विंचुरकर, प्रफुल्ल कसर,सुरसंगीत कराओके क्लबचे संचालक प्रभूदासजी फंदे,पवन फंदे या उपस्थितीत प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

या स्पर्धेत एकूण २०० कलाकारांनी भाग घेऊन किशोर कुमार यांच्या आवाजातील गाण्यांचे सादरीकरण केले.याप्रसंगी पत्रकार राजेंद्र ठाकरे,विजय गायकवाड, राजेंद्र वाघमारे, शैलेश शिरभाते, जोशना शेटे, प्रमोद डंबाले, अविनाश देशमुख, बबलू ठाकूर, पराग अंबाडकर, मनोज शिरभाते, सौरभ पाचडे, मुकुल पळणीटकर, चित्रा पळणीटकर, शशिकांत देशमुख, संजय मोहोड,कल्पना नाईक, मनीषा राऊत, सुजाता नवले, गौरी सतके, शिवदास कडूकर, जयंत वसतकर, प्रमोद कडू, राजेश वाडेकर, प्रकाश ढोले, चिंतामण खोब्रागडे, रत्ना पाटील, नंदा वाघमारे, राजेश परमार, राजेंद्र तीवलकर, उद्धव जुकरे, शशिकांत ढोले, राजेश श्रीराव, सुनंदा भोवते, संजीवनी कडू, डॉ.वामन जवंजाळ, डॉ. संजय गोरे, प्रवीण चंद्र मसराम प्रवीणचंद्र मसराम यांच्यासह अनेक कलाकार उपस्थित होते.

# स्नेहल सोनारघरे सीए परीक्षा उत्तीर्ण



**अमरावती/का.प्र.**

सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालय अमरावती येथील अधीक्षक राजू सोनारघरे यांची कन्या स्नेहल हिने सीए परीक्षा उत्तीर्ण करून मोठे यश मिळविले आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या सनदी लेखापाल चार्टर अकाउंटंट या परीक्षेत स्नेहल सोनारघरे हिने यश प्राप्त करून आपल्या परिश्रमाचे फलित केले. सुरुवातीपासूनच मोठ्या पदावर जाण्याचा ध्यास असलेल्या स्नेहलने आपल्या मेहनत व अभ्यासाच्या जोरावर यश संपादन केले. या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत असून संत. गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ महाविद्यालयीन परिक्षेत्रीय कर्मचारी संघटनेच्या वतीने तिचे अभिनंदन करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष प्रशांत देशमुख, सचिव प्रफुल्ल घवळे, विभागीय कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर बारस्कर, जयंत निखारे यांनी सोनारघरे यांच्या घरी जाऊन स्नेहलचे अभिनंदन केले व सत्कार करून तिला पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# श्रीक्षेत्र कौंडण्यपूरनगरीत पालख्यांचे स्वागत

**कु-हा/वार्ताहर**

विदर्भाची पंढरी आई रूक्मिणी मातेचे माहेर अशा प्राचीन पुरातन तीर्थक्षेत्र असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कार्तिक मास सोहळा ३० ऑक्टोबरपासून सुरू होऊन यामध्ये दररोज सकाळी महापूजा अभिषेक, काकडा आरती, भजनाचा कार्यक्रम व रात्री हरिपाठ कीर्तन आदी भरगच्च धार्मिक कार्यक्रम सुरू आहे.



तसेच ६ नोव्हेंबरला सकाळी ६ वा. 'श्री' ची महापूजा सौ. व श्री. राजेश वानखडे आमदार तिवसा विधानसभा सौ. वश्री. नामदेवराव अमाळकर अध्यक्ष श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर यांच्याहस्ते तथा संस्थानचे समस्त विश्वस्त मंडळाच्या उपस्थितीत त्याचप्रमाणे ७.३० वा. स्थानिक ह.भ.प. पंकज महाराज महल्ले श्रीक्षेत्र कौंडण्यपूर यांच्या नेतृत्वाखाली भव्य नगर प्रदक्षिणा निघेल. वसंत डाहे, उपाध्यक्ष अशोक पवार, सुरेश चव्हाण, अतुल ठाकरे विश्वस्त यांच्या उपस्थितीत तसेच गावकरी पंचक्रोशीतील सर्व वारकरी भक्तांच्या सहकार्याने नगर प्रदक्षिणाचा कार्यक्रम होईल. पहाटे ५ ते सकाळी ७ वाजेपर्यंत महापूजा सकाळी ७.३० वा. सर्व पालख्या व दिंड्यांची नगर प्रदक्षिणा सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी यांचा खंजेरी भजनाचा कार्यक्रम, दुपारी १२ ते २ वा. काल्याचे कीर्तन कीर्तनकार ह. भ. प. आचार्य लक्ष्मण महाराज बोधेगांवकर अध्यापक गाथा मंदिर देहू यांच्या सुमधुर वाणीतून कीर्तन होईल. साथसंगत कौंडण्यपूर तथा पंचक्रोशीतील वारकरी भजनी मंडळ दुपारी ३ ते ३.४५ वा. आमंत्रित संत सायंकाळी महंतांचे आशीर्वाद घेऊन मार्गदर्शन व प्रवचन. ४ था. दहीहंडी सोहळा वि. गोपाळपुरी येथे श्री संत जितेंद्रनाथ महाराज (पिठाधीश्वर देवनाथ मठ अंजनगाव सुर्जी), जगतगुरु श्री राजराजेश्वराचार्य महाराज माऊली सरकार (पिठाधीश्वर रुक्मिणीपीठ अंबिकापूर कौंडण्यपूर), श्री संत सचिन देव महाराज (अमरावती), श्री संत सचिन देव महाराज (अमरावती) यांच्या प्रमुख उपस्थितीत दहीहंडी साजरी होणार आहे. मंदिराच्या सर्व अधिकाऱ्यांचे, विश्वस्त.

संचालन सदानंद साधू सचिव श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान श्रीक्षेत्र कौंडण्यपूर हे करतील. तरी सर्व येणाऱ्या भक्तांनी या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष सचिव विश्वस्त मंडळ यांनी केले आहे.

# खा.डॉ.अनिल बोंडे यांची निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्ती

**अमरावती/का.प्र.**

भाजपाने अमरावतीचे माजी पालकमंत्री तथा राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात अमरावती जिल्ह्यात न भूतो न भविष्यती असे ऐतिहासिक यश गेल्या विधानसभा निवडणुकीत मिळवल्यानंतर पुन्हा एकदा भाजपने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जोरदार मोर्चे बांधणी सुरू केली असून डॉ.अनिल बोंडे यांची निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडून त्यांना हे विशेष जबाबदारी देण्यात आली आहे.



दहा नगरपरिषद दोन नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी महाराष्ट्र निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम लागू केला आहे. त्याप्रमाणे जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. त्यासाठी भाजपने देखील कंबर कसली आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने जोरदार कामगिरी केल्यानंतर पुन्हा एकदा माजी कृषी मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात भाजपने जिल्ह्यात निवडणूकांचे रणशिंग फुंकले आहे. त्याप्रमाणे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी डॉ.अनिल बोंडे यांची अमरावती जिल्ह्याच्या निवडणूक प्रमुखपदी नियुक्ती केली आहे. त्यासाठी डॉ.अनिल बोंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आभार मानले आहेत. या संदर्भात बोलताना त्यांनी सांगितले की, स्थानिक स्तरावर बूथ पासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत भाजपचे संघटन अतिशय बळकट आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तळागाळातील कार्यकर्ता प्रचंड आशावादी आहे. कार्यकर्त्यांची निवडणूक असल्याने भाजप या सर्व निवडणुकांमध्ये मोठा विजय मिळवल्याशिवाय राहणार नाही, असे देखील त्यांनी स्पष्ट केले आहे.

# लाडकी बहीण योजनेतून परित्यक्त्या,विधवा होणार बाद

## केवायसीला १८ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

**अमरावती/का.प्र.**

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला आता शासनाने कात्री लावली असून यापुर्वी शासकीय महिला कर्मचारी, वाहनधारी व अधिक उत्पन्न असलेल्या महिलांना योजनेतून बाद केले आहे. आता शासनाकडून पतीच्या उत्पन्नावर वॉच ठेवत अशा महिलांना केवायीचीची अट लादली आहे. परंतु विधवा आणि परित्यक्त्या महिलांना मात्र केवायसीत अटीची पुर्तता करण्यास अडचणी येत असल्याने त्या आपोआपच या योजनेतून बाद होणार आहे. या केवायसीकरिता १८ नोव्हेंबरची डेडलाईन देण्यात आलेली आहे.

जिल्ह्यामधून ७ लाख २० हजार ५७५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २२ हजार ४७२ अर्ज अपात्र ठरविण्यात आले. ६ लाख ९८ हजार १०३ बहिणींना पात्र करण्यात आले. त्यांना आतापर्यंत माहेवारी अनुदान सुरू होते.



विधानसभा निवडणुकीपूर्वी अट न घालता लाडक्या बहिण योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन केले होते. त्यामध्ये आता दिवसेंदिवस अटी व शर्ती घालून लाडक्या बहिणींची संख्या कमी केली जात आहे. या अटीमुळे जिल्ह्यात सर्वाधिक ६६ हजार लाडक्या बहिणींना वगळण्यात आलेले आहे. जिल्ह्यातून फक्त २५६ महिलांना स्वःतहून लाभ सोडला तर ११ सरकारी कर्मचारी लाडक्या बहिणींना बाद करण्यात आले आहे. आता यामधून आणखी कपात करण्याकरिता शासनाने लाडक्या बहिनींच्या पतीचेही आधारकार्ड संलग्न करण्याची अट लादून केवायसीचे बंधन घातले. या ई केवायसीमध्ये विधवा, परित्यक्त्या महिलांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. येत्या १८ नोव्हेंबरपर्यंत महिलांनी केवायसी न केल्यास त्या देखील योजनेतून बाद होण्याची शक्यता आहे. लाडक्या बहिणी योजनेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्येसुद्धा विधवा व परित्यक्त्या महिलांनी ई केवायसी कशी करायची या संदर्भात प्रश्न उपस्थित केले आहे.

# जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब पदभरती-२०२३च्या प्रतीक्षासूचीला मुदतवाढ

## युवक काँग्रेसच्या पाठपुराव्याला यश

**अमरावती/का.प्र.**


जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब पदभरती-२०२३ची प्रतीक्षा यादी ११ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध झाली होती. या यादीचा कालावधी १० ऑक्टोबर, २०२५ रोजी संपुष्टात येत असल्याने प्रतीक्षायादीतील सर्व उमेदवार अत्यंत चिंतेत होते. त्यांची मागणी लक्षात घेती मुंबई येथे पार पडलेल्या महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या राज्य कार्यकारणी बैठकीत अमरावती विधानसभा युवक काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराजदादा मोरे यांचे लक्ष या गंभीर मुद्द्याकडे वेधले व त्यांना ही समस्या लक्षात आणून दिली. या गंभीर विषयाची तातडीने दखल घेऊन शिवराजदादा मोरे यांनी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या वतीने मृदा व जलसंधारण विभागाकडे आणि शासन दरबारी सातत्याने याचा पाठपुरावा केला. याच यशस्वी पाठपुराव्याचे फलित म्हणून महाराष्ट्र शासनाने 'विशेष बाब' म्हणून या पदभरतीच्या प्रतीक्षासूचीचा कालावधी ३१ डिसेंबर, २०२५पर्यंत वाढवण्याचा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला असून २८ ऑक्टो. २०२५ ला काढण्यात आलेल्या पत्राद्वारे कळविण्यात आला आहे. त्यामुळे अनेक उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला असून शासकीय सेवेत रुजू होण्याची त्यांची आशा पल्लवीत झालेली आहे.

३ नोव्हेंबर, २०२५ रोजी टिळक भवन मुंबई येथे महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची राज्य कार्यकारणी बैठक पार पडली. यावेळी या प्रतीक्षासूचीला मुदतवाढ मिळवून देण्याकरिता केलेल्या यशस्वी पाठपुराव्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष मा.शिवराज दादा मोरे यांना अमरावती विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख यांनी आभार पत्र देऊन प्रतिक्षायादीतील सर्व पात्र उमेदवारांच्यावतीने त्यांचे आभार मानले. यावेळी युवक काँग्रेस ग्रामीण जिल्हाध्यक्ष पंकज मोरे, प्रदेश महासचिव राहुल येवले, प्रदेश सचिव सागर कलाने, शहरजिल्हा उपाध्यक्ष अनिकेत ढेंगळे, शहरजिल्हा उपाध्यक्ष सागर यादव, बडनेरा विधानसभा उपाध्यक्ष आशिष यादव, बुलढाणा जिल्हा युवक काँग्रेसचे प्रभारी श्रेयस इंगोले, पुणे जिल्हा युवक काँग्रेसचे प्रभारी ॲड. विवेक गावंडे हे देखील उपस्थित होते.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय





**टाइमपास म्हणून खेळले जाणारे ऑनलाइन खेळ आता तरुणांच्या जिवाशी खेळू लागले आहेत. तरुणांना इंटरनेटच्या माध्यमातून गेम्स खेळण्याचा छंदच लागला आहे. त्यांच्या या छंदामुळे बाजारात कन्सोल्स व पोर्टेबल डिव्हाईसच्या ऑनलाइन भागीदारीत वाढ झाली, परंतु ते ऑनलाइन गेम्स आयुष्य उद्ध्वस्त करत आहेत. मोबाईल गेमचा मुलांना लागलेला लळा पालकांना सर्वच दृष्टीने महाग पडू लागला आहे.**



# जिवावर बेतणारे ऑनलाइन गेम्स!

सध्या शालेय पिढी मीडियाच्या आहारी गेली असून मैदानी खेळांना विसरत चालली आहे. पूर्वी साधेसोपे असणारे खेळ आता ऑनलाइन, रिव्हर्स चॅलेंज आणि लेव्हलच्या चौकटीत अडकल्याने हेच गेम्स जिवावर बेतल्याच्या घटना समोर येत आहेत. गेम्सच्या आहारी गेल्याने शालेय पिढीतील मुलांनी आत्महत्या केल्याच्या बातम्या आहेत.

२०१५-२०१६ या एका वर्षात जगात ऑनलाइन गेमच्या लेव्हल स्वीकारत, ते सांगतील तसे करत १३० मुलांनी आत्महत्या केल्या होत्या. इंग्लंड आणि दुबईमधल्या शाळांनी काही वर्षांपूर्वी पालकांना 'ब्ल्यू व्हेल चॅलेंज' नावाच्या खेळापासून आपल्या मुलांना वाचविण्याच्या सूचना दिल्या होत्या. जगभरातील अनेक किशोर वयातील मुलांचा या गेमने जीव घेतला होता. अशाच अनेक भयानक खेळांकडे १४-१५ वर्षे वयोगटातील मुले जास्त आकर्षित होताना दिसत आहेत.

लहान मुलांना आणि तरुणाईला ऑनलाइन गेमचे व्यसन लागलेले असून त्यांच्या आहारी जाऊन अनेक शारीरिक आणि मानसिक विकार त्यांना जडलेले आहेत. ब्ल्यू व्हेल, कॅंडी क्रश, रमी, तीन पत्ती आणि पोकोमन गो अशा वेगवेगळ्या गेम्सने तरुणाईला वेड लावले आहे. जगभरातल्या स्मार्टफोन धारकांची सध्या ही अशी अवस्था झालेली आहे. कन्सोलसाठी पैसे आकारणाऱ्या गेम कंपन्यांनी मोबाईलवर हे गेम उपलब्ध करून देताना पैसे आकारले आहेत, पण पैसे भरूनही गेम खेळणा-यांची संख्या खूप मोठी आहे.

टाइमपास म्हणून खेळले जाणारे ऑनलाइन खेळ आता तरुणांच्या जिवाशी खेळू लागले आहेत. तरुणांना इंटरनेटच्या माध्यमातून गेम्स खेळण्याचा छंदच लागला आहे. त्यांच्या या छंदामुळे बाजारात कन्सोल्स व पोर्टेबल डिव्हाईसच्या ऑनलाइन भागीदारीत वाढ झाली, परंतु ते ऑनलाइन गेम्स आयुष्य उद्ध्वस्त करत आहेत. मोबाईल गेमचा मुलांना लागलेला लळा पालकांना सर्वच दृष्टीने महाग पडू लागला आहे. या गेमच्या व्यसनापायी मुले तासन्तास एकाच जागी बसून स्वमग्न होऊ लागले आहेत. गेमच्या नादात त्यांना कशाचेही भान राहिले नाही. मुलांचे मोबाईलवरील गेममुळे अभ्यासात लक्ष घालणे सोडून दिले आहे. शालेय वयातील मुलांना अभ्यासातून ब्रेक म्हणून त्यांच्या हातात मोबाईल, टॅब देणे किंवा मग तणावातून रिलॅक्स होण्यासाठी गेम खेळण्याची सवय अस, हे टाइमपास म्हणून गेमिंग करणे धोक्याचे बनत चालले आहे. टॅब, कॉम्प्युटर, लॅपटॉप व मोबाइलवर ऑनलाइन गेम्स खेळणाऱ्या लहान मुले, मुली, तरुण, तरुणींना दृष्टिदोष, निद्रानाश, थकवा, चिडचिडेपणाचा त्रास सुरू होतो. त्यांना ब-याच समस्यांना तोंड द्यावे लागते. झोपेत असतानाही त्यांना वेगवेगळे भास होतात. विस्मरण, एकाग्रतेचा अभाव, ग्रहणशक्ती कमी होणे, योग्य निर्णय घेता न येणे असे गंभीर परिणाम होण्याची त्यांना सतत भीती वाटते.

ऑनलाइन गेमिंगच्या व्यसनाचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे एकमेकांतील संवाद हरवणे होय. त्यामुळे आज सुसंवाद आपल्या कुटुंबीयांसोबत, आप्तेष्ट आणि मित्रपरिवारांसह करणे ही आजच्या काळाची गरज बनली आहे. आजही मोबाईलच्या आहारी गेलेल्या अनेक तरुण आणि लहान मुलांवर मानसोपचारांद्वारे उपचार सुरू असल्याची अनेक उदाहरणे आहेत. दिवसभर ऑफिसला जाणा-या पालकांमुळे लहान वयातच बळावत चाललेला एकटेपणा या मुलांना गेमच्या आहारी जाण्यास भर पाडत आहे. पालकांनी मुलांना वेळ द्यावा. त्यांना समजून घ्यावे. त्यांचे ऐकून घ्यावे आणि त्यांच्यावर दबाव न आणता गेमिंगच्या आभासी दुनियेपासून त्यांना दूर जाण्यासाठी प्रयत्न करावेत. जेणेकरून ही मुले भविष्यात मानसिक रुग्ण होण्यापासून किंवा गेमिंगमुळे स्वतःच्या जिवाला दुरावण्यापासून परावृत्त होतील.

रात्र ही शांत झोपण्यासाठी आहे. उत्तम मानसिक, शारीरिक आरोग्यासाठी कार्यक्षमतेसाठी आणि जीवनाप्रती आशावाद वाढवण्यासाठी योग्य वेळेतील नैसर्गिक शांत गाढ झोप हा सर्वश्रेष्ठ उपाय आहे. आयुष्य म्हणजे इंटरनेट नव्हे, तो फक्त एक छोटा भाग आहे. मोबाईल, इंटरनेटचा वापर मर्यादितच करा. गरजेपुरताच करा. रात्री उशिरापर्यंत इंटरनेटवर गेम खेळणे, बघणे तत्काळ थांबवा. इंटरनेटचे व्यसन लागले असेल तर ते लगेच मान्य करा. त्यावर योग्य तो उपचार घ्या. मन मोकळे करण्यासाठी, भावना व्यक्त करण्यासाठी आभासी माध्यमांचा वापर बंद करा. प्रत्यक्ष माणसांसोबत बोला, भेटा, फोन खोटा खरे भेटा हे तत्व अंगीकारा.

भावनेच्या भरात चुकून किंवा गैरप्रकाराने तुम्ही तुमची व्यक्तिगत माहिती इंटरनेटवर शेअर केली असल्यास घाबरू नका. तुमच्या मनातील भीतीवर गैरप्रकार आणि कुविचारी प्रवृत्ती जगत असतात. सरळ सरळ पोलिसांची मदत घ्या. तुमची गोपनीयता राखली जाते. कोणत्याही प्रकारचा अन्याय किंवा छळ सहन करू नका. जगात खूप चांगली माणसे आहेत ती तुमच्या मदतीसाठी सदैव तयार आहेत. हे सत्य आहे हे कायम लक्षात ठेवा. नकारात्मक गाणी, प्रोग्राम आणि विचारांपासून स्वतःला नेहमी दूर ठेवा. प्रेरणादायी गोष्टी खूप आहेत. त्याकडे लक्ष द्या. सामाजिक कार्यांमध्ये भाग घ्या. त्यात जास्त समाधान आहे आणि ती काळाची गरजदेखील आहे. चूक मान्य करण्याची हिंमत ही आत्महत्या करण्यापेक्षा जास्त सन्माननीय असते. चुका लपवण्याच्या नादात आणखी गंभीर चुकांमध्ये तुम्ही अडकत जाल. आपल्या घरातील माणसांसोबत मनमोकळेपणाने बोला. त्यांची मदत घ्या. जीवन हे फक्त स्वतःपुरते नाही. आपल्यावर काही जबाबदाऱ्या आहेत. आपण कुटुंबाचे, समाजाचे, देशाचे आणि मानवतेचे काहीतरी देणे लागतो याचे सतत भान बाळगा. इंटरनेट, मोबाईल गेमपेक्षा ते जास्त गरजेचे आहे.

**दादासाहेब येंधे**

---

# किरणोत्सव

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके-**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोस्तुते...**



महाराष्ट्रातील कोल्हापूर शहराच्या मधोमध असलेले महालक्ष्मी मंदिर हे देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मानले जाते. हे मंदिर भारतातील प्रमुख देवी मंदिरांपैकी एक असून अंबाबाई मंदिर म्हणूनही ओळखले जाते. या मंदिराचा इतिहास फार जुना आहे. येथे दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. ह्या मंदिराचा प्राचीन इतिहास आणि धार्मिक महत्त्व यामुळे हे मंदिर भाविकांसाठी आणि पर्यटकांसाठी विशेष आकर्षणाचे केंद्र आहे.

दरवर्षी निसर्गाचा एक अनोखा चमत्कार 'किरणोत्सव सोहळा' येथे पाहायला मिळतो.हा केवळ एक धार्मिक विधी नसून तो प्राचीन भारतीय ज्ञान आणि स्थापत्यकलेचा एक अद्भुत नमुना आहे. किरणोत्सव हा सोहळा उत्तरायणात ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी आणि दक्षिणायनात ९ ते ११ नोव्हेंबर या कालावधीत अनुभवता येतो. सूर्यकिरणे देवीच्या मूर्तीला स्पर्श करतात, ज्यामुळे एक अद्भुत दृश्य निर्माण होते. हा चमत्कार पाहण्यासाठी अनेक भाविक महालक्ष्मी मंदिराच्या सभामंडपात जमलेले असतात. किरणोत्सव या नावाने ओळखला जाणारा हा सोहळा निसर्गचा चमत्कार अंसुन ह्याला धार्मिकतेचेही महत्त्व लाभले आहे. येथे येणारे अभ्यासकही बांधकामशास्त्राचा हा अनोखा चमत्कार पाहण्यासाठी गर्दी करतात.

सूर्यास्ताचा प्रकाश नेहमीच महालक्ष्मीच्या मंदिरातील सभामंडपात पसरलेला असतो, असे असले तरीही महालक्ष्मीच्या मूर्तीवर थेट सूर्यकिरणे पडत नाहीत. ती केवळ या सहा दिवसांतच पडतात. सूर्यास्ताच्या वेळी सूर्याची किरणे पहिल्या दिवशी प्रथम देवीच्या चरणांवर पडतात. नंतर दुस-या दिवशी ती किरणे मूर्तीच्या मध्य भागाकडे सरकतात आणि शेवटच्या तिस-या दिवशी देवीच्या मुखमंडलावर सूर्यप्रकाश पडतो आणि उपस्थित भाविक महालक्ष्मीचा जयघोष करतात. या वेळी महालक्ष्मीची अलंकार पूजा बांधण्यात येते. किरणस्पर्श होत असताना देवीची आरती करण्यात येते.

सातव्या किंवा आठव्या शतकातील हेमाडपंती पद्धतीची बांधणी असलेले हे मंदिर म्हणजे वास्तुशास्त्राचा अनोखा आविष्कार म्हणावा लागेल. पृथ्वी फिरत असताना सूर्याची दिशा नेमकी कशी असेल याचा शास्त्रोक्त अभ्यास करून या मंदिराची बांधणी झालेली आहे. सूर्यकिरणे केवळ वर्षातून दोन वेळाच गाभा-यात प्रवेशतात. त्यांना अडथळा होऊ नये यासाठी गरुड मंडप, महादरवाजा बांधताना त्या काळी काळजी घेण्यात आल्याचे दिसते.हा केवळ एक उत्सव नसून, आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीचा, विज्ञाननिष्ठ स्थापत्यकलेचा आणि समृद्ध परंपरेचा एक जिवंत पुरावा आहे, म्हणूनच आपल्याला याचा अभिमान वाटायला हवा असा हा दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या कोल्हापूरच्या अंबाबाईचा किरणोत्सव एकदा तरी आवर्जून पाहण्यासारखा आहे.

**वर्षा आवदे**

---

# विद्यार्थी दिन : शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक परिवर्तनाचा प्रवास

७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिन.विद्यार्थी दिनसाजरा करण्यामागील मूलभूत उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये स्वतःबद्दलची जागरूकता, सामाजिक जबाबदारी, मूल्याधिष्ठित जीवनदृष्टी, आणि ज्ञानाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची प्रेरणा निर्माण करणे. शिक्षणाचा उद्देश केवळ नोकरी मिळविणे किंवा आर्थिक स्थैर्य प्राप्त करणे एवढाच मर्यादित नाही. शिक्षण व्यक्तीला विचारस्वातंत्र्य, विवेकबुद्धी, आत्मभान आणि सामाजिक न्यायासाठी लढण्याची ताकद प्रदान करते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्त्व आत्मसात केले आणि आपल्या संपूर्ण जीवनातून शिक्षण, संघटना आणि संघर्ष या तीन तत्त्वांवर समाजाला चलनवलन देणारी प्रेरणा दिली.

सध्याच्या काळात विद्यार्थ्यांपुढे अनेक आव्हाने आहेत. जागतिकीकरण, तंत्रज्ञानातील प्रगती, स्पर्धावृत्ती, बेरोजगारी, मानवी मूल्यांची घट आणि मानसिक आरोग्यावर वाढता ताण ही काही प्रमुख आव्हाने म्हणता येतील. परंतु, विद्यार्थी म्हणजेच परिवर्तनाची शक्ती असून तो परिस्थिती बदलविण्याची क्षमता बाळगून असतो. इतिहास साक्षीदार आहे की, सर्वात मोठ्या क्रांती, आंदोलनं आणि सामाजिक चळवळी विद्यार्थी वर्गाच्या सहभागामुळेच उभ्या राहिल्या आहेत. स्वातंत्र्यलढ्यात असो, आपत्ती व्यवस्थापनात असो किंवा समाज सुधार चळवळीत असो विद्यार्थ्यांनी नेहमीच पुढे राहून समाजाला योग्य दिशा दिली आहे.

या पार्श्वभूमीवर 'विद्यार्थी दिन' साजरा करणे म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांच्या ओळखीची, कर्तव्याची आणि सामर्थ्याची जाणीव करून देणे होय. विद्यार्थी हे सामाजिक परिवर्तनाचे वाहक आहेत.




त्यांच्यातील विचारांची उंची, दृष्टिकोनाची व्यापकता आणि मनोवृत्तीची सकारात्मकता समाजाला नवीन दिशादर्शन करू शकते. म्हणूनच शिक्षणसंस्था, कुटुंब, समाज आणि शासन या सर्व आघाड्यांवर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वातावरण निर्माण केले पाहिजे. शिक्षण हे मूल्याधिष्ठित, मानवतावादी आणि न्यायनिष्ठ बनले पाहिजे.

आपल्या देशात अजूनही अनेक मुले शिक्षणापासून वंचित आहेत. ग्रामीण भागात, आदिवासी समाजात, कुपोषण, गरीबी, मुलींच्या शिक्षणातील अडथळे, बालमजुरी, अपुरी शैक्षणिक साधने, आणि डिजिटल दरी ही शिक्षणापुढील गंभीर आव्हाने आहेत. या समस्यांच्या मुळाशी सामाजिक असमानता, विषमता आणि आर्थिक दुर्बलता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला समाजातील विषमता दूर करण्याचे सर्वात प्रभावी साधन मानले. म्हणूनच विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने आपण शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध, समान, गुणवत्तापूर्ण आणि मूल्याधिष्ठित करण्याची प्रतिज्ञा घेतली पाहिजे.

सध्याच्या काळात काही ठिकाणी शिक्षणाचे व्यापारीकरण होताना दिसते. ज्ञान हे विक्रीच्या वस्तूसारखे मांडण्याची प्रवृत्ती वाढताना जाणवते. अशा परिस्थितीत विद्यार्थी दिन आपल्याला शिक्षणातील मूल्यांची आठवण करून देतो. शिक्षण हे समाजातील प्रत्येक घटकाचे मूलभूत हक्क आहे. शिक्षणाचे उद्दिष्ट समाजाला नैतिक, संवेदनशील, सक्रिय आणि प्रगतिशील बनविणे हे आहे. ज्ञानाचा वापर स्वतःच्या प्रगतीसाठी तर करायचाच आहे, पण त्याचबरोबर समाजातील दुर्बल, शोषित आणि वंचित घटकांसाठी संवेदनशील होणे हेही विद्यार्थी असण्याचे आवश्यक मूल्य आहे.

शेवटी, विद्यार्थी दिन हा केवळ कार्यक्रम साजरा करण्याचा दिवस नाही. हा चेतनेचा दिवस आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळाप्रवेशापासून सुरू झालेली इतिहासाची वाटचाल आजही आपल्याला समानतेच्या, न्यायाच्या आणि ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जाते. आजही अनेकांना शिक्षणाचे दरवाजे पूर्णपणे उघडलेले नाहीत. त्यामुळे हा दिवस नवीन संकल्पांची प्रेरणा देतो. शिक्षण सर्वांसाठी, समान संधी सर्वांसाठी आणि सामाजिक न्याय हा शिक्षणाचा आधार आहे.

विद्यार्थी दिनाच्या या शुभप्रसंगी, प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या अंतरात्म्यातील जिज्ञासेला जागे करावे, सामाजिक प्रश्नांना समजून घ्यावे, संवेदनशील मन ठेवावे आणि आपले शिक्षण समाजाच्या भल्यासाठी वापरावे. आपण सर्वांनी मिळून असे समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावा की जिथे प्रत्येक बालक, प्रत्येक युवक आणि प्रत्येक विद्यार्थी हे सांगू शकतील की 'शिक्षण माझा अधिकार आहे, ज्ञान माझी शक्ती आहे आणि समाज परिवर्तन माझे ध्येय आहे.' याच सत्याची पुनःप्रचीती करून देणारा, ज्ञान, समता आणि प्रगतीचा दीप पेटवणारा ७ नोव्हेंबर हा 'विद्यार्थी दिन' सर्वांना प्रेरणादायी ठरो यासाठी सर्वाना हार्दिक शुभेच्छा.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

---

# भारतीय महिला क्रिकेट संघाची दमदार कामगिरी



भारतीय महिला क्रिकेट संघाने दक्षिण आफ्रिकेला पराजय करून संपूर्ण जगाला आपली दमदार कामगिरी दाखवून दिली आहे.भारतीय महिला क्रिकेट संघ २००५ व २०१७ मध्ये अंतिम फेरी गाठली होती. परंतु थोड्याशा अंतराने पराजय पत्करावा लागला.तरीही भारतीय संघाने धीर सोडला नाही व आपली आक्रमक आगेकूच सुरूच आणि अथक परिश्रमानंतर विजय पताका २ नोव्हेंबर २०२५ सात वेळा विश्वविजेता रहालेल्या ऑस्ट्रेलियाला उपांत्य फेरीत नमवून अंतिम लढतीत प्रवेश केला. दक्षिण आफ्रिकेला पराजय करून संपूर्ण जगभरात आनंदोत्सवाची विजय पताका दिसून आली.अंतिम सामन्यात अनेक उतार चढाव आपल्याला पहायला मिळाले अशा परिस्थितीत भारतीय महिलांनी आपली संपूर्ण ताकद झोकून टाकली.'अभी नही तो कभी नहीं' त्यामुळे प्रत्येक खेळाडूंनी आपापली सटीक भूमिका व योग्य भूमिका बजावली व कोसो दूर असलेला वर्ल्डकप आपल्या मुठ्ठीत घेतला.

भारतीय महिलांना जग जिंकायला तब्बल ४७ वर्षे लागली.स्पर्धेदरम्यान काही उतार चढाव सुध्दा पहायला मिळाले जेमिमा रॉड्रिग्जला खराब फॉर्ममुळे सुरूवातीच्या सामन्यामधून वगळण्यात आले.त्याच जेमिमाने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात १२७ धावांची नाबाद खेळी करून ऑस्ट्रेलिया संघाला चारोकोणे चीत करून अंतिम फेरीत पोहचवले. न्युझीलंड विरूध्दच्या करा किंवा मरा अशा कठीण प्रसंगी तिने ७६ धावांची महत्वपूर्ण खेळी केली. अशाप्रकारे जेमिमाने विश्वकप जिंकण्यास भरीव योगदान दिले. असाच उतार चढाव शेफाली वर्माच्या बाबतीत दिसून आला. शेफाली वर्माला खराब फॉर्ममुळे एकदिवसीय संघातून सलामीवीर शेफाली वर्माला एक वर्षापूर्वी वगळण्यात आले होते.तिची या विश्वचषक संघातही निवड करण्यात आली नव्हती.

२६ ऑक्टोबर रोजी भारताची नियमित सलामीवीर प्रतीका रावल बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात जखमी झाली होती. दुखापतीमुळे बदली खेळाडू म्हणून शेफालीचा संघात समावेश करण्यात आला होता.तिने अंतिम सामन्यात मोलाचे योगदान देऊन ८७ धावांची खेळी केली व विजयांची घोडदौड जवळ केली.त्यानंतर दोन महत्वपूर्ण विकेट्स सुध्दा घेतल्या आणि देशाला विश्वचषक जकिून दिला.या कामगिरी बद्दल तिला प्लेअर ऑफ द फायनलचा मानाचा पुरस्कार मिळाला. अशाप्रकारे शेफालीने संघर्षमय व जिद्दीची कामगिरी करून जग जिंकले.भारतीय संघाची स्टार ऑलराउंडर दीप्ती शर्माला २०२५ च्या महिला विश्वचषकात बॅट आणि बॉल दोन्हींमध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्लेअर ऑफ द सिरीज म्हणून गौरविण्यात आले.संपुर्ण महिला क्रिकेट संघाला सलाम.

**रमेश लांजेवार**
मो.नं.९९२१६९०७७९

---

# शिक्षकांना टीईटी परीक्षेची सक्ती का?

संपूर्ण देशात पहिली ते आठवीपर्यंतच्या वर्गाचे शिक्षक सध्या मानसिक तणावाचा सामना करत आहेत. यामागचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच टीईटी उत्तीर्ण करण्याचा दिलेला आदेश. टीईटीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय योग्य असू शकतो. सर्वोच्च न्यायालयाने नियम आणि कायद्याच्या अनुषंगाने निकाल दिला आहे. परंतु हा निर्णय व्यावहारिक आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. सर्वोच्च न्यायालयाने त्यांचा निर्णय दिला असला तरी देशाची संसद काय करत आहे. या मुद्दावर राजकीय नेत्यांनी मौन का बाळगले आहे. ज्या शिक्षकांनी वीस ते पंचवीस वर्षे सेवा केली आहे. म्हणजे ते आता पन्नास ते पंचावन्न वयोगटात असतील, त्यांच्यासाठी हा निर्णय घेणे व्यावहारिक आहे का?गेल्या काही काळापासून केंद्र सरकार आणि राज्य सरकार शिक्षकांवर विविध बाजूंनी दबाव टाकत आहेत. ज्ञानदान करण्याव्यतिरिक्त शिक्षकांकडून असंख्य अशैक्षणिक कामे करून घेतली जात आहेत. असे असतानाही शिक्षक कामे करत नसल्याचे सांगून त्यांच्या कार्यशैलीवरच प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात म्हटल्यानुसार पहिली ते आठवीपर्यंत अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण करणे गरजेचे आहे. ज्या शिक्षकांची सेवा पाच वर्षांपेक्षा अधिक राहिलेली आहे, त्यांना दोन वर्षांच्या आत टीईटी उत्तीर्ण करावी लागेल. जर या काळात टीईटी परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना नोकरीवर



पाणी सोडावे लागणार किंवा त्यांना सक्तीची सेवानिवृत्ती घ्यावी लागेल. आता सेवेच्या शेवटच्या टप्प्यात टीईटी उत्तीर्ण करण्याबाबतचा आदेश न्यायसंगत राहू शकतो का. या प्रकारचा अताकिर्क निर्णय शिक्षकांवर थोपवणे अन्यायकारक आहे. टीईटीसंबंधी हा निर्णय अनेकार्थांनेही तार्किक नाही. शाळेत मोठ्या संख्येने एमपीएड, बीपीएड, एमएड, बीएड, डीएड, बीटीसी म्हणजे बेसिक टर्निंग सर्टिफिकेट अभ्यासक्रम पूर्ण केलेले शिक्षक आहेत. अनेक शिक्षक अनुकंपा तत्वावर रुजू झालेले असतात आणि तेही नियमांच्या चौकटीतच. शिक्षकांची नोकरी वाचविण्यासाठी आणि त्यांना मानसिक ताणापासून मुक्तता देण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारने याबाबत गंभीरपणे योग्य पाऊल उचलण्याची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**
मो.९४२०५६६४०४

# संघी ट्रोलर्सना अटक न केल्यास ठोकून काढू
## वंचित युवा आघाडीचा इशारा



■ प्रतिनिधी | अकोला ■

***वंचित बहुजन युवा आघाडी, अकोला जिल्हा व महानगर यांच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोशल मीडियावर वंचित नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकर आणि युवा नेते सुजात आंबेडकर यांच्यावर ट्रोल करणाऱ्या संघी ट्रोलर्सच्या अटकेच्या मागणीसाठी भव्य धरणे आंदोलन करण्यात आले.***

या आंदोलनात वंचित युवा आघाडी आक्रमक होत, प्रशासनाला पाच तास घाम फोडला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील तिन्ही रस्ते बंद करावे लागले होते. आंदोलनकर्त्यांनी ठणकावून सांगितले की, 'पोलीस प्रशासनाने जर ट्रोलर्सना अटक केली नाही, तर आम्ही आमच्या स्टाईलने त्यांना ठोकून काढू.' तसेच निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडायची असल्यास संबंधित ट्रोलर्सना तत्काळ अटक करावी, अन्यथा पुढील आंदोलन अघोषित असेल, असा इशाराही देण्यात आला. आंदोलनाच्या ठिकाणी लावण्यात आलेल्या फलकांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार झळकत होते. विशेषतः 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे विषारी झाड (इद्‌ग्‌दहदले्ऊा) आहे' हा संदेश असलेले फलक लोकांचे लक्ष वेधून घेत होते.

या वेळी युवा आघाडी प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे, जिल्हाध्यक्ष श्रीकांत घोगरे, जिल्हा महासचिव राजकुमार दामोदर, महानगर अध्यक्ष वैभव खडसे, वंचित जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा आम्रपाली खंडारे, भारिप जिल्हाध्यक्ष प्रदीप वानखडे, महासचिव मिलिंद इंगळे, पूर्व महानगर महासचिव मनोहर बनसोड, पश्चिम महानगर अध्यक्ष कलीम खान पठाण, महासचिव गजानन गवई, महिला अध्यक्ष वंदनाताई वासनिक, तसेच सचिन शिराळे, जय तायडे, नागेश उमाळे, आशिष रायबोले, सुगत डोंगरे, जिया शहा, अक्षय राऊत, सम्राट तायडे, मिलिंद दामोदर, सचिन जंजाळ, साहिल बोदडे, संगीता अढाऊ, अनघा ठाकरे, अमन गवई, मनोहर पंजवानी, सुरज दामोदर, दादाराव पवार, भारत निकोशे, आकाश गवई, मंतोषताई मोहोड, मंगलाताई शिरसाठ, मीना बावणे, पायल कांबळे, नंदिनी ढोले, निर्भय पोहरे, वसंत मानवटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडी, वंचित बहुजन युवा आघाडी, वंचित बहुजन महिला आघाडी, आणि सम्यक विद्यार्थी आंदोलन या सर्व विंगचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अकोल्यात वंचित बहुजन आघाडीच्या या आंदोलनामुळे जिल्हा प्रशासनात खळबळ उडाली असून पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'सरदार @150' : जिल्ह्यात २ ठिकाणी पदयात्रांचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'सरदार१५०' उपक्रम राबविण्यात येत असून, जिल्ह्यात दोन ठिकाणी एकता पदयात्रांचे आयोजन करण्यातआले आहे.षजिल्ह्यात जिल्हास्तरीय युनिटी मार्च दि. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वा. अकोला येथे, तसेच दि. १२ नोव्हेंबर रोजी स. ८.३० वा. मूर्तिजापूर येथे काढण्यात येईल. सर्व नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

उपक्रमात पदयात्रांबरोबरच रक्तदान शिबिर, व्यसनमुक्ती मार्गदर्शन, निबंध स्पर्धा, पथनाट्य, वादविवाद स्पर्धा, स्वच्छता मोहिम, आरोग्य शिबिरे आदी विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. अकोला येथे दि. ११ नोव्हेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत वसंत देसाई क्रीडांगणापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत भव्य पदयात्रेचे आयोजन केले जाईल. पदयात्रेदरम्यान आत्मनिर्भर भारताची प्रतिज्ञा, सांस्कृतिक कार्यक्रम व प्रदर्शनांचे आयोजनही करण्यात येणार आहे.

# सरसकट पीक नुकसानीच्या याद्या बनविल्या दलालांनी!



**पातूर तालुक्यातील शेकडो शेतकरी लाभाच्या प्रतीक्षेत**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

**याद्या तयार करण्यास विलंब : शेतकरी प्रतीक्षेत! :** शेतकऱ्यांकडून आधार कार्ड, बँक पासबुक, सर्वे नंबर यांसारखी माहिती घेऊन याद्या तयार करण्याची जबाबदारी संबंधित तलाठ्यांवर होती. मात्र अनेक ठिकाणी त्यांनी दलालांच्या माध्यमातून याद्या तयार केल्याने अनेक शेतकऱ्यांना लाभ मिळण्यात विलंब होत आहे. त्यामुळे पातूर तालुक्यातील शेतकरी संभ्रमात असून, त्यांना शासनाचा लाभ कधी मिळणार याची प्रतीक्षा आहे.

सरसकट पीक नुकसानीचा लाभ शेतकऱ्यांना तातडीने मिळावा, या हेतूने शासनाकडून संबंधित अधिकाऱ्यांना सक्तीचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार शेतकऱ्यांकडून आधारकार्ड, बँक पासबुक, सर्वे नंबर आदी माहिती गोळा करून याद्या तहसील कार्यालयात सादर करण्याच्या सूचना तहसीलदारांकडून सर्व तलाठ्यांना देण्यात आल्या होत्या.

मात्र पातूर तालुक्यातील अनेक गावांतील तलाठी गावात फिरकलेच नाहीत. त्यांनी गावातील काही हाताखालील दलालांमार्फत पीक नुकसानीच्या याद्या तयार केल्या, असा गंभीर आरोप समोर आला आहे. परिणामी अनेक शेतकऱ्यांची नावे या याद्यांमधून वगळली गेली असून, शेकडो शेतकरी सरसकट पीक नुकसानीच्या लाभाच्या प्रतीक्षेत आहेत.

शेतकऱ्यांकडून पहिल्या टप्प्यातच तातडीने मदत मिळविण्यासाठी काही दलालांनी आर्थिक व्यवहार केल्याची माहिती समोर येत आहे. ज्या शेतकऱ्यांनी पैसे देण्यास नकार दिला, त्या शेतकऱ्यांची नावे 'तुरटी'मध्ये टाकण्यात आली. त्यामुळे त्या शेतकऱ्यांना हेतूपरस्पर लाभ देण्यास विलंब करण्यात आला, असा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे.

या प्रकारामुळे शेतकरी वर्गामध्ये प्रचंड संताप असून, संबंधित तलाठी आणि दलाल यांच्यावर चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

**तलाठ्यांच्या हेकेखोरपणामुळे शेतकरी अडचणीत! :** आधीच आसमानी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. शासनाकडून मिळणाऱ्या तुटपुंज्या मदतीची अपेक्षा असतानाच, तलाठ्यांच्या हेकेखोरपणामुळे शेकडो शेतकरी लाभापासून वंचित राहिले आहेत. सरसकट पीक नुकसानीचा लाभ तातडीने मिळेल, अशी अपेक्षा होती; परंतु तलाठ्यांच्या निष्काळजी पणामुळे हा लाभ मिळण्यात मोठा विलंब होत आहे.

## एक थेंब अधिक पीक योजनेसाठी अर्ज मागविले

**अकोला :** राष्ट्रीय कृषी विकास योजना एक थेंब अधिक पीक योजनेत अनुसूचित जाती व अनु. जमाती प्रवर्गासाठी जिल्ह्याचा लक्ष्यांक २ कोटी २१ लक्ष रू. आहे. अनु. जाती व अनु. जमाती प्रवर्गातील शेतक-यांनी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.

अधिकाधिक अर्ज प्राप्त करून घेण्यासाठी कृषी विभागातर्फे गावपातळीवर मोहिम हाती घेण्यात आली असून, शिबिरांचेही आयोजन करण्यात आले आहे.ष्अनुसूचित जातीसाठी २ कोटी व अनु. जमातीसाठी २१ लाख असा एकूण २ कोटी २१ लक्ष रू. लक्ष्यांक आहे. या प्रवर्गातील अल्प व अत्यल्प भूधारक लाभार्थ्यांना अनुक्रमे २५ टक्के आणि इतर शेतक-यांना ३० टक्के पूरक अनुदान मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून देण्यात येईल. उर्वरित १० टक्के व १५ टक्के अनुदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषीक्रांती योजनेतून अदा करून ९० टक्के अनुदान देण्यात येणार आहे.

## वारुळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला गटविकास अधिकाऱ्यांची आकस्मिक भेट



■ प्रतिनिधी | अकोट ■

तालुक्यातील संत नगरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या वारुळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला अकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी अलीकडेच आकस्मिक भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी शाळेतील स्वच्छता, शिस्त आणि एकंदर वातावरण पाहून समाधान व्यक्त केले.

गेल्या वीस दिवसांत शाळेचा पूर्ण चेहरामोहरा बदलून टाकणाऱ्या मुख्याध्यापक अरुण फुलारी यांच्या कामगिरीचे गटविकास अधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले. शाळेचे सौंदर्यीकरण, परिसरातील स्वच्छता, विद्यार्थ्यांसाठी आकर्षक शैक्षणिक वातावरण निर्माण करणे, तसेच शाळेतील विविध उपक्रम यामुळे ही शाळा आदर्श ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.मुख्याध्यापक अरुण फुलारी यांनी अल्पावधीत केलेल्या प्रयत्नांमुळे शाळेचे रूपांतर झाल्याचे गटविकास अधिकाऱ्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दर महिन्याला वाढदिवस साजरा करण्याची नवी परंपरा सुरू करून शाळेला एक आपुलकीचे वातावरण देण्यात आले आहे.

या भेटीदरम्यान शाळेतील विद्यार्थी प्रभास वानखडे याचा वाढदिवस साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शिक्षकवर्गाने या उपक्रमांचे कौतुक केले असून, शाळेत एक अतिरिक्त शिक्षक नेमण्यात यावा अशी मागणी गटविकास अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

## जिल्ह्यातील वाळूघाट लिलावाचे सुधारित वेळापत्रक ऑनलाईन स्वीकृतीची मुदत १४ नोव्हेंबरपर्यंत

**अकोला :** जिल्ह्यातील १५ वाळू घाट लिलाव यापूर्वीच जाहीर करण्यात आला आहे. ई-लिलावाच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला असून, शुद्धीपत्रक निर्मगित करण्यात आले आहे. जास्तीत जास्त लिलावधारकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

ई- निविदा ऑनलाईन स्वीकारण्याची मुदत दि. ६ नोव्हेंबर रोजी दु. २ पर्यंत होती. ती आता दि. १४ नोव्हेंबर रोजी दु. २ पर्यंत वाढविण्यात आली आहे. ई-निविदा (तांत्रिक लिफाफा) उघडणे, तत्पूर्वीची तांत्रिक पडताळणी आदी प्रक्रिया सुधारित वेळापत्रकानुसार दि. १७ नोव्हेंबर रोजी करण्यात येईल. ई- लिलाव प्रक्रिया (ई-ऑक्शन) दि. २० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा. पासून दु. १ वा. पर्यंत पूर्ण करण्यात येईल. अधिकाधिक लिलावधारकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सुधारित वेळापत्रक शासनाच्या महाटेंडर्स, तसेच जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**एकूण १५ वाळूघाट :** अकोला तालुक्यातील कपिलेश्वर, वडद खु., एकलारा. कट्यार, म्हैसांग हे पूर्णेवरील ५ घाट, तसेच उगवा येथील मोर्णेवरील घाटाचा समावेश आहे. अकोट तालुक्यात केळीवेळी व पिलकवाडी येथील पूर्णेवरील घाटांचा समावेश आहे. बाळापूर तालुक्यात निंबी, बहादूरा, सागद, लोहारा-१. डोंगरगाव या मन नदीवरील, तसेच नागद या पूर्णेवरील आणि मांजरी येथील कांचनपूर्णेच्या घाटाचा समावेश आहे.

## अकोल्याच्या यशची इस्त्रो अभ्यास दौऱ्याकरिता निवड



**अकोला :** स्थानिक प्रभात किड्स मध्ये इयत्ता नववी मध्ये शिकणारा यश महाजन नोबल सायन्स टॅलेंट सर्च परीक्षेच्या गुणवत्ता यादीत आला.त्याची एनएसटीएस तर्फे इस्त्रोच्या अभ्यास दौऱ्याकरिता निवड झाली आहे.येत्या जानेवारी २०२६ मध्ये त्याचा इस्त्रो अभ्यास दौरा असून त्यासोबतच आयआयटी गांधीनगर येथे सुद्धा फिल्ड व्हिजिटला जायची त्याला संधी प्राप्त होणार आहे. तिथे त्याला मार्गदर्शकांचे गेस्ट लेक्चर अटेंड करण्याची संधी सुद्धा मिळणार आहे. त्याशिवाय त्यानी अत्यंत कठीण अशी गणित प्रज्ञा परीक्षेत सुद्धा सिल्वर मेडल प्राप्त केलेले आहे.एमटीएस परीक्षेत सुद्धा त्याला स्पेशल प्राईस प्राप्त झाले आहे. बीजेपीएल स्पर्धेत सुद्धा त्याने बुद्धिबळ खेळात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. त्याच्या या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.यशने आपल्या यशाचे श्रेय नोबेल फाउंडेशनचे संचालक जयदीप पाटील ,सुनील मुधोळकर, शाळेतील शिक्षक वृंद आणि आई - वडील यांना दिले.त्याच्या या यशाबद्दल डॉ. सुयोग जोहरापूरकर,रितेश देवलसी,उन्नती नगरनाईक, मंगल बाठे, ॲड. सुमित डोणगावकर आदींनी अभिनंदन केले आहे.

## हिवरखेड नगरपरिषदेची धुरा दादाराव डोल्हारकर कडे



**हिवरखेड :** राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका मुक्त निःपक्षपातीपणे आणि पारदर्शकपणे पार पाडण्याकरिता तसेच निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व निःपक्षपाती अधिकारी/ कर्मचारी यांच्याद्वारे हाताळण्याकरिता आणि त्यासाठी प्रतिबंधात्मक व इतर उपाययोजना करण्याचे राज्य निवडणूक आयोगाने शासनास निर्देशित केले आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने तात्पुरत्या स्वरुपात नियुक्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये राज्यातील तेरा मुख्याधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून दादाराव डोल्हारकरयांची मुख्याधिकारी हिवरखेड नगरपरिषद, जि. अकोला. या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणूकांच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याची निकड विचारात घेऊन १३ अधिकाऱ्यांची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात आली आहे. सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम संपुष्टात आल्यानंतर आदेशातील क्र.१ ते ९ या अधिकाऱ्यांनी मुळ पदावर तात्काळ रुजू व्हावे असे आदेश देण्यात आले असून . तसेच हिवरखेडचे नवीन मुख्याधिकारी डोल्हारकार सह एकूण ४ अधिकाऱ्यांचे स्वतंत्रपणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील असे शासनाच्या आदेशात नमूद आहे.

## मनपा सार्वत्रिक निवडणूक – २०२५ च्या अनुषंगाने आरक्षण सोडत कार्यक्रम ११ नोव्हेंबर २०२५ रोजी

**अकोला :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक – २०२५ च्या अनुषंगाने निश्चित करण्यात आलेल्या आराक्षित जागा बाबत अनुसुचित जाती, जमाती, नागरिकांचा मागास वर्ग, प्रवर्ग तसेच सर्व साधारण जागामधील महिला करिता आरक्षण निश्चित करणे संदर्भात मा.राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तसेच मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या मान्यतेनुसार मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी नवीन बस स्थानक समोरील डॉ.प्रमिलाताई ओक हॉल येथे सकाळी ११.०० वा. आरक्षण सोडत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी संबंधीतांनी याची नोंद घेऊन अकोला महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९४९/२०२५ — प्रोसेस नं.१७६४७/२०२५
चौ.ता. ०४/१२/२०२५ — दिनांक : १८/१०/२०२५

**अर्जदार :** १. गोपाल विश्वनाथ शिंदे २. शंकर विश्वनाथ शिंदे १ व २ रा. सावरकर चौक, रेणुका नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. लक्ष्मी विजय गलवाडे लग्नाआधीचे नाव लक्ष्मी विश्वनाथ शिंदे रा. संताजी नगर, येदलाबाद, मुक्ताई नगर, ता. मुक्ताई नगर, जि. जळगांव

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. विश्वनाथ किसनराव शिंदे २. निर्मला विश्वनाथ शिंदे
**पत्ता :-** दोघेही रा. सावरकर चौक, रेणुका नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २. अन्वये या न्यायालयांत वारस प्रमाणपत्र मिळण्यांसाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विश्वनाथ किसनराव शिंदे यांचे दि. १९/०३/२०२५ रोजी राहते घरी रेणुका नगर, अकोला ता.: जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत निर्मला विश्वनाथ शिंदे यांचे दि. ०७/ ११/ २०२१ रोजी राहते घरी येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३६९/२०२५ — प्रोसेस नं.१२४२३/२०२५
चौ.ता. ०३/१२/२०२५ — दिनांक : २८/०७/२०२५

**अर्जदार :** १. वसंत वामनराव देशमुख २. श्रुती वसंतराव देशमुख ३. तेजस्विनी वसंतराव ठाकरे तिघेही रा. परिवार कॉलनी नं. ४, केशव नगर, खडकी, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला सध्याचा पत्ता - व्दारा वाय. डब्ल्यू. देशमुख एम/ २० व्ही. एच. बी. कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजश्री वसंतराव देशमुख
**पत्ता :-** रा. परिवार कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. व्दारा वाय. डब्ल्यू देशमुख एम/ २० व्ही. एच. बी. कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजश्री वसंतराव देशमुख यांचे दि. ०७/०१/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक, ०३/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०७/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**चौकशीची जाहिर नोटीस**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

नेमता तारिख :- २७/११/२०२५ — जा.क्र. ३१५२/२०२५ दि. २८/१०/२०२५
चौकशी क्रमांक :- १७/२०२५ कलम 50A(1) कलम 50A(1) नुसार जाहिर नोटिस

**मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम 50A(I) अन्वये**

**अर्जदार :-** १. श्री. सुधाकर नथ्थुजी घुगरे रा. रेल ता. अकोट जि. अकोला. २. श्री. गोपाल सुखदेवराव इंगळे रा.रेल ता. अकोट जि. अकोला.

सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यांत येते की, श्री. रेलेश्वर संस्थान ट्रस्ट रेल, ता. अकोट, जि. अकोला. ओ-३३ या न्यासाचा कारभार व्यवस्थित व योग्य रितीने चालावा या दृष्टीने अर्जदार यांनी वरील अर्ज या कार्यालयात केला आहे.

**स्थावर मालमत्ता -:** शेतीपासुन सरासरी वार्षिक उत्पन्न रूपये ५००००/ मिळते.

२) हयाअर्थि या नोटिसीने जाहिर करण्यांत येते की, सदरहु न्यासाचे हितसंबंध असणाऱ्या ज्या लोकांना सदर न्सासाचे योजनेविषयी काही निवेदन/ हरकत करावयाची असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० (तीस) दिवसाच्या आंत तशा प्रकारचे लेखी निवेदन / हरकत योजनेच्या मसुद्यावरील चौकशी क्रमांक देऊन मुंबई सार्वजनिक विश्वस्थ अधिनियम १९५० चे कलम ७३ (अ) नुसार दहा रुपयांचा कोर्ट फी लावून अर्ज धर्मादाय उप आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे दाखल करावा, तसे न केल्यास सदरहु बाबतीत कोणासही काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन कार्यवही एकतर्फी चालवुन निकाल देण्यात येईल. ही नोटीस आज दिनांक २८ / १० / २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त, अकोला यांच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३३६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# राजकीय भेटीगाठींना वेग, गावागावात निवडणुकीचे वेध



***अकोट : दिवाळीचा सण संपून दहा-बारा दिवस उलटले असले, तरीही गावागावांत शुभेच्छा देण्याचा आणि घेण्याचा उत्साह ओसरलेला नाही. मात्र, या शुभेच्छा भेटींच्या आड आता राजकीय रंग चढताना दिसत आहे.***

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही महिन्यांवर येऊन ठेपल्याने प्रत्येक गावात राजकीय समीकरणांची चुरस वाढू लागली आहे. गावातील गल्लीपासून ते चौकापर्यंत सध्या चर्चेचा एकच विषय — कोण उमेदवारी घेणार, कोण कुणाच्या गटात राहणार आणि सत्ता कोणाच्या हाती येणार?

दिवाळीच्या निमित्ताने सुरू झालेल्या शुभेच्छा भेटी, फराळाचे कार्यक्रम आणि सामाजिक मेळावे हे आता राजकीय तयारीचे व्यासपीठ बनले आहेत. विद्यमान सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक आणि नव्याने इच्छुक असलेले उमेदवार यांच्या हालचालींना वेग आला आहे.

गावागावात चहा-नाश्त्याच्या कार्यक्रमांतून जनसंपर्क सुरू असून, मतदारांच्या घरपोच भेटी, कौटुंबिक निमित्तांना हजेरी, तसेच सामाजिक कार्यक्रमात सक्रिय सहभाग याद्वारे नेतेमंडळी 'आपुलकीचा' स्नेहबंध मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहेत.

दरम्यान, सत्ताधारी व विरोधक या दोन्ही गटांकडून आगामी निवडणुकांसाठी रणनीती आखण्याचे काम सुरू झाले आहे. युवक व महिला मंडळांच्या माध्यमातून आपापले बालेकिल्ले मजबूत करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

सणाचा साज ओसरत असताना, आता गावाकडे नव्या राजकीय सणाची चाहूल लागली आहे. शुभेच्छांच्या निमित्ताने सुरू झालेली लोकसंपर्क मोहीम हीच आगामी निवडणुकीच्या रणसंग्रामाची पूर्वपीठिका ठरत आहे.

सोशल मीडियावरही राजकीय हालचालींना वेग आला आहे. शुभेच्छा संदेशांच्या माध्यमातून विविध गट आपली उपस्थिती आणि कार्यक्षमता दाखविण्याचा प्रयत्न करत आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समिती यांची मुदत पूर्ण होऊन बराच काळ उलटला असल्याने निवडणूक आयोगाकडून तारखा जाहीर होण्याची उत्सुकता वाढली आहे.

पुढील महिन्यात निवडणुका होण्याची शक्यता असल्याने कधीही आचारसंहिता लागू होईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे. त्यामुळे उमेदवार आपली ताकद आजमावत असून, कुणी विकासाच्या नावाखाली जनतेपर्यंत पोहोचत आहे, तर कुणी सामाजिक बांधिलकी व वैयक्तिक संपर्कावर भर देत आहे.एकूणच, दिवाळीनंतरचे वातावरण पूर्णपणे राजकीय झाले असून, गावागावात निवडणुकीचे वेध लागले आहेत. प्रत्येक नागरिक आता आपल्या आवडत्या उमेदवाराच्या बाजूने मत ठरवण्याच्या विचारात आहे.

# खड्डयांमध्ये गाडला कानगाव-कापसी मार्ग

## बांधकाम विभाग झोपेत, नागरिक संतप्त; जीव धोक्यात घालून प्रवास

**मोझरी (शेकापूर)/जनमाध्यम**

विकासाच्या गप्पा मारणाऱ्यांचा चेहरा आता कानगाव ते कापसी मार्गावरच्या खड्डयांत स्पष्ट दिसतोय, या रस्त्यावर खड्डयांचे इतके साम्राज्य आहे की रस्ताच ओळखू येत नाही. वाहनधारकांचे हाल अक्षरशः अतोनात झाले असून, एखाद्या दिवशी मोठा अपघात घडल्या शिवाय विभाग जागा होणार नाही, अशीच लोकांमध्ये चर्चा सुरू आहे.



रास्ता दुरुस्तीच्या नावाखाली कोट्यवधींचा खर्च झाला, पण परिणाम शून्य. वर्धा ते राळेगाव ह्या महत्त्वाच्या मार्गावर कानगाव-कापसी दरम्यानचा पट्टा अक्षरशः विद्रूप अवस्थेत आहे. रस्त्यावरील खड्डयांनी प्रवाशांचे आणि वाहनांचे दोघांचेही कंबरडे मोडले आहे. वाहनधारकांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.नागरिकांचा आरोप आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याची केलेली दुरुस्ती म्हणजे फक्त कागदोपत्री दिखावा. ठेकेदार आणि अधिकाऱ्यांची निष्क्रियता यात स्पष्टपणे दिसून येते. हा मार्ग वर्धा आणि यवतमाळ या दोन जिल्ह्यांना जोडणारा असल्याने वाहतूकही मोठ्या प्रमाणावर आहे. अशा मार्गाची या अवस्थेत दुर्दशा ठेवणे म्हणजे प्रशासनाच्या कामकाजावरचा खुला प्रश्नचिन्ह आहे.कामगार नेते आणि माजी आमदार जयप्रकाश छाजेड, तसेच एसटी वर्कर्स काँग्रेसचे प्रदेश सहसंघटक सचिव व गाडेगावचे माजी सरपंच शालिकराव ताकसांडे यांनी या रस्त्याच्या तातडीने डागडुजीची मागणी केली आहे. रस्त्यांच्या नावाखाली लुबाडणूक चालू आहे;

लोकांच्या पैशांचा खेळखंडोबा थांबला पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिली.लोकांचा संयम आता संपत चालला आहे. रस्त्याची डागडुजी त्वरित झाली नाही, तर लोकच या खड्डयातून आंदोलन काढतील, अशी इशारादायक भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे.

# सिंदी येथे स्काऊट-गाईडचे दोन दिवसीय निवासी शिबीर

## राष्ट्रीय जांबोरी आणि राज्यपाल पुरस्काराच्या पूर्वतयारीसाठी विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**

येथील माऊली टाउन परिसरात स्काऊट-गाईड युनिटतर्फे राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पुरस्कार परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी दोन दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले.



लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे २३ ते २९ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या १९ व्या राष्ट्रीय जांबोरी तसेच राज्यपाल पुरस्कार २०२५-२६ या दोन्ही स्पर्धांची तयारी साधण्यासाठी हे शिबीर घेण्यात आले. त्यात जि.प. उच्च प्राथमिक शाळा आजनगाव, केसरीमल विद्यालय सिंदी (रे.), आणि जि.प. उच्च प्राथमिक शाळा जामठा येथील ४५ स्काऊट-गाईड विद्यार्थी व सहा युनिट लीडर सहभागी झाले.शिबिरात स्काऊट मास्टर सुनील अटेल यांनी स्काऊट-गाईड प्रार्थना, झेंडा गीत, नियम-वचन, राज्यपाल पुरस्कार परीक्षा तयारी तसेच प्राविण्य पदकांसाठी आवश्यक लेखी व प्रात्यक्षिक अभ्यासक्रमांची माहिती दिली. गाईड कॅप्टन जयश्री थूल यांनी ध्वजारोहण, गाठीचे प्रकार, प्रथमोपचार, स्ट्रेचर बनविण्याच्या पद्धती तसेच होकायंत्राच्या वापराचे प्रशिक्षण दिले. स्काऊट मास्टर गजेंद्र गिरडकर यांनी योग, सूर्यनमस्कार आणि बीपी सिक्स या प्रात्यक्षिकांचा सराव करविला.अनिलकुमार नासरे यांनी लॉर्ड बेडन पावेल यांच्या जीवनकार्यावर आधारित मार्गदर्शन केले, तर मिनल देवरणकर यांनी तंबू सजावट, निरीक्षण आणि बिना भांड्याच्या स्वयंपाकाचे प्रात्यक्षिक सादर केले. शिबिरादरम्यान वृक्षारोपण उपक्रम पार पडला. विद्यार्थ्यांनी सहा तंबू, दहा गॅझेट व सहा प्रकारचे स्ट्रेचर बनवून आपली कौशल्ये प्रदर्शित केली. शेवटच्या दिवशी शेकोटी कार्यक्रमात सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी मनोरंजन आणि एकतेचा संदेश दिला.या शिबिरास मीना कोलते, वंदना पिंपळे, रामदास कोलते, गाईड कॅप्टन पुष्पा नंदनवार आदी मान्यवरांनी भेट देत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन हर्ष अटेल यांनी तर आभार खुर्शी अटेल यांनी मानले. दोन दिवसीय शिबिर यशस्वी होण्यासाठी अटेल परिवाराने विशेष परिश्रम घेतले.

# तब्बल ३४ वर्षांनी वर्गमित्र आणि गुरुवर्य एकत्र

## जुन्या आठवणींत हरवले विद्यार्थी; शाळेच्या गेटवर पुन्हा



**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**

म्यु. नेहरू विद्यालयातील १९९१-९२ च्या बॅचमधील विद्यार्थी आणि गुरुवर्य तब्बल ३४ वर्षांनी पुन्हा शाळेच्या आवारात एकत्र आले. जुन्या ओळखी, गप्पा आणि आठवणींनी शाळेचा परिसर पुन्हा रंगला.या स्नेहमिलनाचा पुढाकार त्या बॅचमधील माधुरी निनावे यांनी घेतला होता. विदर्भातील विविध शहरांत कार्यरत असलेले ४७ माजी विद्यार्थी शाळेत जमले. माजी प्राचार्य सु. वि. खेडकर, मुकुंद तोटे, भिकुलाल पालीवाल आदी शिक्षकांसह विद्यमान प्राचार्य अर्चना इखार अध्यक्षस्थानी होत्या.कार्यक्रमाची सुरुवात शारदा देवीच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. नंतर विद्यार्थ्यांनी परिचय देताना शाळेतील दिवस आठवले. खेडकर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या यशासाठी घेतलेले कठोर निर्णय आणि त्या मागील शिक्षकधर्म स्पष्ट केला.विद्यार्थ्यांनी गुरुवर्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करत शिक्षकांनी घातलेली संस्कारांची बीजे आजही फलद्रूप आहेत, अशी भावना व्यक्त केली.या कार्यक्रमाच्या यशासाठी चंद्रकांत घोडमारे, शैलेश वडांद्रे, योगीता बेलखोडे, रंजना तडस, रवींद्र ढोबळे, विनोद अतकर, हेमंत पाटील आणि नरेंद्र वरठी यांनी परिश्रम घेतले. समारोपप्रसंगी उपस्थितांनी शाळेच्या आवारात अकरा वृक्षांची लागवड करून हरित संदेश दिला.

# धम्मभूमी केळझर येथे मोफत आरोग्य शिबीर

## ८० रुग्णांची तपासणी; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सेलू/जनमाध्यम**

कार्तिक पौर्णिमा उत्सव व वर्षावास समापन सोहळ्यानिमित्त धम्मभूमी, केळझर येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. सद्गुरू बहुउद्देशीय संस्था आणि कै. झिबलजी घवघवे वृद्धाश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर पार पडले.



या उपक्रमाचे मार्गदर्शन नैसर्गिक चिकित्सक डॉ. धनश्री वैद्य यांनी केले.या शिबिरात परिसरातील तब्बल ८० रुग्णांनी आरोग्य तपासणी करून घेतली. निसर्गोपचार, फिजिओथेरपी, सुजोग, प्रेशरपॉइंट आणि पंचकर्म थेरपीचे महत्त्व डॉ. वैद्य यांनी समजावून सांगितले. नाडी परीक्षणाद्वारे विविध आजारांवर मोफत उपचार करण्यात आले.शिबिरात वातरोग, लकवा, सायटीका, कमरेचा व पाठदुखी, सांधेदुखी, सुजन, मूळव्याध, केसगळती, स्त्रीरोग, वंध्यत्व, डोळ्यांचे विकार यांसारख्या आजारांवर नैसर्गिक चिकित्सा पद्धतींचा सल्ला देण्यात आला. कार्यक्रमाला कार्तिक पौर्णिमा उत्सव समिती तसेच कर्तव्यदक्ष ठाणेदार मनोज गभणे यांची उपस्थिती लाभली.

या निमित्ताने नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभागी होऊन शिबिराचा लाभ घेतला.शिबिराच्या यशस्वीतेसाठी करुणा बहुउद्देशीय विकास संस्थेच्या अध्यक्षा करुणा दाभणे, रेखा डुकरे, भावना दांडेकर, प्रफुल वानखेडे, माधुरी सेवेकर व दास नायर आदींनी सहकार्य केले.

# चोरीच्या बेतातील दोघांना बेड्या

**वर्धा -** चोरीच्या बेतात अंधारात लपून बसलेल्या दोघांना सेवाग्राम पोलिसांनी संभाजीनगर आलोडी परिसरात एका घराजवळ मिळून आले. गौरव संजय जबडे रा. इंदिरानगर आणि शैलेश विलास नेहारे रा. आर्वी नाका अशी आरोपींची नावे आहे. पोलिस गस्तीवर असताना दोन्ही आरोपी हे तोंडाला रुमाल बांधून आपले अस्तित्व लपवून एका घराबाहेर बसलेले दिसून आले. पोलिसांनी गस्तीदरम्यान त्यांना ताब्यात घेत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. अखेर पोलिसांनी ताब्यात घेत त्यांच्याविरुद्ध गन्हा दाखल

# चाकूच्या धाकावर दहशत पसरविणाऱ्या दोघांना अटक

**हिंगणघाट -** चाकूच्या धाकावर नागरिकांमध्ये दहशत पसरविणाऱ्या दोघांना पोलिसांनी तुकडोजी चौकातील उड्डाणपूल परिसरातून अटक केली. राजू उर्फ कुलवंतसिंग बलवंतसिंग रा. उत्तराखंड आणि त्रिकलोकसिंग उर्फ कपील दोघे तिरथसिंग हे संशयीतरीत्या उड्डाणपुलाखाली फिरताना मिळून आले. पोलिसांनी त्यांची तपासणी केली असता त्यांच्याकडे टोकदार चाकू आढळून आला. त्यांच्याकडून मोबाइलसह चाकू असा एकूण ५ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलिसांकडून केला जात आहे.

# मुलांच्या वादातून एकास मारहाण

**मोझरी (शेकापूर) -** दोन मुलांमध्ये झालेल्या वादाच्या कारणातून एकास मारहाण करुन जखमी केले. ही घटना तामसवाडा येथे घडली. याप्रकरणी सेलू पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.प्राप्त माहितीनुसार, दोन मुलांमध्ये वाद झाला. त्यानंतर विचारणा केली असता सचिन गोडघाटे यांना मारहाण करुन जखमी केले. याप्रकरणी चंद्रशेखर ढोके सह अन्य एकावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सेलू पोलिस करीत आहे.

# पवनूरचा सुनेची स्वप्नपूर्ती

## भाग्यश्री पेटकर यांची कामगिरी

**वर्धा/जनमाध्यम**

अथक परिश्रम आणि जिद्दीचा जोरावर भाग्यश्री पेटकर गिरी यांनी अखेर महाराष्ट्र राज्य लोक सेवा आयोगा अंतर्गत होणाऱ्या विक्रीकर निरीक्षक ची अंतिम परीक्षा देऊन नेत्रदीपक यश मिळवले आहे. तालुक्यातील पवनूर येथील भाग्यश्री यांनी आपले शिक्षण राष्ट्रांसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथून केले आहे. ती महाराष्ट्रातून महाराष्ट्र राज्य लोक सेवा आयोगा मार्फत होणाऱ्या परीक्षेतून ती २२ वी आली आहे. तिची घरची हलाकीची परिस्थिती अतिशय बिकट असून तिने आपल्या मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.ती आंजी मोठी येथील रहिवासी असून तिचा नुकताच विवाह पवनूर येथील मनीष गिरी यांच्या सोबत झाला आहे. भाग्यश्रीया यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# वातावरणामुळे आजारांमध्ये वाढ

**साहूर/जनमाध्यम**

मागील दहा ते बारा दिवसापासून परिसरात अवकाळी पाऊस व ढगाळ वातावरण टिकून असल्यामुळे ताप, सर्दी, खोकला, घशाचे विकार आदी आजार वाढले आहेत. हिवाळ्याचा ऋतू सुरु झाला तरीही अनिश्चित वातावरणामुळे लहान मुलं व वृद्धांवर या आजारांचा तात्काळ परिणाम होत आहे. या विळख्यामुळे संसर्ग जन्य व्हायरल इन्फेक्शन्सचा धोका वाढल्याने डॉक्टरांनी नागरिकांना काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे.कार्तिक महिन्यातील अचानक बदलत्या हवामानामुळे पावसाळा हिवाळा आणि थंडी यामध्ये सतत बदल होतो. यामुळे शरीर जुळवून घेण्यासाठी वेळ घेत आहे. विशेषतः भाविक महिलांमध्ये सकाळ लवकर उठल्याने थंडी-ताप अशी तक्रार वाढली आहे. डासांचा वाढता प्रमाण देखील आजारांना घडवणूक देत आहे.वैद्यकीय तज्ञांनी सर्दी-खोकला असताना तज्ञांचा सल्ला घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. घरगुती

# पक्षांसोबत निसर्गाची मैत्री

## पक्षी सप्ताहानिमित्त निसर्गसाथी फोरमचे विविध उपक्रम

**हिंगणघाट/जनमाध्यम**

'निसर्ग प्रेमींसाठी आनंदात्सव' ठरणारा पक्षीसप्ताह यंदाही हिंगणघाटात रंगणार आहे. निसर्गसाथी फोरमतर्फे ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर दरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांपासून ते पक्षी निरीक्षकांपर्यंत सर्वांसाठी शिकण्याची आणि अनुभव घेण्याची मेजवानी या आठवड्यात मिळणार आहे.




या दरम्यान पक्षीनिरीक्षण मोहीम, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, निबंध व वादविवाद स्पर्धा तसेच पक्ष्यांच्या अधिवासाविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शन अशा कार्यक्रमांची सांगता केली गेली आहे. वना नदी, शिरूड धरण, लाल नाला प्रकल्प, पोथरा धरण या ठिकाणी विद्यार्थी आणि नागरिकांसाठी प्रत्यक्ष पक्षीनिरीक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.बहार नेचर फाउंडेशन वर्ध्याचे राहुल वकारे आणि दर्शन दुधाने हे तज्ज्ञ पक्ष्यांविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिके आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील. समारोप समारंभात विजेत्यांचा सत्कार होईल.पक्षी आणि निसर्ग यांविषयी प्रेम जागवण्यासाठी सर्वांनी या पक्षी सप्ताहात सहभागी व्हावे, असे आवाहन निसर्गसाथी फोरमचे अध्यक्ष डॉ. बालाजी राजूरकर तसेच कार्यकारिणी सदस्य राजश्री विरुळकर, प्रभाकर कोळसे, नियाज सिद्धिकी, यशवंत गडवार, मनोज गायधने, गुणवंत ठाकरे, वासुदेव पडवे, संगीता मस्कर आणि राकेश झाडे यांनी केले आहे.

# दारूविक्री प्रकरणी दोघांना अटक

**वर्धा -** नागसेननगर परिसरात अवैध दारूविक्री करणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक पोलिसांनी अटक केली. किशोर परसराम कुहिकर आणि शिवम कुहिकर असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार नागसेननगर भागात छापा टाकण्यात आला. यावेळी आरोपींकडे दारूचा मोठा साठा आढळला. पोलिसांनी १ लाख ५८ हजार रुपयांचा दारूसाठा जप्त केला असून आरोपींच्याविरुद्ध संबंधित कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निधन वार्ता

## देवका शिंदे



**हिंगणघाट -** शहरातील रिठे कॉलनी निवासी देवका चिंधुजी शिंदे यांचे वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. त्यांचेवर बर्फा (ता समुद्रपूर) येथे अंत्यसंस्कार करण्यात आला आहे.त्यांच्या पश्चात तीन मुले ,स्नुषा व नातवंडे असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

## सोनामाता राऊत



**मोझरी ( शेकापूर) -** येथील सोनामाता राऊत यांचे गुरुवारी (ता.६) सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ७१ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्या सोनामाय म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध होत्या.

# गाय हीच अर्थव्यवस्थेची खरी कणा - अॅड लुणकरण टावरी

## स्वं.हरीश टावरी यांच्या पुण्यस्मरणार्थ गोशाळेत भक्तिभावाने छप्पन भोग

**वर्धा/जनमाध्यम**

भारतीय संस्कृतीचा आत्मा गायींमध्ये आहे. या गोमातेच्या सेवेतूनच कृषीप्रधान देशाचा पाया भक्कम राहतो, असे विचार अॅड, लुणकरण टावरी यांनी व्यक्त केले. स्व. हरीश टावरी यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त टावरी कुटुंबातर्फे गोरक्षण येथील गोशाळेत गायींना छप्पन भोग अर्पण करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

भगवान श्रीकृष्णाला छप्पन भोग अर्पण करण्याची परंपरा लक्षात घेऊन, या वेळी भगवंता ऐवजी त्यांच्या सर्वाधिक प्रिय असलेल्या गायींना हा भोग वाहण्यात आला. गोशाळेत साखर, ढेप, सरकी, हिरव्या भाज्या आणि मिठाईंचा समावेश असलेले ५६ प्रकारचे भोग ठेवले गेले. चारा आणि पाण्याची व्यवस्था करून गायमातेची विशेष पूजा करण्यात आली. पंडित कुलदीप शुक्ला यांनी सुंदरकांडाचे सुमधुर संगीतमय पठण सादर केले. संपूर्ण वातावरण जय श्रीरामच्या घोषणांनी दुमदुमले अॅड लुणकरण टावरी म्हणाले, गाय, गंगा, गीता आणि गायत्री या आपल्या संस्कृतीच्या चार कोनशिला आहेत. गोपालन आणि गोसेवा हे केवळ धार्मिक कार्य नसून स्वावलंबनाचा मार्ग आहेत. गाय कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. माहेश्वरी मंडळ वर्धाचे माजी सचिव प्रकाश भुतडा यांनी गोरक्षण आणि गोसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. मंडळाचे समन्वयक राजकुमार जाजू यांनी स्व. हरीश टावरी यांच्या परोपकारपूर्ण आयुष्याची आठवण करून सांगितले, ते नेहमी पडद्यामागे राहून समाजसेवा करीत. अनेकांना त्यांनी निनावी मदतीने उभे केले. कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन डॉ. ईशा टावरी यांनी केले. स्वागत डॉ. श्याम टावरी आणि



हर्षा हरीश टावरी यांच्या हस्ते झाले, तर आभार अभियंता विक्रम हरीश टावरी यांनी मानले. या कार्यक्रमात माहेश्वरी महिला मंडळाचे विशेष योगदान होते.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक - ३३८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल- atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस तसेच बॅंक,शासकीय तसेच निमशासकीय कार्यालय यांना या जाहीर नोटिसव्दारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार **अनुप अनंत जयस्वाल**, रा.कु-हा ता.तिवसा, जिल्हा अमरावती, मो.नंबर ९८६०९३०७४२/९९२३३७२६६४ यांनी या दिलेल्या माहिती व अधिकारावरुन ही जाहीर नोटीस प्रसिध्द करतो ते येणेप्रमाणे -

माझे पक्षकार नामे **अनुप अनंत जयस्वाल,** यांनी **हरिभाऊ दयाराम नाईक** यांच्या सोबत शेती खरेदीचा व्यवहार करण्याचे ठरले असून, त्यांच्या ताब्यातील व मालकीतील मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व अमरावती जि.प.च्या हददीतील ग्रामपंचायत असलेले मौजे घोटा, ता.तिवसा, जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं. १०६ एकूण क्षेत्रफळ १ हे ०० आर भोगवटदार वर्ग १ आहे. या शेत जमिनीची चतुःसीमा खालील प्रमाणे -

पुर्वेस - रोड
पश्चिमेस - सदाशिव महिगे यांचे शेत
उत्तरेस - श्रीधर चव्हाण यांचे शेत
दक्षिणेस - गावंडे यांचे शेत

वरील वर्णनाची शेत मालमत्ता माझे पक्षकार **अनुप अनंत जयस्वाल** यांनी **हरिभाऊ दयाराम नाईक** यांच्या सोबत इसारपावती केली आहे व दि.१०/११/२०२५ रोजी खरेदी खत नोंदविणार आहे.

तरी सर्व जनतेस व तसेच बॅंक, शासकीय तसेच निमशासकीय कार्यालय यांना या जाहीर नोटीसव्दारे सूचित करण्यात येते की, वरील उल्लेखित शेत मालमत्तेवर कोणाचाही हक्क, बोजा, गहाण असेल तर त्यांनी दिनांक ०९/११/२०२५ पर्यत वरील पत्त्या वर संपर्क करुन पोच घ्यावी, खरेदी नंतर कोणाचाही उजेर/आक्षेप चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरी/-**
**ॲड. चंद्रकांत अनिल उमक**
**मो.-९४२२६६४७५७**
**दिनांक- ०५/११/२०२५**

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६४९/२०२५ ने.ता.१८.१२.२०२५

**अर्जदार :**
१. मोहम्मद अजहर शेख सफदर, वय ६४ धंदा - मजुरी
रा.प्लॉट नं.५०-अ, छिंदवाडा रोड, पी.जी.गौर निवास मागे, नवीन मानकापूर, नागपूर
२. नजमुन्निसा सैयद सज्याद जहीर, वय ६३ धंदा - घरकाम
रा.युनिक इंग्लिश शाळेजवळ, पारेकर कॉलनी, वलगाव रोड, अमरावती
३. कमरुन्निसा रहमतउल्लाह खान, वय ६० धंदा - घरकाम
रा.ओल्ड कामठी रोड, निअर मुस्लिम झेंडा, राजीव गांधी नगर, डॉ.आंबेडकर मार्ग, नागपूर

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत शेख सफदर शे.मन्नू** यांचा मृत्यू दिनांक **१३.०४.२००८** रोजी खेल चौधर, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मयत जाहेदा बी शेख सफदर** ही दिनांक **०१.०६.२०१८** रोजी खेल चौधर, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. त्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.६४९/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०६.११.२०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४९६/२०२५
**श्रीमती कुसूम अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१२.१२.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kusum Arunrao Sune, Age 56 Yrs. Occu.: Housewife
2. Suraj Arunrao Sune, Age 34 Yrs. Occu.: Labour
3. Akash Arunrao Sune, Age 31 Yrs. Occu.: Labour
All R/o Baripura, Old Town, Badnera, Tq.Dist. Amravati.
4. Priti Sachin Behare, Age 35 Yrs. Occu.: Household
R/o Gandhi Chowk, Morshi, Tq. Morshi, Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अरुण तुकारामजी सुने** हे दिनांक 09.07.2024 रोजी **चिंचवड, जि.पुणे** येथे मयत झाले. अर्जदार **कुसूम अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कुसूम अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२४४५/२०२५
**शेख -वि- निरंक**
पुढील ता.२२.१२.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. शेख अकील हाजी शेख खलिल, वय ४५ वर्षे, व्यवसाय - नोकरी
२. शेख शकिल हाजी शेख खलिल, वय ४६ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. शमीम बानो शेख खलील, वय ५० वर्षे, व्यवसाय - निरंक
४. नसिम बी नसिर खान, वय ४५ वर्षे, व्यवसाय - निरंक
रा.जमील कॉलनी, अमरावती
५. नसरीन बानो मोहम्मद नावेद, वय ४५ वर्षे, व्यवसाय - निरंक
रा.कुरेशी नगर, बडनेरा, जि.अमरावती
६. शेख जमील हाजी शेख खलील, वय ३८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.छाया नगर, अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत शेहजादी बानो हाजी शेख** यांचे दिनांक **०४.०१.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार शेख अकील हाजी शेख खलील व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शेख अकील हाजी शेख खलील व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**३०.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ६१**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# लिडरशीप डेव्हलपमेंट कार्यशाळा व नवीन अध्यक्ष-सचिव निवड प्रक्रिया संपन्न

## महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असो.अमरावती तर्फे आयोजन

अमरावती/प्रतिनिधीः-

महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन अमरावती द्वारा मंगळवार दि. ४ नोव्हेंबर २०२५रोजी दुपारी २.३०वाजता हॉटेल वंदु इंटरनॅशनल, राजापेठ अमरावती येथे नॅशनल ट्रेनर(एफ.डी.पी.)व प्राईम कोच डॉ.धिरज चितलांगे यांचे लिडरशीप डेव्हलोपमेंट या विषयावर कार्यशाळेचे आयोजन वर्ष २०२५च्या तृतीय कार्यकारणी सभे मध्ये सर्व पूर्वाध्यक्ष फोरम तर्फे करण्यात आले होते.

व्यासपीठावर संघटनेचे २०२५चे अध्यक्ष डॉ. अशोक उमप,कार्यशाळेचे ट्रेनर तसेच संघटनेचे पूर्वाध्यक्ष धिरज चितलांगे, पूर्वाध्यक्ष फोरम अध्यक्ष डॉ. सुरेंद्र काळबांडे, आय.पी.पि.डॉ राजीव रोडे, सचिव डॉ. विपुल भट्टड, लेडीविंग चेअरपर्सन डॉ. पल्लवी चौधरी यांची उपस्थिती लाभली.

सर्वप्रथम होमिओपॅथी चे जनक डॉ. सॅम्युअल हॅनिमन यांच्या प्रतिमेला हार अर्पण व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. सुरवातीला अध्यक्ष डॉ. उमप यांनी विषय सूची सभागृहाला वाचून दाखवली नंतर संघटनेचे प्रसिद्धी प्रमुख डॉ. संदीप बुटे यांनी १५ऑगस्ट स्वातंत्र्य दिन सोहळा व शंकरबाबा आश्रम पिंपळखुटा येथील आरोग्य



शिबीराचा अहवाल सादर केला. त्यानंतर आय.पि.पी. डॉ. राजीव रोडे यांनी सभागृहाची मंजुरी घेऊन २०२६ या वर्षासाठी अध्यक्ष व सचिव यांची निवड केली. त्याप्रमाणे संघटनेच्या २०२६या वर्षासाठी अध्यक्ष म्हणून डॉ. स्वाती पडोळे तर सचिवपदी डॉ. नंदकिशोर भूतडा यांची निवड करण्यात आली व त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूर्वाध्यक्ष फोरम सचिव डॉ.सुरेश देवतळे यांनी केले.

यानंतर संघटनेचे पूर्वाध्यक्ष फोरम अध्यक्ष डॉ. सुरेंद्र काळबांडे यांनी कार्यशाळेचे प्रशिक्षक व संघटनेचे पूर्वाध्यक्ष डॉ. धिरज चितलांगे यांना कार्यशाळा घेण्याकरिता आमंत्रित केले.डॉ. चितलांगे यांनी 'लीडरशीप डेव्हलोपमेंट ईन टीम 'या विषयावर अतिशय उत्कृष्ट व प्रभावशाली मार्गदर्शन केले सोबतच त्यांनी सभागृह कसे चालवावे यासाठी सभापतित्व व संसदीय प्रणाली या विषयावर प्रकाश टाकला तसेच अश्या अनेक विषयावर वेगवेगळ्या उदाहरनासहित मनोरंजनात्मक व विस्तृत मार्गदर्शन कार्यशाळेत केले. या कार्यशाळेला प्रशिक्षनार्थी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेकरिता डॉ. धिरज चितलांगे यांचा संघटनेच्या वतीने शाल,श्रीफळ व गौरवचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. संघटनेचे सचिव डॉ.विपुल भट्टड यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला संघटनेचे सर्व पूर्वाध्यक्ष,पदाधिकारी,कार्यकारणी सदस्य, लेडीविंग मोठ्या संख्येने उपस्थित होते,असे संघटनेचे प्रसिद्धी प्रमुख डॉ. संदीप बुटे यांनी कळविले.

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.६६३/२०२५ ने.ता. / /२०२५

**अर्जदार :**
१. रईसा सुलताना अब्दुल रहेमान, वय ५३ धंदा - घरकाम
रा.वार्ड नं.३, नवाब पुरा, खेल महल (करजगांव) ता.चांदूर बाजार, जि.अम.
२. अथर परवेज अब्दुल रहेमान, वय ३९ धंदा - मजुरी
रा.वार्ड नं.३, भट्टीपुरा, खेल महल (करजगांव) ता.चांदूर बाजार, जि.अम.
३. अजहर परवेज अब्दुल रहेमान, वय ३६ वर्षे, धंदा - मजुरी
रा.वार्ड नं.३, सौदागर पुरा, खेल चौधर (करजगांव) ता.चांदूर बाजार, जि.अम.
४. अनजर परवेज अब्दुल रहेमान, वय ३५ वर्षे, धंदा - मजुरी
रा.वार्ड नं.३ सौदागर पुरा, खेल चौधर (करजगांव) ता.चांदूर बाजार, जि.अम.
५. अहेमर परवीज अब्दुल रहेमान, वय ३२ वर्षे, धंदा - शेती
वार्ड नं.२, मस्जिद पुरा, खेल चौधर (करजगांव) ता.चांदूर बाजार, जि.अम.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत अब्दुल रहेमान गुलाम नबी** यांचा मृत्यू दिनांक **०९.०९.२०२५** रोजी खेल चौधर, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. त्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.६६३/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.

आज दि. **.११.२०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

प्रो.नं.४१०९/२०२५
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.३१.१०.२०२५

वि.२ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
आर.एम.जे.सी. अर्ज क्र./३७४/२०२५ दिनांक ११.११.२०२५

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. वत्सला उध्दवराव लोडम, वय ७२ वर्षे, धंदा - घरकाम
२. प्रफुल्ल उध्दवराव लोडम, वय ५१ वर्षे, धंदा - मजुरी
अ.क.१ व २ रा.रुस्तमपूर, पो.रामतीर्थ, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. नम्रता पुरुषोत्तम गावंडे, वय ४९ वर्षे, धंदा - घरकाम
रा.फ्लॅट नं.२०१, साई हेरिटेज साईनगर, गजानन महाराज मंदिर,अमरावती
४. कविता केशव भटकर, वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.फ्लॅट नं.६०२, विंग-ए, होरीझोन हाईटस्, कठोरा रोड, पोटे पाटील
जवळ, व्ही.एम.व्ही., अमरावती, ता.जि.अमरावती
५. सुचिता अश्विन शेंडे, वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पो.निंबोळी शेंडे, ता.आर्वी, जि.वर्धा

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **उध्दवराव मोतीराम लोडम** हे दिनांक **०१.०२.२०२५** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**३१.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२५०३/२०२५
**ताराबाई -वि- निरंक**
पुढील ता.१६.१२.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. ताराबाई केशव गवई, वय ७७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. शामकुमार केशवराव गवई, वय ४० वर्षे, व्यवसाय - मजुरी
दोघेही रा.उमरपूर, नेर ठाकरे किराणा शॉप, निरुळ गंगामाई ता.भातकुली, जि.अमरावती
३. उषा दिपक वानखडे, वय ४४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.तायडे किराणा शॉप, जय सियाराम नगर, विमवि, अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत केशवराव बावरुजी गवई** यांचे दिनांक **२७.१०.२०२३** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार ताराबाई केशव गवई व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ताराबाई केशव गवई व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०५.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## अमरावती महानगरपालिका, अमरावती
## कार्यकारी अभियंता-१ विभाग

**जा.क्र. अमनपा/बां.वि./का.अ.१/नि.सु.क्र. /३२/२०२५**
**दिनांक ०४.११.२०२५**

मा.आयुक्त यांचे वतीने **सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना-सन २०२५-२६** (नागरी दलितेत्तर वस्त्यांमध्ये सुधार कार्यक्रम) अन्वये अमरावती महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत खालील कामासाठी **ब-१** निविदा करारावरील अमरावती महानगरपालिकेत योग्य श्रेणीत नोंदणी करण्यात आलेल्या कंत्राटदारांकडून ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा ऑनलाईन मागविण्यात येत आहे.
**(एकुण १ ते ४२ कामे)**

ई-निविदा प्रसिध्दीचा तपशील

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दि.०४/११/२०२५ |
| ई-निविदा दस्तऐवज डाऊनलोड प्रारंभ (Start) | दि.०४/११/२०२५ सायं.६.०० वाजेपासून |
| ई-निविदा दस्तऐवज डाऊनलोड समाप्त (End) | दि.१३/११/२०२५ दु.४.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | दि.०४/११/२०२५ सायं.६.०० वाजेपासून |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि.१३/११/२०२५ दु.४.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक (Technical) | दि.१४/११/२०२५ सायं.०४.०० वाजता (शक्य झाल्यास) |
| (Financial) ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळ Mail व SMS द्वारे कळविण्यात येईल. | |

**स्वाक्षरी/-**
**कार्यकारी अभियंता-१**
**महानगरपालिका, अमरावती**

**स्वाक्षरी/-**
**उपायुक्त-२**
**महानगरपालिका, अमरावती**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**श्री.ए.बी.कट्टे दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - २४६४/२०२५**
**विनोद विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ०४.१२.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
१. **विनोद शंकरराव कावलकर**,वय ५८ वर्ष, व्यवसाय-नोकरी
रा.प्रोफेसर कॉलनी, नवी नस्ती बडनेरा, ता.जि.अमरावती
२. **शाम शंकरराव कावलकर**,वय ५४ वर्ष, व्यवसाय- मजुरी
रा.यवतमाळ रोड, दत्त मंदिर जवळ, बडनेरा, ता.जि.अमरावती

-- विरुध्द -

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत शंकरराव केशवराव कावलकर व सुशिला शंकरराव कावलकर** हे अनुक्रमे **दि.०३/०८/२०१६ व २६.०२.२०२३ रोजी अमरावती, येथे मयत झाले. अर्जदार विनोद शंकरराव कावलकर व इतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विनोद शंकरराव कावलकर व इतर** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ३०.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी चांदूर रेल्वे यांचे कार्यालय**

**क्रमांक/म.स./जन्म-मृत्यू नोंद/कावि-३०७७/२०२५** **दिनांक-०३/११/२०२५**

**जाहीरनामा**

**अर्जदार -** **श्री.सुधाकर आकाराम हरणे,**
**रा.टेंभुणी,ता.चांदूर रेल्वे, जि. अमरावती**

**- विरुध्द -**

**गैरअर्जदार -** **निबंधक जन्म - मृत्यू नोंदणी**
**तथा सचिव,ग्रामपंचायत कार्यालय, टेभुर्णी**

याव्दारे गावातील सर्वत्र लोकांना जाहीरपणे सुचित करण्यात येते की, निबंधक तथा सचिव ग्रामपंचायत कार्यालय, टेंभुर्णी, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांनी अर्जदार सुधाकर आकाराम हरणे,रा.टेंभुर्णी, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांचा जन्म टेंभुर्णी, ता.चांदूर रेल्वे, येथे दिनांक ०१/०७/१९६५ रोजी झाल्याची खात्री पटल्याने व अनावधाने जन्माची नोंद करण्यात आलेली नसल्यामुळे जन्माची नोंद निबंधक तथा सचिव,ग्रामपंचायत कार्यालय, टेंभुर्णी येथे करण्याकरिता आदेश मिळण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त झाला आहे.

सदर जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणत्याही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आंत आपला आक्षेप लेखी स्वरुपामध्ये या कार्यालयामध्ये दाखल करावा. मुदतीनंतर प्राप्त आक्षेप हरकती ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०३/११/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाचे शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी चांदूर रेल्वे**

# मुख्याधिकारी, नगर परिषद, अचलपूर, जि. अमरावती

## सूचना

जा.क्र. ५९४४ **दिनांक ०४/११/२०२५**

ज्याअर्थी अचलपूर नगर परिषदेने (यापुढे **उक्त नियोजन प्राधिकरण** असे निर्देशिलेले), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे **उक्त क्षेत्र** असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे **उक्त अधिनियम** असे निर्देशिलेले), चे कलम २१(२) चे अनुषंगाने कलम २३(१) व ३८ मधील तरतुदीनुसार प्रारुप विकास योजना (यापुढे **उक्त योजना** असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र.१५, दि.२१.०७.२०२३, त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभागीय पुरवणी भाग-१-अ (असाधारण) दि.१४.०८.२०२३ मध्ये प्रसिध्द केली आहे.

नगर परिषद/आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरुन अचलपूर नगर परिषदेने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, शाखा अमरावती यांची नगररचना अधिकारी म्हणून आदेश क्र.२९६८/२०२३, दि.२५.०८.२०२३ अन्वये नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, नगर रचनाकार, शाखा यांनी, उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारुप विकास योजना तयार करुन ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करण्यासाठी हस्तांतरीत केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यासाठी प्रशासकीय ठराव क्र.०१, दि.०३.११.२०२५ रोजी पारित केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारुप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

१. मुख्याधिकारी, अचलपूर, नगर परिषद अचलपूर
२. सहायक संचालक, नगर रचना, शाखा अमरावती, अमरावती

उक्त प्रारुप योजनेतील तरतुदींसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगर परिषद, अचलपूर यांचेकडे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत नगर परिषदेकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशिलाच्या प्रती योग्य शुल्क आकारुन नगर परिषद कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

**ठिकाण - अचलपूर**
**दिनांक - ०४/११/२०२५**

**स्वाक्षरी/-**
**मुख्याधिकारी,**
**(धीरजकुमार वि.गोहाड)**
**अचलपूर नगर परिषद.**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# १२ महानगरपालिका क्षेत्रात ४३९ मतदान केंद्रे प्रस्तावित

## जिल्ह्यातील ३.५ लाख मतदार २७८ सदस्य निवडतील

**अमरावती/का.प्र.**

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणुका जाहीर केल्या. यासह, अमरावती जिल्ह्यातील १० महानगरपालिका आणि २ नगर परिषदांमध्ये निवडणूक प्रचार सुरू झाला आहे आणि जिल्ह्यातील १२ स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी निवडणूक प्रचार सुरू झाला आहे. २७८ सदस्य आणि १२ महापौरांसाठी ३५८,८६८ मतदार मतदान करतील. यासाठी जिल्ह्यातील १२ महानगरपालिका क्षेत्रात ४३९ मतदान केंद्रे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानुसार, महानगरपालिका आणि नगर परिषदांसाठी मतदान २ डिसेंबर रोजी होणार आहे. अंतिम निकाल स्पष्ट झाल्यानंतर मतमोजणी दुसऱ्या दिवशी, ३ डिसेंबर रोजी होईल. जिल्ह्यातील १० महानगरपालिका आणि दोन नगरपरिषदांमध्ये निवडणुकांना सुरुवात झाली आहे. अचलपूर, अंजनगाव सुर्जी, वरुड, दर्यापूर, मोर्शी, शेंदुरजना घाट, चिखलदरा, चांदूर रेल्वे, चांदूर बाजार आणि धामणगाव रेल्वे महानगरपालिका तसेच धारणी आणि नांदगाव खंडेश्वर महानगरपालिका या ठिकाणी निवडणुकीची रणधुमाळी लक्षणीयरीत्या तीव्र झाली आहे. हे लक्षात घ्यावे की गेल्या साडेतीन वर्षांपासून नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुका प्रलंबित आहेत, ज्यामुळे या सर्व स्वायत्त संस्थांच्या निवडणूक निकालांची घोषणा होण्याची उत्सुकता निर्माण झाली आहे. आता, राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक वेळापत्रक जाहीर केल्याने, ३ डिसेंबरनंतर सर्व महानगरपालिका आणि नगरपरिषदांमधील प्रशासकीय राजवट संपुष्टात येईल आणि या संस्थांचे व्यवस्थापन निवडून आलेले महापौर आणि सदस्य करतील. परिणामी, निवडणूक लढवण्यास आणि जिंकण्यास इच्छुक असलेल्यांनी त्यांचे प्रयत्न तीव्र केले आहेत. त्याच वेळी, नागरी निवडणुकांबद्दल सामान्य नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता आहे.



लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच होणाऱ्या नगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणुका केवळ राजकीय पक्षांचीच नव्हे तर नेत्यांचीही प्रतिष्ठा पणाला लावतील. सध्या जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांपैकी सात मतदारसंघांमध्ये भाजप आणि महायुतीचे आमदार आहेत. अमरावती आणि वर्धा लोकसभा मतदारसंघ सध्या काँग्रेसकडे आहेत. त्यामुळे, या दोन्ही आघाडींपैकी कोणता मतदारसंघ महानगरपालिकेच्या निवडणुकीत विजयी होईल याबद्दल मोठी उत्सुकता आहे. तथापि, राजकीय पक्ष महायुती आणि महाविकास आघाडी म्हणून एकत्र सहभागी होतील की स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतील याबद्दलही उत्सुकता आहे. आतापर्यंत कोणत्याही मोठ्या राजकीय पक्षाने त्यांच्या मित्रपक्षांसोबत युती करण्याचा आपला हेतू जाहीर केलेला नाही. याव्यतिरिक्त, सर्व राजकीय पक्ष, त्यांच्या संबंधित कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन, स्वतंत्रपणे निवडणुका लढवण्याबद्दल आणि निवडणूक निकालानंतर, त्यांच्या संख्यात्मक ताकदीच्या आधारे नगरपालिका संस्थांमध्ये सत्ता मिळविण्यासाठी घटक पक्षांशी युती करण्याबद्दल बोलत आहेत.

# जिल्ह्यात तंबाखूमुक्ती मोहिमेला यश



## तब्बल ५,७०० नागरिकांनी सोडले तंबाखूचे व्यसन

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात गेल्या आठ वर्षांपासून राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाला (एनटीसीपी) मोठे यश मिळाले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ५,७०० हून अधिक लोकांनी तंबाखूचे व्यसन सोडले, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय समितीमार्फत हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. तंबाखूच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती साठी आतापर्यंत ८४६ शाळांमधील १ लाख ४८ हजार ५५८ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विविध जनजागृती स्पर्धांचे आयोजन करून युवकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्यात आली आहे.तंबाखू सोडण्यास इच्छुकांसाठी जिल्हा रुग्णाल यासह तालुका पातळीवर १४ समुपदेशन केंद्रे कार्यरत असून, २०१७ पासून ९० हजार ३२८ लोकांना समुपदेशन सेवा देण्यात आल्या आहेत. तंबाखूविरोधी कायद्याची अंमलबजावणीही काटेकोरपणे करण्यात येत आहे. कोटपा कायदा २००३ अंतर्गत २०१७ पासून सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणाऱ्या ३,६६४ जणांवर दंडात्मक कारवाई करून ५ लाख ८४ हजार ४१६ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.दरम्यान, अन्न व औषध विभागाने २०१८ पासून २१२ कारवाया करत ५ कोटी ५१ लाख रुपयांहून अधिक किमतीचा अवैध तंबाखूचा साठा जप्त केला आहे.या मोहिमेच्या यशात आरोग्य, पोलीस, शिक्षण व अन्न व औषध विभागाच्या समन्वयाचा मोठा वाटा असून, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा तंबाखूमुक्त करण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे.तंबाखू व धूम्रपानामुळे कर्करोग, फुफ्फुसा चे आजार आणि श्वसनाचे विकार वाढतात.

त्यामुळे नागरिकांनी तंबाखू सेवन टाळावे आणि आवश्यक असल्यास समुपदेशन केंद्रांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# नगर परिषदेची आदर्श आचारसंहिता लागू होताच हटविले राजकीय फलक

**अचलपूर/वार्ताहर**

संपूर्ण महाराष्ट्रात नगर परिषदेची आदर्श आचारसंहिता लागू होताच अचलपूर-परतवाडा या जुळ्या शहरातील राजकीय पक्षांसह संघटना तसेच व्यापारी जाहिरातीचे फ्लेक्स, होर्डिंग्ज नगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत हटविण्याचे काम सुरू झाले आहे.अचलपूर-परतवाडा शहरातून जाणाऱ्या प्रमुख मार्गावरील तसेच जुळ्या शहरातील प्रमुख रस्त्यांच्या कडेला खाजगी व्यापाऱ्यांकडून तसेच राजकीय व्यक्तींकडून जाहिरातीचे होर्डिंग्ज लावण्यात आले होते.

नगर परिषदेकडून ते काढून टाकण्याचे काम सुरू झाले आहे. अचलपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांच्या मार्गदर्शनाखाली अचलपूर बांधकाम विभागाचे अधिकारी मनीष शर्मा, परवाना विभागाचे आशिष किटुकले, सलीम अहमद, अनीस अहमद यांच्यासह चमूने शहरातील देवडी, चावलमंडी, गांधी पूल, सराफा लाईन, दर्गा चौक, तहसील



चौक, रेल्वे स्टेशन चौक, मेहराबपुरा, गांधीपूल, सवईपुरा, जीवनपुरा, विलायतपुरा, माळवेशपुरा, चांदूर बाजार नाका, अचलपूर नाका, विदर्भ मिल, जयस्तंभ चौक, अचलपूर बस डेपो, दुरानी चौक, गुजरी बाजार, अंजनगाव स्टॉप, चिखलदरा स्टॉप, बैतूल रोड, पोलिस स्टेशन या भागातील मोठ्या संख्येने बॅनर, राजकीय होर्डिंग्ज, धार्मिक झेंडे काढण्यात आले.

## शिक्षक पदांसाठी होणार समुपदेशन

**अमरावती** - जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत पेसा क्षेत्रातील शिक्षक पदांवरील रिक्त जागा भरण्यासाठी समुपदेशन प्रक्रिया ७ नोव्हेंबर रोजी आयोजित केली आहे.ही प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडणार असून, पेसा क्षेत्रातील अनुसूचित जमातीचे उमेदवार, पेसा क्षेत्रातील इतर प्रवर्गातील तसेच सर्वसाधारण क्षेत्रातील पात्र उमेदवारांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यामध्ये १८३ पात्र उमेदवार या समुपदेशन प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. पात्र उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर https://zpamr avati.gov.in प्रसिद्ध केली आहे. उमेदवारांनी आपले नाव व क्रमांक तपासून निश्चित वेळेत उपस्थित राहावे, असेही आवाहन शिक्षणाधिकारी सतीश मुगल यांनी केले आहे. उमेदवार गैरहजर राहिल्यास प्रशासनाकडून एकतर्फी निर्णय घेण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. समुपदेशनानंतर निवड झालेल्या उमेदवारांनी स्टॅप पेपरवर करारनामा सादर करणे आवश्यक आहे.

# अंतरराष्ट्रीय पातळीवर पोदार स्कूलचा गौरव

## अर्शित भुजाडे प्रथम क्रमांकाने सरस

**अमरावती/का.प्र.**

पोदार इंटरनॅशनल स्कूल, अमरावती येथील इयत्ता आठवी (व्हीनस) वर्गातील विद्यार्थी अर्शित भुजाडे यांनी थायलंड येथे आयोजित 'यूनेस्को कल्चरल ओलंपियाड २०२५' या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत वाद्य विभागात प्रथम क्रमांक मिळवून भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. या स्पर्धेत १६२ आंतरराष्ट्रीय स्पर्धकांमध्ये अर्शितचा उल्लेखनीय सहभाग हा शाळेसाठी आणि अमरावतीसाठी अभिमानास्पद ठरला आहे. अर्शितच्या या यशामागे वर्गशिक्षिका स्नेहा टाले यांचे मार्गदर्शन, तसेच शाळेचे प्राचार्य नितीन कोळी, उपप्राचार्य मुकुंद हंबे,आणि संगीत विभागाचे शिक्षक तूषार बेनकर यांचा मोलाचा वाटा



आहे.शाळेत आयोजित सत्कार समारंभात अर्शितचा सत्कार करण्यात आला. शाळेतील संगीत विभाग विद्यार्थ्यांमध्ये कलागुण, कलाकारत्व आणि सृजनशील तेला सातत्याने प्रोत्साहन देत आहे.अर्शितच्या या आंतरराष्ट्रीय यशामुळे शाळेची शैक्षणिक तसेच सांस्कृतिक कामगिरी अधिक प्रतिष्ठित झाली आहे. संपूर्ण शाळा परिवाराने अर्शितला उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# संक्षिप्त

## वऱ्हा शेतशिवारात दुचाकी जाळली

**कुऱ्हा** - पोलिसस्टेशन अंतर्गत येणाऱ्या वऱ्हा शेतशिवारात आरोपीने दुचाकी जाळून नुकसान केले.रमेश महादेव पंचबुध्दे (५७) रा. वऱ्हा हे त्यांची दुचाकी क्र. एमएच २७सीडी ८४४२ घेऊन शेतात गेले होते. पाऊस आल्याने दुचाकी तेथेच उभी करून ठेवली होती. ती दुचाकी आरोपी उमेश देविदास माळोदे रा. वऱ्हा याने जाळली, अशी तक्रार पंचबुध्दे यांनी कुऱ्हा पोलिसांत दिली.

## शेतातून पाण्याची मोटार चोरी

**चांदूररेल्वे** - सिंचनासाठी शेतात लावलेली विद्युत मोटार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना सावंगा विठोबा शेतशिवारात घडली. विनोद दिगंबर कुकडकर (४२) असे फिर्यादी शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांनी त्यांच्या शेतातील विहिरीत ५ एचपीची पाणबुडी मोटार लावली होती. ती अज्ञात चोरट्याने चोरून नेली. तिची अंदाजे किंमत १६ हजार रुपये आहे. याप्रकरणी चांदुररेल्वे पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

## 'वंदे मातरम गीता'चे विद्यापीठात सामुहिक गान

**अमरावती** - 'वंदे मातरम गीताने जनमानसात देशभावना जागृत होण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली आहे. वंदे मातरम् या गीताला दिडशे वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता संत गाडगे बाबा विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारतीजवळील ध्वजस्तंभाजवळ सामुहिक गान होणार आहे. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे. तरी सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, संवैधानिक अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी यांनी 'वंदे मातरम' या सामूहिक गान कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे.

## बारावीच्या परीक्षेस अर्ज करण्याची शेवटची संधी

**अमरावती** - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी- मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या बारावीच्या परीक्षेसाठी अर्ज भरण्याची मुदत वाढविण्यात आली आहे. विद्यार्थी आता ४ ते १० नोव्हेंबर या कालावधीत विलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरू शकणार आहेत.राज्य मंडळाच्या वतीने बारावीच्या परीक्षेचे अंतिम वेळापत्रक नुकतेच जाहीर केले आहे, मात्र काही विद्यार्थ्यांकडून अर्ज भरला न गेल्याने त्यांना आणखी एक संधी देण्यात आली आहे. व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त खासगी विद्यार्थी, तसेच श्रेणी सुधार योजना किंवा तुरळक विषय घेऊन परीक्षा देऊ इच्छिणारे विद्यार्थी या कालावधीत विलंब शुल्कासह अर्ज भरू शकणार आहेत. कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी आपल्या महाविद्यालयाच्या प्रोफाईलमध्ये मान्यता प्राप्त विषय आणि शिक्षकांची अचूक माहिती अद्ययावत करून ती राज्य मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच, ज्या विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक उपलब्ध आहे, त्यांची नोंद अर्ज भरताना करावी, अशा सूचना मंडळाने दिल्या.ज्यांनी आतापर्यंतही मार्च २०२६मध्ये होणाऱ्या परिक्षेसाठी अर्ज भरले नाहीत, अशांनी ते भरावेत, असे आवाहन मंडळाने केले आहे.

## महापालिकेत महर्षी सुदर्शन जयंती साजरी

**अमरावती** - महापालिकेत महर्षी सुदर्शन जयंतीनिमित्त कार्यक्रम मोठ्या श्रद्धा व उत्साहात पार पडला. अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांच्या हस्ते महर्षी सुदर्शन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

हा कार्यक्रम महापालिका कॉन्फरन्स हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी सहायक आयुक्त भूषण पुसतकर, अशोक पासरे, गणेश तंबोले, अजय कनोजे, मनोज पासरे, किशोर पासरे, विनोद पछेल, नरेश धवसेल, संदीप डिके, रणजीत सोनटक्के, सुभाष धामणे, विनोद मार्ते आदी उपस्थित होते.

# सततच्या पावसाने मक्याचे पीक उद्ध्वस्त

## झाडावरच कोंब फुटल्याने शेतकरी हतबल

**धारणी/वार्ताहर**

अमरावती, अचलपूर, चिखलदरा, धारणी परिसरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विशेषतः मक्याच्या पिकावर पावसाचा जबरदस्त फटका बसला असून, झाडावरच मक्याचे कणसे उगवू लागल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.

शेतकऱ्यांनी सांगितले की, मका पूर्णपणे काढणीस तयार होत; मात्र अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे पिकावर ओलावा वाढला, कणसांवर बुरशी आली आणि काही ठिकाणी तर मक्याच्या झाडावरच कोंब फुटले. त्यामुळे संपूर्ण पीक बाजारात विक्रीयोग्य राहिले नाही. अनेक शेतकऱ्यांचे लाखो



रुपयांचे नुकसान झाले असून, खर्चही वाया गेला आहे. मक्यासह सोयाबीन आणि हरभरा पिकांवरही पावसाचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. पिकांवर ओलावा वाढल्यामुळे किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.स्थानिक शेतकरी रामकिशन दारसिंबे यांनी सांगितले की, यावर्षी मका उत्तम झाला होता, पण पावसाने सगळं बिघडवलं. झाडावरच कणसे उगवली आहेत, आता या पिकाचं काय करायचं?' शेतकऱ्यांच्या या अवस्थेकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन महसूल विभागाकडून पंचनामे करून भरपाई जाहीर करावी, अशी मागणी होत आहे. कृषी विभागाने नुकसानीचे सर्वेक्षण सुरू केले असून, लवकरच प्राथमिक अहवाल सादर केला जाणार आहे. या पावसाने फक्त पीक नव्हे, तर शेतकऱ्यांच्या आशाही भिजवल्या आहेत.

# शिक्षक बदल्यांचा निर्णय अखेर जिल्हा पातळीवर

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडेच सर्वाधिकार

**अमरावती/क्रा.प्र.**

जिल्हा परिषद शिक्षक बदल्यांच्या अधिकाराचा प्रश्न गेल्या काही वर्षांपासून शिक्षक संघटनांसाठी तसेच प्रशासकीय यंत्रणेसाठी डोकेदुखी ठरला होता. अखेर ग्रामविकास विभागाने जारी केलेल्या पत्राद्वारे या संदर्भात मोठा निर्णय घेत, शिक्षक बदल्या आता जिल्हा परिषद सीईओ यांच्या अखत्यारीतच राहतील, हे स्पष्ट केले आहे. राज्यभरातील शिक्षकांनी स्वागत केलेल्या या निर्णयामुळे जिल्हा पातळीवरील अधिकार पुनर्स्थापित होऊन बदल्यांची प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ आणि वेळेत पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पूर्वी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडेच



बदल्यांचे अधिकार होते. मात्र, काही वर्षांपूर्वी बदल्यांची प्रक्रिया पूर्णतः राज्य स्तरावर केंद्रीकृत करण्यात आली होती. ग्रामविकास मंत्रालयाकडून थेट प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या करण्यात येत होत्या. ही प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीची ठरल्याने मोठ्या प्रमाणावर गैरसोय निर्माण झाली. विन्सिस आयटी कंपनीच्या सॉफ्टवेअरमुळे अनेक अडचणी आल्या; अर्ज सादरीकरण, प्राधान्यक्रम तपासणी आणि याद्या प्रसिद्धीमध्ये त्रुटी निर्माण झाल्या. यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष वाढला आणि अनेकांनी न्यायालयात धाव घेतली.राज्य स्तरावरून होणाऱ्या बदल्यांमध्ये पारदर्शकतेचा अभाव, तांत्रिक चुका आणि अन्यायकारक याद्यांमुळे ग्रामविकास विभागाला वारंवार प्रतिज्ञापत्र सादर करावे लागले. या निर्णयामुळे येत्या शैक्षणिक वर्षासाठी म्हणजेच २०२५-२६ साठीची बदला प्रक्रिया ३१ मे पूर्वी पूर्ण होऊन १५ जूनपूर्वी शिक्षकांना त्यांच्या नवीन ठिकाणी रुजू होता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या बदल्यांमुळे शिक्षणाचा दर्जा आणि शिक्षकांची स्थैर्यभावना दोन्ही जपले जातील, असा विश्वास शिक्षण क्षेत्रात व्यक्त होत आहे.

# धम्मचक्र प्रवर्तनामुळेच माणूस ताठ मानेने उभा -डॉ. राहुल दखने

## विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राची व्याख्यानमाला

**अमरावती/का.प्र.**

स्वातंत्र्याच्या पंचाहत्तर वर्षानंतरही देशातील स्थिती बदलली आहे असे म्हणता येत नाही. मात्र धम्मचक्र प्रवर्तनामुळेच आज माणूस ताठ मानेने उभा आहे, असे प्रखर विचार शिवरामजी मोघे महाविद्यालय, पांढरकवडा येथील इतिहास विभागाचे डॉ. राहुल दखने यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित 'धम्मचक्र प्रवर्तनाची वर्तमान काळातील प्रासंगिकता' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.



आत्मा आणि इश्वराचे अस्तित्व बुध्दाने नाकारले. सारनाथ येथे बुध्दाचे पहिले प्रवचन झाले. बुध्दाचे चरित्र वाचल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बुध्दाच्या धम्माचे आकर्षण वाढले. त्यांनी लिहिलेल्या लेखामध्येही बुध्दाच्या धम्माचा उल्लेख आढळतो. भारतीय संविधान देखील बुध्दाच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता न्याय या धम्म तत्त्वज्ञानावर आधारित आहे. माणसाला माणूसपण, न्याय, स्वातंत्र्य, बंधुता देणारा धम्म डॉ. बाबासाहेबांना पाहिजे होता व बुध्दाच्या धम्मात या सर्व बाबी त्यांना दिसल्या, त्यामुळे त्यांनी बुध्दाच्या धम्माचा स्वीकार केला.

प्रमुख अतिथी डॉ. रविंद्र कडू म्हणाले, सर्व धर्माचा अभ्यास करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्दाचा धम्म स्वीकारला. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, दीक्षाभूमी हे देशवासियांचे श्रध्दास्थान आहे. दीक्षाभूमी ही निवासस्थानापासून जवळच असल्याने दीक्षाभूमी विषयी बाळकडू मिळाले.

वर्तमान काळाची स्थिती पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निर्णय योग्यच होता व त्याची प्रासंगिकताही जाणवते. संत गाडगे बाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, मेणबत्ती प्रज्वलित करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी बौध्द धम्म प्रचार समिती, भीमटेक डीच्या वतीने कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचा शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. संतोष बनसोड यांनी, सूत्रसंचालन डॉ. रत्नशील खोब्रागडे यांनी, तर आभार सुरज मंडे यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, अमरावती शहरातील गणमान्य नागरिक मोठा संख्येने उपस्थित होते.

# काळविट कातडी तस्करीतील चार आरोपी गजाआड

## वनविभाग व वाईल्ड लाइफ क्राईम कंट्रोल ब्युरोची संयुक्त कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** काळविटच्या कातडीची तस्करी करणा-या चार जणांना वनविभागाने गजाआड केले आहे. अमरावती वनविभाग, वडाळी वनपरिक्षेत्र व वाईल्ड लाइफ क्राईम कंट्रोल ब्युरो यांच्या संयुक्त पथकाने काळविटाच्या कातड्यांसह चार आरोपींना अटक केली आहे. हि कारवाई ४ नोव्हेंबर रोजी सकाळच्या सुमारास करण्यात आली. अमरावती बसस्थानक परिसरातून दोन आरोपींना आणि माऊली चोर परिसरातून आणखी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून काळविटाचे कातडे, दोन मोटारसायकली आणि चार मोबाईल




फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी वनगुन्हानुसार वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील कलम ९, ३१, ४८, ४९ आणि ५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना अमरावती न्यायालयाने ६ नोव्हेंबरपर्यंत वनकोठडी सुनावली आहे. अटक आरोपींमध्ये प्रविण रामकृष्ण सोळंके (वय ३५, रा. गनोजा देवी, ता. भातकुली), राजेश गणेशराव वानखडे (वय ३५, रा. गनोजा देवी, ता. भातकुली), अशोकसिंग उर्फ गोलूसिंग संतोषसिंग बावरी (वय ३१, रा. पापळ, ता. नांदगाव खंडेश्वर), बहादूरसिंग संतोषसिंग बावरी (वय ३०, रा. पापळ, ता. नांदगाव खंडेश्वर) यांचा समावेश आहे. या कारवाईत वडाळी परिक्षेत्रातील वनकर्मचारी तसेच अधिकाऱ्यांचा सहभाग होता. वनविभाग या प्रकरणाचा पुढील तपास करत आहे.

# अकोला एसपी कार्यालयातच एसीबीची कारवाई

## महिला लिपिक लाच घेताना रंगेहाथ अटक

**अकोला/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. अकोला जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयातच भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने (एसीबी) थेट कारवाई करत एक महिला लिपिकास लाच घेताना रंगेहाथ पकडले आहे.सदर महिला लिपिकाचे नाव ममता पाटील असे असून, तिने टी.ए.डी.ए.



(ॐॐ) बिल मंजूर करण्यासाठी लाचेची मागणी केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाची संपूर्ण कारवाई अमरावती येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केली आहे.या धडक कारवाईनंतर जिल्हा पोलिस विभागासह संपूर्ण प्रशासनात खळबळ उडाली आहे. न्याय आणि प्रामाणिकतेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या पोलिस अधीक्षक कार्यालयातच लाचखोरीचा प्रकार उघड झाल्याने नागरिकांमध्ये संताप आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर प्रकरणात पुढील तपास एसीबीकडून सुरू असून, संबंधित महिला लिपिकावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

# मागणी असणाऱ्या रोजगारक्षम प्रशिक्षणाची निवड करा



**जिल्हाधिकारी आशिष येरेकर**

अमरावती/प्रतिनिधीः- युवकांमधील कौशल्य विकसित करण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. कौशल्य विकास योजनेतून प्रशिक्षणासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येते. यावर्षीच्या प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्ह्यात मागणी असणाऱ्या रोजगारक्षम प्रशिक्षणाची निवड करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.


जिल्हाधिकारी कार्यालयात आज (दि.६) किमान कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रशिक्षण लक्ष्य वाटप करण्याबाबत जिल्हास्तरीय समिती सभा पार पडली. यावेळी कौशल्य विकास विभागाचे उपायुक्त दत्तात्रय ठाकरे, सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी सांगीतले की, जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून यावर्षी प्रशिक्षणावर १ कोटी रूपये खर्च करण्यात येत आहे. युवकांचे कौशल्य वाढविण्यासाठी प्रशिक्षण हे आवश्यक असून आवश्यकतेप्रमाणे निधी देण्यात येईल. जिल्ह्यात मागणी असणाऱ्या मनुष्यबळाची माहिती घेऊन प्रशिक्षण कार्यक्रम ठरविण्यात यावेत. यासाठी चांगल्या दर्जाच्या प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यात यावी. प्रशिक्षणानंतर प्रामुख्याने रोजगाराचा प्रश्न येत असल्याने यातील प्रशिक्षणार्थ्यांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे. यासाठी त्यांना बँकांशी संलग्न करून द्यावे.जिल्हा ☞(पान २ वर)

# नांदगाव नगरपंचायत निवडणुकीसाठी राजकीय रणधुमाळीला वेग, -सर्वच राजकीय पक्षांकडून तयारी

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आणि इच्छुकांकडून मोर्चे बांधणीला राजकीय वेग येऊन रणधुमाळी सुरू झाली आहे. नांदगाव नगरपंचायतचे नगराध्यक्ष पद महिला करता राखीव असल्याने इच्छुक पुरुष उमेदवाराचा हिरमोड झाला असला तरी अनेकांनी आप आपल्या घरातील महिलांचे नाव पुढे केले असल्याने निवडणुकीच्या तयारीत रंगत येऊन शहरात राजकीय वातावरण तापायला लागले. नगरपंचायतच्या निवडणुकीतील खरी चुरस नगराध्यक्ष पदासाठी असून या पदासाठी सर्वच पक्षात अनेक दावेदार असल्याचे दिसून येते.

माझीच उमेदवारी नगराध्यक्ष पदासाठी सक्षम कशी ठरू शकते हे राजकीय समीकरण



पटवून देण्यासाठी सर्वच पक्षातील इच्छुकांनी आप आपल्या पक्षांच्या वरिष्ठाकडे हजेरी लावून लॉबिंग सुरू केली आहे. भाजप, काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व माकप इत्यादी राजकीय पक्षांची भूमिका निवडणुकीत एकला चलो रे ची असून स्वतंत्र निवडणूक लढवून आपले अस्तित्व कायम ठेवण्यात दिसून येते. १७ सदस्य संख्या असलेल्या नगरपंचायत मध्ये नगराध्यक्ष व नगरसेविका मिळून महिलांची संख्या १० होत असल्याने नगरपंचायत मध्ये महिलांचेच वर्चस्व राहणार आहे. महिला आरक्षणामुळे इच्छुक पुरुष उमेदवाराचे टेन्शन वाढले असून वर्षानुवर्ष प्रभागामधून तयारी करून गुडघ्याला बाशिंग बांधून नगराध्यक्षाचे स्वप्न पाहणारे पुरुष उमेदवार महिला आरक्षणामुळे नगराध्यक्षाच्या स्पर्धेतून बाहेर गेले असले तरी काहींनी घरच्या महिलेच्या आडून आपले राजकीय अस्तित्व कायम ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे.

पूर्वी नगरपंचायत मध्ये काँग्रेसकडे सत्ता होती. अडीच वर्षानंतर राजकीय घडामोडी करून राष्ट्रवादी व शिवसेनेच्या मदतीने काँग्रेस कडे असलेली सत्ता भाजपाने हस्तगत केली होती. त्यामुळे होणारी ☞(पान २ वर)

# ८ व ९ नोव्हेंबरला भव्य निशुल्क महायोग शिबिर

## ५ हजारापेक्षा अधिक नागरिक घेणार योगाचा लाभ, -स्वामी परमार्थदेव महाराज यांचे मार्गदर्शन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती मध्ये ८-९ नोव्हेंबर ला भव्य दिव्य राज्यस्तरीय महायोग शिबिर आणि योग संमेलन होत आहे. ८ नोव्हेंबरला सकाळी ५ पासुन श्री शिवाजी शारिरिक शिक्षण महाविद्यालय, पंचवटी, येथे निशुल्क इन्टिग्रेटेड योग शिबिर प्रारंभ होईल. जिथे पतंजलि योगपीठ के परमपुज्य स्वामी बाबा रामदेव यांचे परमशिष्य ,भारताचे केन्द्रीय प्रभारी स्वामी परमार्थदेव महाराज योग मार्गदर्शन करतील तसेच ९ नोव्हेम्बर ला सकाळी ९ वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन ,मोर्शी रोड अमरावती येथे योग महासंमेलन होईल, अशी माहिती पत्रकार परिषदेत भारत स्वाभिमान चे राज्यप्रभारी दिनेश राठोड व पतंजलि योग समिति चे राज्यप्रभारी अनिल



अम्रुतवार, अर्चित जाजोदिया यांनी दिली.

कार्यक्रमाचे आयोजक चंद्रकुमार जाजोदिया तथा सह आयोजक नानकराम नेभनानी असुन

या भव्य दिव्य योग संमेलनाचे उदघाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे करतील व महायोग संमेलनाचे अध्यक्ष खासदार डाँ अनिल बोंडे असतील. दोन दिवसीय महायोग संमेलनाची तय्यारी पूर्ण झाली असुन १८ जिल्ह्यातील हजारो योगसाधक अमरावती ला आले आहे .अमरावती मध्ये घरोघरी निमंत्रण देत आहे. महायोग शिबिरात खासदार बळवंत वानखडे, माजी खासदार नवनित राणा,आमदार चंदु यावलकर ,आमदार रवि राणा,आमदार संजय ☞(पान २ वर)

# विधीसंघर्षीत बालक ताब्यात, मोबाईल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ उड्डाणपुलाखाली झालेल्या जबरी चोरीचा गुन्हा अमरावती गुन्हे शाखेने अल्पावधीत उघडकीस आणत एका विधीसंघर्षीत बालकाला ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून हिसकावलेला मोबाईल जप्त करण्यात आला असून, या प्रकरणातील मुख्य आरोपी आधीपासूनच एम.पी.डी.ए. कायद्यान्वये कारागृहात बंद असल्याचे समोर आले आहे.

ही घटना ३ मार्च २०२५ रोजी रात्री घडली होती. फिर्यादी संजय गोटेकर (रा. केडिया नगर, अमरावती) हे रात्री उशिरा कामावरून परतत असताना राजापेठ उड्डाणपुलाखालून सुने हॉस्पिटलसमोरून जात होते. त्यावेळी दोन अज्ञात युवक मोटारसायकलवर आले आणि

**राजापेठ उड्डाणपुलाखालील जबरी चोरी प्रकरण**

ओप्पो कंपनीचा मोबाईल हिसकावून फरार झाले. गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. तपासात आरोपी यश प्रविण गडलींग (वय २२, रा. संजय गांधी नगर नं.२) व एक विधीसंघर्षीत बालक यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. यश गडलींग हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून सध्या एम.पी.डी.ए. अंतर्गत २५ ऑगस्टपासून जिल्हा कारागृहात आहे. दरम्यान, विधीसंघर्षीत बालकाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरी गेलेला मोबाईल (किंमत १८,०००) हस्तगत करण्यात आला. पुढील तपासासाठी बालकाला राजापेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त रमेश धुमाळ, उपायुक्त श्याम घूगे, व सहाय्यक पोलीस ☞(पान २ वर)

# त्रिशा मिश्राचे थायलंडमध्ये यश

## कल्चर ऑलम्पीयाड स्पर्धेत रौप्यपदक

अचलपूर/प्रतिनिधीः- अचलपूर शहराची कन्या त्रिशा रूपेश मिश्रा हिने थायलंडमधील पत्ताया येथे झालेल्या १५प् ण्ल्टूर्ल्त् ध्त्ब्स्र्ज्‍ द र्झ्दिस्ग्हु ॅ या आंतरराष्ट्रीय स्तरावरील भव्य स्पर्धेत रौप्यपदक (एग्त्ने र्ैत्) जिंकत भारताचा आणि




अचलपूरचा गौरव वाढविला आहे. ही स्पर्धा ंएए उर्त्दे्त् ण्दल्हम्त् द्ॅ ण्ल्टूले या संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आली होती, जी ळर्न्एण्ध् ची अधिकृत भागीदार संस्था आहे. त्रिशाने आपल्या अद्वितीय नृत्यकौशल्याने परीक्षक मंडळाला अक्षरशः मंत्रमुग्ध केले. तिच्या उत्कृष्ट सादरीकरणाने केवळ भारतीय सांस्कृतिक परंपरेचा वैभव प्रदर्शित केला नाही, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय नृत्यकलेचा झेंडा उंचावला. या यशामागे त्रिशाचा प्रचंड परिश्रम, तिच्या गुरूंचे समर्पित मार्गदर्शन आणि ☞(पान २ वर)

# कारच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

## मोझरी बायपास वळण मार्गावर अपघात

**तिवसा/प्रतिनिधीः-** मोझरी बायपास वळणावरून तिवसाकडे जाणाऱ्या दुचाकीस समोरून येणाऱ्या कारची जबर धडक बसल्याने दुचाकी चालक युवक हा गंभीर जखमी झाला आहे. आज (दि.६) दुपारी २ वाजताचे सुमारास ही घटना तिवसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुरुकुंज मोझरी पेट्रोलपंप नजीकच असलेल्या बायपास वळण रस्त्यावर घडली.

प्राप्त माहितीनुसार दर्शन सुरेंद्र बेहरे (वय १८,रा.शिरजगाव मोझरी)



असे अपघातातील जखमी युवकाचे नाव आहे. दर्शन हा एम. एच.२७, ७१०४.क्रमांकाच्या मोटरसायकलने गुरुकुंज मोझरी येथून बायपास वळण मार्ग ओलांडून तिवसा मार्गे जात होता. दरम्यान याच मार्गावरून समोरून येणाऱ्या एम. एच. २७, डी ९५३९, क्रमांकाच्या कार ने दुचाकीस जोरदार धडक दिली. यात दुचाकीचालक दर्शन बेहरे जखमी झाला असून त्याच्या हाताला व पायाला दुःखापत झाली. घटनेची माहिती मिळताच काही सामाजिक कार्यकर्त्यांनी घटनास्थळी धाव घेत जखमीला अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.

वृत्त लिहीस्तोवर तिवसा पोलिसात याप्रकरणी कुठलीही तक्रार दाखल करण्यात न आल्याने चारचाकी वाहनांवर कुठलीही ☞(पान २ वर)

# दारू अड्डयांवर पोलिसांचा छापा; दोन जणांना अटक

## -वडाळीतील दोन ठिकाणी कारवाई, ४.२७ लाखांचा मुद्देमाल उद्ध्वस्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** वडाळी परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर दारू व्यवसायावर अखेर पोलिसांनी कारवाई केली. फ्रेजरपुरा पोलिसांनी गुरुवार, ६ नोव्हेंबर रोजी सकाळी दोन दारू अड्डयांवर छापा टाकत ४ लाख २७ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल उद्ध्वस्त केला. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी प्रथम वडाळी येथील पारधी बेडा परिसरातील एका महिलेच्या अड्डयावर छापा टाकला. येथे पोलिसांना मोठ्या प्रमाणात मोहा सडवा, तयार गावठी दारू आणि बनविण्याचे साहित्य मिळाले. एकूण २ लाख ५६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला. यानंतर पोलिसांनी संजय वामनराव शिरसाट (५९, रा. प्रबुद्धनगर) या इसमाच्या अड्डयावर छापा टाकला. येथेही मोठ्या प्रमाणात ☞(पान २ वर)

# महसूल विभागाची वाळू तस्करांवर धडक कारवाई

## दोन टिप्परसह दोन ब्रास काळी वाळू जप्त

**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** तालुक्यात दिवसेनदिवस नदी पात्रातील,वाळू तस्करी वाढतच आहे. या वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी स्थानिक महसूल विभागाने,एस.डी.ओ. बळवंत अरखाराव यांचे मार्गदर्शनाखाली धडक मोहीम उघडली आहे.या मोहीमेअंतर्गत केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवाईत, दोन टिप्पर व दोन ब्रास काळी वाळू जप्त करण्यात आली आहे. या वाळू तस्करांवर



पुढील कारवाई, महसूल नियमा अंतर्गत सुरू आहे.

सदर कारवाई अंतर्गत ६ नोव्हेंबरला सकाळी ७ वाजता तळेगाव मोहना येथे, एम.एच.२७ बी.एक्स. ८५५४ क्रमांकाचा टिप्पर व १ ब्रास काळी वाळू जप्त करण्यात आली.सदर वाहन व वाळू उमेश सुभाष नांदने यांचे मालकीची असल्याचे कळते. तसेच चार दिवसा पूर्वी मौजा कुरळ पूर्णा शिवारात ही अशीच धडक कारवाई करण्यात आली.या कारवाईत ही एम.एच.४३ बी.जी. ३९२७ ☞(पान २ वर)

# त्या भीषण अपघातातील आणखी एकाचा मृत्यू

**चार निरागस जीवांचा अंत**

## -परतवाडा-अंजनगाव सुर्जी मार्गावरील घटना





**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा-अंजनगाव सुर्जी मार्गावरील येणी पांढरी गावाजवळ झालेल्या भीषण अपघाताने आणखी एक जीव घेतला. उपचारासाठी झुंज देणारा बिरोबा तातोबा जावीर (वय ३३, रा. गोमेवाडी, सांगली) अखेर बुधवारी (दि. ५ नोव्हेंबर) मृत्यूशी झुंज हरला. त्यामुळे या अपघातातील मृतांची संख्या आता चारवर पोहोचली आहे.

२५ ऑक्टोबर रोजी संध्याकाळच्या सुमारास अकोट आगाराची एसटी बस आणि चारचाकी वाहनाची समोरासमोर धडक झाली होती. अपघातानंतरचे दृश्य हृदय पिळवटून टाकणारे होते. या घटनेत आप्पासो राजाराम अतकरी (रा. खटाव, सातारा) आणि दस्तगीर बाबुमिया मुलाणी (रा. गोमेवाडी, सांगली) यांचा जागीच मृत्यू झाला होता. गंभीर जखमी झालेल्या बिरोबा जावीर आणि मुकुंद देशपांडे यांना तातडीने अमरावतीतील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु २६ ऑक्टोबर रोजी मुकुंद देशपांडे यांनी प्राण सोडले, तर दीर्घ उपचारानंतर ☞(पान २ वर)

# सहदेवराव शेंडे यांचे निधन

**टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-** अमरावती गाडगेनगर येथील प्रतिष्ठित नागरिक तथा नामवंत पेंटर सहदेवराव सखारामजी शेंडे यांचे गुरुवार, ६ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता दिर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ९२ वर्षाचे होते. त्यांची



अंत्ययात्रा शुक्रवार ७ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता त्यांचे राहते घरी गाडगे नगर, अमरावती येथील निवासस्थानावरून निघणार आहे. ते महाराष्ट्र कलाल/कलार समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेंद्र शेंडे यांचे वडील होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन मुली, सुना, जावाई, नातवंड, नातजवाई असा बरच मोठा आप्त परिवार आहे.

# वंदे मातरम गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल

## आज विविध उपक्रमांचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** 'वंदे मातरम' या गीतास दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने देशभर वंदे मातरम गीत गायन, देशभक्तीपर भाषणे, निबंध, लेखन, वक्तृत्व स्पर्धा सांस्कृतिक कार्यक्रम यासारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १० वाजता वंदे मातरम् गीत गायीले जाणार आहे. तसेच संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.), अमरावती येथे सामुहिक वंदे मातरम् गीत गायीले जाणार आहे.बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी १८७५ साली लिहिलेले वंदे मातरम हे गीत स्वातंत्र्य लढयात तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातही अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त आहे. आनंदमठ या कादंबरीतील हे गीत भारतमातेच्या स्तुतीचे प्रतीक असून स्वातंत्र्यलढ्यातील असंख्य क्रांतीकारकांसाठी प्रेरणादायी ठरलेले आहे.वंदे मातरम कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या कार्यक्रमानुसार ७ नोव्हेंबर रोजी बंकिमचंद्र चटोपाध्याय यांनी रचलेल्या 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त, अमरावती शहरात संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) येथील क्रीडांगणावर सकाळी ९.३० वाजता या मुख्य कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहसंचालक अनंत सोमकुवर यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडेल. यावेळी देशभक्तीपर गीत गायन, लेझिम पथनाट्य आणि व्याख्यान अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण होणार आहे.

# भूमि अभिलेख विभागातील गट क पदांची १३ व १४ नोव्हेंबरला परीक्षा

## प्रथम सत्रात पुणे, अमरावती विभागांची परीक्षा होणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार १ ते २४ ऑक्टोबर या कालावधीत ऑनलाईन अर्ज स्विकृतीचे कामकाज करण्यात आले असून ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा (ण्दस्ज्ली ॅ्‍ ऊ्) १३ व १४ नोव्हेंबर या कालावधीत महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर घेण्यात येणार आहे, असे जमाबंदी आयुक्त आणि संचालक (भूमि अभिलेख) डॉ. सुहास दिवसे यांनी प्रसिध्दी पत्राव्दारे कळविले आहे.

परीक्षेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे : दि. १३ नोव्हेंबर रोजी प्रथम सत्रात पुणे, अमरावती विभागांची परीक्षा होणार असुन उमेदवारांची परीक्षा केंद्रावर रिपोर्टींगची वेळ सकाळी ८.०० वाजताची राहील. त्याच दिवशी ( १३ नोव्हेंबर) द्वितीय सत्रात नाशिक व नागपूर विभागातील परीक्षा होणार असुन उमेदवारांची परीक्षा केंद्रावर रिपोर्टींगची वेळ दुपारी १२ वाजताची असेल.

दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी, प्रथम सत्रात मुंबई (कोकण) विभागाची परीक्षा होणार असून उमेदवारांची रिपोर्टींगची वेळ सकाळी ८.०० वाजताची असेल. दुसऱ्या सत्रात छ.संभाजीनगर विभागाची परीक्षा होणार असुन उमेदवारांची रिपोर्टींगची वेळ दुपारी १२ वाजताची असेल.

परीक्षेचे विभागनिहाय वेळापत्रक व उमेदवारांचे परीक्षेच्या प्रवेशपत्राबाबत विभागाच्या अधिकृत ☞(पान २ वर)